महाराष्ट्राचे पंचप्राण.



महाराष्ट्र देवी

किंमत एक रुपया.

अजरामर झालेले
महाराष्ट्राचे पंचप्राण.

लेखक,
विष्णु विनायक करमरकर,
बी. ए. एलूएलू. बी. वकील पुणें

हें पुस्तक पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन**
यांनीं छापिलें व
नारो आप्पाजी गोडबोले यांचे
दुकानचे मालक
महादेव भास्कर गोडबोले.
यांनीं घर नंबर ६३४ बुधवार पेठ
पुणें येथें प्रसिद्ध केलें.

आवृत्ति पहिली.

सन १९२१

किंमत एक रुपया.

प्रस्तावना.

"Lives of great men all remind us
We can make our lives sublime"

Longfellow.

मराठी भाषेंत आजकाल जर मोठी कोणती उणीव असेल तर बालवाङ्मयाची होय. सोप्या भाषेंत लिहिलेलीं, वर्तनाला चांगलें वळण लावणारीं, चटकदार व मधुर भाषेंत बोध व रंजन करणारीं, व पौराणिक, ऐतिहासिक व आधुनिक अनुकरणीय थोर विभूतींचीं चरित्रें कथन करणारीं, पुस्तकें आपल्या मराठी भाषेंत फारच थोडीं आहेत. आजकाल जिकडे तिकडे कांदबऱ्या व नाटकें यांचा सुळसुळाट झाला आहे. कांदबऱ्या व नाटकें किती झालीं तरी काल्पनिक. खऱ्या घडलेल्या गोष्टींनीं जसा मनावर परिणाम होतो तसा काल्पित कथांनीं होत नाहीं. यामुळें कोणत्याही वयांत कादंबऱ्या व नाटकें यांच्या वाचनापेक्षां थोर पुरुषांचीं व स्त्रियांचीं चरित्रें वाचणें हें अधिक चांगलें हें सांगावयासच नको. बालवयांत तर कांदबऱ्या व नाटकें यांच्यापेक्षां सद्वर्तनप्रवर्तक नमुनेदार चरित्रेंच वाचनास अधिक योग्य. कादंबऱ्या अथवा नाटकें जरी चांगलीं असलीं तरी त्यांचेपासून नुसती करमणूक होते; यामुळें त्यांच्या वाचनांत जाणारा काळ फुकट जातो असेंच म्हटलें पाहिजे. ही गोष्ट झाली चांगल्या कादंबऱ्यांची व चांगल्या नाटकांची. पण अलीकडे भराभर प्रसिद्ध होणाऱ्या कादंबऱ्यांकडे व नाटकांकडे नजर फेंकल्यास असें दिसून येईल कीं, बहुतेक कांदबऱ्या व नाटकें युवयुवतींच्या प्रेमकथांनीं ओथंबलेलीं असतात. अर्थातच कोमल बालकांच्या व बालिकांच्या मनांवर त्यांचा अतीशय वाईट परिणाम होतो व कधीं कधीं तर या बिचाऱ्या कोमल बालकांच्या व बालिकांच्या शरीराची व

आयुष्याची राखरांगोळी होते. तेव्हां सांगावयाचें तात्पर्य हें कीं हल्लींच्या भराभर प्रसिद्ध होणाऱ्या प्रेमकथापरिप्लुत कादंबऱ्या व नाटकें हींच आपल्या तरुण पिढीच्या प्रत्यहीं दृग्गोचर होणाऱ्या शारीरिक व मानसिक दौर्बल्यास कारण आहेत. ही आपली तरुण पिढी म्हणजे आपल्या राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहेत यामुळें जेणेंकरून त्यांची ही वाईट अवस्था दूर होईल व त्यांचीं मनें व शरीरें सुदृढ व कर्तबगार होतील अशा उपायांचें अवलंबन केलें पाहिजे. असे उपाय योजणें हें प्रत्येक राष्ट्रहितचिंतकाचें पवित्र कर्तव्य आहे. हें पवित्र कर्तव्य अंशतः तरी आपण बजावावें असें आमच्या मनांत आलें. सोप्या व चटकदार भाषेंत थोर व अनुकरणीय पुरुषांचीं छोटेखानी चरित्रें लिहिल्यास तीं आपल्या कोमल बाळांना व बालिकांना आवडतील व मग त्यांना सच्चरित्रवाचनाचा नाद लागेल व कादंबरीवाचनाचें त्यांचें व्यसन सुटेल असें आमचे मनानें घेतलें. याप्रमाणें चरित्रें लिहावीं असें मनांत येतांच आजच्या महाराष्ट्राला अत्यंत उपकारबद्ध करून ठेवणारे आजकालचें उज्ज्वल विभूतिपंचक आमच्या डोळ्यापुढें उभें राहिलें. या विभूतींनीं आपलें सर्व आयुष्य हल्लींच्या महाराष्ट्राच्या उन्नतीसाठीं खर्च केलें. यामुळें त्यांच्यावर हल्लींच्या महाराष्ट्राचें इतकें प्रेम जडलें कीं, या पांच विभूति म्हणजे आपले **पंचप्राण** आहेत असेंच या आमच्या महाराष्ट्रास वाटत आहे. या पांच महा विभूतींनीं आपलीं नाशवंत शरीरें टाकून दिलीं आहेत. यामुळें ह्या थोर पांच विभूति—हे थोर पांच देशभक्त—हे महाराष्ट्राचे पंचप्राण, आपणाला सोडून गेले आहेत अशी आपली चुकीची समजूत झाली आहे. आणि याचमुळें आज आपला महाराष्ट्र मेल्यासारखा दिसत आहे. पण ही चूक आहे. देशाकरतां सर्व आयुष्य खर्च करणाऱ्या विभूति मरत नसतात. अशा थोर विभूतींना म्हातारपणाची बाधा होत नाहीं. देवाप्रमाणें या थोर विभूति अजरामर होतात. फक्त आपलीं नाशवंत शरीरें टाकून देऊन मरणावर विजय संपादन करितात व आपल्या देशबंधूंच्या अंतःकरणांत प्रवेश करून

देशोन्नतीसाठीं सदोदित झटत राहतात. अशा या आजकालच्या पांच थोर विभूति कोण हें कांहीं सांगितलेंच पाहिजे असें नाहीं. **न्या. माधवराव गोविंद रानडे, निबंधमालाकार विष्णु कृष्ण चिपळूणकर, प्रिन्सिपॉल गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, व भारतसेवक ना. गोपाळ कृष्ण गोखले** याच त्या विभूति. गेल्या पन्नास वर्षांतील सर्व सामाजिक, राजकीय व शैक्षणिक चळवळींचें उगमस्थान हा आमचा महाराष्ट्र देश झाला, हा आमचा महाराष्ट्र सर्व हिंदुस्तानचा नेता झाला याचें कारण असले थोर पांच देशभक्त या आमच्या महाराष्ट्राचे पोटीं जन्मास आले हेंच होय. आतां जरी हे थोर पुरुष आम य चर्मचक्षूंना दिसत नाहींत तरी ते आम्हांस सोडून गेले नाहींत. आमच्यावर त्यांचें इतकें उत्कट प्रेम आहे कीं, आम्हांला सोडून ते कधींच जाणार नाहींत. ते अजरामर झाले आहेत. तेव्हां या महाराष्ट्रकुलदीपकांचीं चरित्रें आमच्या प्रिय बाळकांना सांगितलींच पाहिजेत. तीं चरित्रें आमच्या प्रिय बाळकांना सन्मार्गाकडे नेतील, तीं आमच्या बालकांचीं शरीरें व मनें सुदृढ व सुसंस्कृत करतील व मग आमचे प्रिय बालक व बालिका या थोर विभूतींचें अनुकरण करून त्यांचेप्रमाणेंच धन्य धन्य म्हणवून घेतील व देशाला चांगले दिवस दाखवतील अशी आमची खात्री आहे. म्हणूनच '**महाराष्ट्राचे पंचप्राण**' हें त्यांच्या चरित्राचें सुंदर पुस्तक आज आमच्या प्रिय बाळांस आम्हीं नजर करीत आहों. अशाच बोध व रंजन करणाऱ्या सुबोध सच्चरित्रांची मराठी बालवाङ्मयांत भर घालावी अशी आमची इच्छा आहे ती तो दयाघन परमेश्वर पर्ण करो अशी त्याची अनन्य भावें प्रार्थना करून हा प्रस्तावनालेख पुरा करतों.

ता. २५ आगष्ट
सन १९२१.

लेखक
विष्णु विनायक करमरकर.

अजरामर झालेले महाराष्ट्राचे पंचप्राण.

हितगुज.

बाळांनों, आज बरेच दिवस तुमचा नाद चाललेला आहे, कीं 'राम व कृष्ण' यांचीं चरित्रें आम्हीं वाचलीं ती आम्हांला फार आवडलीं. तशींच 'आजकालच्या थोर पुरुषांचीं चरित्रें' आम्हांला सांगाना ? हा तुमचा नाद कांहीं वावगा नाहीं. पुराणकाळासारख्या हजारों वर्षांच्या पूर्वीं होऊन गेलेल्या थोर पुरुषांचीं चरित्रें वाचलीं म्हणजे सहजच वाटतें, कीं हल्लींच्या काळीं अशीं थोर माणसें असतील का ? अशीं थोर माणसें हल्लीं आहेत असें कोणी सांगितल्यास मनाला फार आनंद होतो व वाटतें, कीं आपणही रामलक्ष्मणाप्रमाणें होऊं या. तसें होणें अगदींच कांहीं अशक्य नाहीं. कारण तसलीं माणसें हल्लीं देखील झालेलीं आहेत.

बाळांनों, खरोखरच प्राचीन काळच्या थोर माणसांसारखीं थोर माणसें हल्लींही देवाच्या दयेनें आपणांत उत्पन्न झालीं आहेत, त्यांनीं आपल्या थोर गुणांनीं व सत्कृत्यांनीं मोठी कीर्ति मिळविली आहे, आपलें नांव अजरामर व पवित्र करून ठेविलें आहे, आपलें सर्व आयुष्य देशाच्या सेवेंत खर्चिलें आहे. त्यांनीं देशसेवेंत आपला देह झिजविला आहे व अशा तऱ्हेनें आपण जे त्यांचे देशबंधू त्या आपलीं मनें त्यांनीं आपलीशीं करून घेतलीं आहेत. या असल्या 'आजकालच्या थोर माणसांनीं' आपलीं नाशवंत शरीरें टाकून दिलीं आहेत व हल्लीं ते आपल्या सर्वांच्या

हृदयांत कायमची वस्ती करून राहिले आहेत. त्यांचीं शरीरें मेलीं आहेत, पण ते थोरपुरुष स्वतः अमर झाले आहेत. चिरंजीव झाले आहेत. चिरंजीव म्हणजे अमर. आतां त्यांना मरणाचें भय उरलें नाहीं. आतां त्यांना थंडी वाऱ्याचें भय उरलें नाहीं, आतां त्यांना तहान भुकेचें दुःख होणार नाहीं. आतां त्यांना वाटेल तेथें वाटेल तितक्या लवकर जातां येईल, त्यांना आगगाडीचें तिकीट काढावयास नको. त्यांना आगबोटीचेंही तिकीट काढण्याची जरूर नाहीं. त्यांना कोणीही अटकाव करूं शकणार नाहीं. यापुढील त्यांचें सर्व आयुष्य आनंदांत जाणार. यापुढें ते आपलें सर्व आयुष्य तुमच्या आमच्या अंतःकरणांत ठेवून आपणाला चांगला मार्ग व चांगले विचार दाखविण्यांत खर्च करणार. यापुढें स्वदेशाला ते भराभर चांगले दिवस दाखविणार. असले ते आजकालचे थोर पुरुष ' आहेत. बाळांनों, मी त्यांना नुसते 'थोर पुरुष थोर पुरुष' म्हणतों ही माझी चूक आहे, तीं नररत्नें आहेत.छे रत्नांची उपमा अगदींच अयोग्य. रत्नें कसलीं अगदीं मठ्ठ ! त्यांनाच संभाळायला दुसरा हवा. पण हीं नररत्नें स्वतःचा बचाव करून शिवाय आपणा सर्वांचा बचाव करूं शकतात. हे 'आजकालचे थोर पुरुष' खरोखर ईश्वराचे अंशच होत. हे ईश्वराचे अंशावतार आहेत यांत संशय नाहीं; हे आजकालचे थोर पुरुष आपणाला इतके प्रिय झालेले आहेत, कीं आपण त्यांना जीव कीं प्राण असें मानतों. यासाठीच असल्या या ' आजकालच्या थोर पुरुषां'ना मी आपले ' पंचप्राण ' असेंच म्हणतों. हे पांच आजकालचे अत्यंत थोर पुरुष ' महाराष्ट्राचे पंचप्राण ' आहेत. या महाराष्ट्राच्या पंचप्राणांची कथा मीं तुम्हांसाठीं लिहून आणली आहे. या महाराष्ट्राच्या पंचप्राणांपैकीं स्वार्थत्यागानें, देशभक्तीनें, विलक्षण धैर्यानें, अत्यंत साधेपणानें, अत्यंत शुद्ध वर्तनानें, अत्यंत साध्या राहणीनें व अत्यंत थोर बुद्धिवैभवानें ज्यानें आज चाळीस वर्षें आपणाला अगदीं आपलेसें करून घेतलें होतें व सर्वांकडून ' लोकमान्य ' हें पद मिळवून घेतलें होतें, तो थोर पुरुष आपलें नाशवंत शरीर मुंबापुरींत समुद्राचे वाळवंटावर टाकून, आपल्या अंतःकरणांत कायमचा

रहावयास आला आहे. लोक म्हणतात तो मेला. मी म्हणतों ‘ नाहीं. तो अमर झाला, तो चिरंजीव झाला. त्यानें मरणालाच मारून टाकलें. ’ बाळांनों, तुम्हांला कसें वाटतें ? शाबास ! माझ्याचप्रमाणें तुम्हांला वाटतें हें ऐकून माझ्या मनाला फारच आनंद होत आहे. खरोखरच हे थोर पांच पुरुष अमर झालेले आहेत. ते आपोआपच अमर झाले नाहींत. त्यांनीं आपलें शरीर स्वदेशसेवेंत झिजविलें आहे. त्यांनीं आपलें शरीर परोपकारासाठीं कष्टविलें आहे. त्यांनीं स्वतःचें सुख व चैन टाकून देऊन दुसऱ्यांचें दुःख दूर केलें आहे. त्यांनीं दुर्जनांना सज्जन करण्यासाठीं फार मेहनत घेतली आहे. त्यांनीं ज्ञान संपादन करून तें ज्ञान हजारों लोकांना दिलेलें आहे. त्यांनीं देशाची स्थिति सुधारली आहे. त्यांनीं आपल्या समाजाला सुधारण्याचा कसून प्रयत्न केला आहे. त्यांनीं मुलांना, मुलींना व थोरांना शिक्षण देण्यासाठीं शाळा, कॉलेजें, छापखाने, वर्तमानपत्रें व मासिकें काढलीं आहेत. लोकांनीं देवाला स्मरावें, भक्तिवान् व्हावें म्हणून मंदिरें तयार करून ठेविलीं आहेत. त्यांनीं आपली मायभाषा जोरदार व तेजस्वी बनविली आहे. त्यांनीं आपल्या भाषेला सुंदर बनविली आहे. लोकांचें मनोरंजन व्हावें म्हणून त्यांनीं सुंदर सुंदर चित्रें, रामलक्ष्मणांसारख्या थोर पुरुषांचीं चित्रें, शिवाजी महाराज, अकबर यांसारख्या थोर राज्यकर्त्यांचीं चित्रें, त्याचप्रमाणें अतिशय दूर राहणाऱ्या आपल्या हल्लींच्या प्रिय पंचम जॉर्ज बादशहांचीं चित्रें, त्याचप्रमाणें थोर दयाळू महाराणी व्हिक्टोरिया व एडवर्ड बादशहा यांचीं चित्रें आपणांला स्वस्त मिळावीं अशीही त्यांनीं तजवीज केलेली आहे. असे त्यांनीं आपल्यावर अनंत उपकार केलेले आहेत. त्यांनीं आपल्या सेवेस नेहमीं तत्पर असा **भारतसेवकसमाज** तयार करून ठेवला आहे. बाळांनों, त्यांच्या उपकारांचें वर्णन करावें तेवढें थोडेंच. यासाठीं विशेष सांगत न बसतां मी एवढेंच म्हणतों, कीं त्यांनीं आपल्या थोर कृत्यांनीं आपलें मन काबीज केलें आहे. अशा त्या थोर पुरुषांपैकीं सर्वांस पूज्य असलेले व सर्व ज्यांची सल्लामसलत

हरकामीं घेत असत अशा **न्यायमूर्ति माधवराव गोविंद रानडे** यांचें चरित्र मी आपणाला प्रथम सांगणार आहें. ते सर्वांत वयानें वडील व ज्ञानानेंही तसेच होते. त्यांनीं लो० टिळक, प्रिन्सिपाल आगरकर, वगैरेनां आपल्या स्वतःच्या मुलाप्रमाणें योग्य सल्लामसलत अतिशय प्रेमानें दिली. आपलें काम बाजूला ठेवून ते मोठ्या प्रेमानें त्यांचें स्वागत करीत. प्रेमानें शांतपणें त्यांचें म्हणणें ऐकून घेत व त्यांना पाहिजे असेल त्यासंबंधीं परिणामी हितकर असा त्यांना सल्ला देत असत व त्यांच्या कामांत नेहमीं त्यांना मनापासून उत्तेजन देत असत. त्यांचें कोठें चुकत असेल तर तें त्यांना कसें चुकत आहे तें समजावून सांगत व त्यांना योग्य मार्ग दाखवीत. अशा तऱ्हेनें त्यांचेंच नांव पुढें करून व आपलें नांव बिलकूल पुढें न येऊं देतां मोठमोठ्या संस्था त्यांचे नांवावर ते चालवीत. तसेंच दुसऱ्या अशाच थोर गृहस्थांना त्यांच्या त्यांच्या धंद्यांत योग्य उपदेश करीत. तोच धंदा स्वतःच्या फायद्याचा कसा करावा हें सांगत. आपल्या धंद्यापासून देशाचें हित कसें साधावें हें त्यांना गोडीगुलाबीनें, खुबीनें समजावून सांगावें असा त्यांचा नित्यक्रम असे. त्यांचा हतु हा, कीं आपण देशहित करावें व इतरांकडूनही देशहित करवून घ्यावें. अशा थोर संततुल्य **माधवरावजी रानडे** यांचें चरित्र सांगितल्यावर मी महातेजस्वी व स्वदेशाभिमानी **विष्णुशास्त्री चिपळुणकर** यांचें चारित्र सांगणार आहें. आपली मायभाषा मराठी हिला हल्लीचें उत्तम स्वरूप देण्यासाठीं त्यांनीं कसे जिवापाड परिश्रम केले, हें मी सांगणार आहें. मुलांना शिक्षण उत्तम मिळावें व थोडक्या खर्चांत मिळावें म्हणून आपल्या पोटास चिमटा देऊन त्यांनीं कशी योजना केली व त्या योजनेला हल्लीं सुंदर व भव्य स्वरूप कसें आलें आहे हें आपणांला दाखविणार आहें. त्यानंतर **लोकमान्य बाळ गंगाधर टिळक** यांचें चारित्र मी तुम्हांला सांगणार आहें. त्यांचेविषयीं मी काय काय सांगणार आहें हें सांगण्याची जरूर नाहीं असेंच ना म्हणतां? बरोबर आहे तुमचें म्हणणें, कारण तें तुम्हीं समजलांच असाल. त्यानंतर लोकमान्यांचे प्रेमळ सहकारी मित्र व बंधु ज्यांचें

स्मरण झालें म्हणजे लोकमान्यांचे डोळे पाण्यानें भरून येत असत अशा थोर प्रि. **गोपाळ गणेश आगरकरांचें** चरित्र मीं तुम्हांला सांगणार आहें. अंगांत घालायला फक्त एकच एक सदरा व रात्रीं वाचायला म्युनिसिपालिटीचा रस्त्यावरचा कंदील असळें ज्याचें दारिद्र्य असा गरीब पोरका मुलगा केवळ स्वतःच्या बुद्धिबळावर व परिश्रमावर अत्यंत विद्वान् कसा होतो, अत्यंत विद्वान् झाल्यावर कधींही न दिसलेली संपत्ति पायावर लोळत येत असतां केवळ लोकसेवेसाठीं मोहाला दूर करून व त्या संपत्तीला लाथ मारून मरे-पर्यंत कशी देशसेवा करीत रहातो, हें बाळांनों, **प्रि० आगरकरांच्या** चरित्रांत तुम्हांला दिसून येईल. यानंतर मी तुम्हांला **भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले** यांचें चरित्र सांगणार आहें. दैवानें गरिबींत जन्माला घातलें, बुद्धि देखील साधारण दिली, तरी देखील मनुष्य केवळ आपल्या स्वतःच्या मेहनतीनें डोंगराच्या पायथ्यापासून शिखरापर्यंत कसा भरा-भर चढत जातो, स्वजनांकडून कसें 'धन्य धन्य' म्हणवून घेतो, **चिपळुण-कर, टिळक व आगरकर** यांचा भक्त बनून स्वार्थावर कशी लाथ मारतो, निस्सीम देशप्रेम व कर्तव्यनिष्ठा यांनीं स्वदेशांत व सर्व जगांत कसा वंदनीय होतो व शेवटीं राजापासून रंकापर्यंत सर्वांचें प्रेम संपादन करून एकदम देह टाकून लोकहृदयांत कसा प्रवेश करितो, हें **नामदार गोखल्यांच्या** चरित्रांत बाळांनों, तुह्मांला पहावयास सांपडेल. असली ही मनोहर सुबोध कथा चित्त देऊन ऐका व त्यावरून चांगला बोध घेऊन आपलें मन व वर्तन पवित्र बनवा अशी आपली सर्वांची विनंति करून हें लांबलेलें हितगुज आतां पुरें करितों.

न्यायमूर्ति माधव गोविंद रानडे.

'दया क्षमा शांति तेथें देवाची वसति'

'तुका म्हणे तोचि संत सोशी जगाचे आघात'—तुकाराम

बाळांनों, विठोबारायाचे थोर भक्त तुकाराम महाराज यांचे अभं-गांचे दोन चरण वर दिले आहेत, त्यांत कितीतरी उत्तम तत्त्व अगदीं

सोप्या शब्दांनीं सांगितलें आहे बरें ! थोर देवभक्त तुकाराम महाराज म्हणतात ‘ जर तुम्ही मला देव कोठें आहे तो दाखवा पाहूं असें म्हणालां तर तो दाखविणें मला मुळींच कठीण नाहीं. ’ आतां बाळांनों, तुम्हीं म्हणालांत ‘ छे ! या कलियुगांत देव मुळींच दिसत नाहीं. ’ पण बाळांनों, एकतर सत्ययुग असो किंवा कलियुग असो सर्व युगें देवाचींच ना ? बरें मग एका युगांत देवानें मनुष्यांस दर्शन द्यावें व दुसऱ्या युगांत दर्शन देऊं नये असें बरोबर दिसतें का ? काय म्हणतां मुळींच दिसत नाहीं, बरोबर आहे. असें जर आपल्यासारख्या अल्प बुद्धीच्या मनुष्यांना वाटतें तर अतिशय दयाळू, अतिशय न्यायी, अतिशय बुद्धिवान् अशा देवरायाला असा पक्षपात मुळींच आवडावयाचा नाहीं हें सांगायालाच नको. बाळांनों, तुम्हीं संतचरित्रें वाचलीं असतीलच ? काय म्हणतां नाहीं वाचलीं, हरकत नाहीं. माझ्या प्रिय मित्रांनों, पुढें केव्हांतरी याच कलियुगांत झालेल्या संतांचीं चरित्रें मी तुम्हांला सांगेन. त्या संतांना देवानें दर्शन दिलें. फार लांब कशाला ? आपलें प्रेमळ साधु तुकोबाराय यांच्याशीं किती तरी वेळां देवानें हितगुज केलें. बाळांनों, तुम्हांला बऱ्याच सुट्या मिळतात होय ना ? त्या सुट्या तुम्हीं कशा घालवितां ? काय म्हणतां विटीदांडू खेळून व पत्त्यांचे डावचे डाव झिजवून ? बाळांनों, एकवेळ विटीदांडू, खो खो, असले शरीराला सडकून मेहनत देणारे खेळ खेळलेत तर चांगलें. पण बाळांनों, सोंगट्या, पत्ते, असले बैठे खेळ लहान मुलांना योग्य नाहींत, त्यांत व्यायाम होत नाहीं, त्यांनीं चलाखी येत नाहीं, त्यांनी प्रकृति सशक्त होत नाहीं. यासाठीं नेहमीं विटीदांडू, खोखो, लगोऱ्या, क्रिकेट, फुटबॉल, आट्यापाट्या असले शरीराला कणखर व सशक्त बनविणारे खेळ खेळा. पण बाळांनों, सर्वच सुट्या खेळांत घालविणें बरोबर नाहीं. कांहीं सुट्या आपण आपल्या गांवापासून फार दूर नसतील अशीं साधुपुरुषांनीं पवित्र केलेलीं क्षेत्रें पाहाण्यांत घालवाव्या हें चांगलें. बाळांनों, अशीं पुण्यस्थळें अथवा क्षेत्रें म्हटलीं म्हणजे तुकोबारायांचें देहू, ज्ञानेश्वरमहाराजांचें

आळंदी, रामदास स्वामिमहाराजांची परळी ऊर्फ सज्जनगड, देवांचें चिंचवड, सखारामबोवांचें कल्याणजवळचें कवाड व असलींच दुसरीं क्षेत्रें पहा. हीं पुण्यस्थळें पाहण्यास फार वेळ किंवा फार पैसा लागत नाहीं. व तीं प्रत्यक्ष पाहिलीं म्हणजे त्या त्या साधुपुरुषांचें सर्व चरित्र आपल्यापुढें उभें रहातें. येथील लोक त्या संतांच्या पुष्कळ गोष्टी आपणाला सांगतात. यामुळें आपलें मन पुण्यमय होतें, पवित्र होतें, त्या संतांसारखें आपण व्हावें असें वाटतें. हा केवढा बरें फायदा ! आतां याला थोडासा खर्च होईल हें खरें. तुम्हांपैकीं कांहीं म्हणतील हा खर्च करणें आमच्या शक्तीच्या बाहेरचें आहे. पण मी अगदीं नम्रपणानें बाळांनों, तुम्हाला विचारतों, कीं शरीरप्रकृति खात्रीनें बिघडविणारा रोजचा चहाचा एकच प्याला कां होईना तसला तो नुकसानकारक पेला घेण्याला व त्याच्या पाई दरमहा दोन रुपये डोईपटी भरण्याला मात्र तुम्हांला शक्ती आहे. नाहीं बरें ? कां बरें, आतां कां लाजलां ? असो. खरा प्रकार इतका चटकन तुमच्या लक्षांत आला हें खरोखर सुचिन्हच आहे. बाळांनों, तर मग याच तो चहाचा नाद टाकून व तो सोडल्यामुळें जे पैसे वांचतील, त्यांतले थोडे पैसे ' संतदर्शन फंड ' असें जिच्यावर नांव आहे अशा एखाद्या घरींच तयार केलेल्या पेटींत टाका. त्याचप्रमाणें वडिलांनीं किंवा नातलगांनीं प्रेमानें खाऊसाठीं दिलेले पैसे देखील याच पेटींत टाका म्हणजे शाळेला सुटी झाल्यावर संत-दर्शनासाठीं तुम्हांला पुरेसे पैसे सहज त्या पेटींत सांपडतील. अशा तऱ्हेनें चहाचें व्यसन सुटल्यामुळें तुमची प्रकृति सुधारेल, शहरापासून दूर मोकळ्या हवेंतून प्रवास केल्यामुळें तुमचें शरीर जोमदार, निरोगी, काटक व सशक्त बनेल व संतांच्या दर्शनानें मन सुप्रसन्न व सद्गुणी बनेल. असो. बरेंच विषयांतर झालें, तेव्हां आतां मुख्य विषयाकडे वळूं. मी काय म्हणत होतों, कीं देव या कलियुगांतही दिसतो, मात्र आपण आपलें मन अतिशय पवित्र बनविलें पाहिजे. बाळांनों, ज्यांनीं आपलीं मनें व शरीरें सुविचारांनीं, सत्कृत्यांनीं व सद्गुणांनीं अगदीं निर्मळ व

पवित्र बनविलीं आहेत, त्यांच्या मनांत देव रहातो. त्यांचें मन म्हणजे देवाचें फार आवडतें मंदिर, ही गोष्ट मीं तुम्हांला कृष्णचरित्रांत सांगितलीच आहे. आतां बाळांनों, तुमच्यापैकीं जे आपलें वर्तन अतिशय शुद्ध ठेवतीऌ, दुर्गुणांचें वारेंही स्वतःला लागूं देणार नाहींत, पवित्र विचारांनीं, सत्कृत्यांनीं व सद्गुणांनीं जे आपलें शरीर व मन अतिशय सुंदर, निर्मळ व पवित्र बनवितीऌ त्याचे हृदयांत देव येऊन राहील. आतां देव ज्यांच्या हृदयांत नेहमीं राहातो त्यांचें दर्शन झालें म्हणजे देवाचेंच दर्शन झालें, खरें ना ? तर मग हल्लीं देखील अशा पुण्यवान् पुरुषांचें आपल्याला दर्शन होतें म्हणजे अर्थांत देवाचेंही दर्शन होतें. शिवाय देवरायाच्या मूर्तीचें दर्शन मंदिरांत जाऊन घेतल्यानेंही मन पवित्र होतें. असो. तेव्हां ‘ दया क्षमा शांति, तेथें देवाची वसती ’ हें जें तुकाराम महाराजांनीं म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. तेव्हां देव कोठें राहातो हें तुम्हांला समजलें. आतां संत कोणाला म्हणावें हें तुकारामबोवांनीं सांगितलें आहे; ते म्हणतात ‘ तुका म्हणे तोची संत सोशी जगाचे आघात ’ म्हणजे जगांतील लोकांनीं जरी अतिशय निंदा केली, त्रास दिला, टवाळी केली, वाटेल तसा छळ केला, खोटेंच आरोप केले तरी हें सर्व शांतपणें जो सोसतो तोच संत. असल्या तऱ्हेचे एक संत, अगदीं अलीकडे या आपल्या महाराष्ट्रांत होऊन गेले. त्यांनीं स्वदेशाची स्थिति सुधारण्यासाठीं फार मेहनत घेतली, शरीर झिजविलें, स्वधर्माचा उत्कर्ष करण्यासाठीं अतोनात खटपट केली, दुसऱ्याचें दुःख निवारण्यासाठीं व संकटांत सांपडलेल्यांना मदत करण्यासाठीं नेहमीं तत्परता दाखविली. देशाची स्थिति सुधारण्यासाठीं अनेक चळवळी व अनेक संस्था आपल्या बुद्धिबलानें व मेहनतीनें निर्माण केल्या, परंतु आपलें नांव बिलकूल पुढें येऊं दिलें नाहीं. हे संत दया, क्षमा व शांती यांचें जणूं काय माहेरघरच होतें. आणि म्हणूनच तुकारामबोवांच्या अभंगवाणीप्रमाणें त्यांच्याजवळ देव नेहमीं वसती करीत होता. असले थोर सत्पुरुष कोण म्हणाल तर

सांगतों ऐका. त्यांचें नांव **न्यायमूर्ति माधव गोविंद रानडे.** या थोर पुरुषाचें चरित्र तुम्हांला अतिशय बोधपर होईल यासाठीं तें आतां मी तुम्हांला अगदीं सोप्या भाषेंत सांगतों. तें तुम्हीं अगदीं चित्त देऊन ऐका व त्या चारित्रापासून उत्तम बोध घेऊन आपलें चरित्र तसेंच चांगलें बनविण्याचा प्रयत्न करा.

माधवरावांचे पूर्वज.

बाळांनों, आपल्यांत एक सर्वसाधारण म्हण आहे. कीं ' खाण तशी माती. ' म्हणजे आईबाप, आजाआजी जशीं असतील तशीं मुलें किंवा नातवंडें व्हावयाचीं. साधारणपणें हा नियम खरा ठरतो. आपले चरित्रनायक **माधवराव** हे एवढे थोर कसे झाले, एवढे देशभक्त कसे झाले, हें समजण्यासाठीं त्यांच्या पूर्वजांची थोडीशी हकीगत सांगणें अवश्य आहे म्हणून ती तुम्हांला थोडक्यांत सांगतों. **रानडे** घराणें हें मूळचें कोंकणांतलें. त्यांचें मूळ गांव भोभारपाचोरी. हें गांव रत्नागिरी जिल्ह्यांत चिपळूण तालुक्यांत आहे. हें अगदीं लहानसेंच आहे, पण येथील हवा फारच चांगली आहे व पाणी अतिशय रुचिकर व पाचक आहे. येथील घरें बागांनीं सुशोभित आहेत. या बागांत सुंदर पोफळींचीं सरळ व उंच झाडें डोळ्यांना फार आनंद देतात. त्याचप्रमाणें या बागांत नारळीचींही पुष्कळ झाडें आहेत. नारळीच्या झाडांना कोंकणांत माड असें म्हणतात. याशिवाय प्रत्येकाच्या घराभोंवतीं आंबराई असायचीच. या गांवांतील ईश्वरानें निर्माण केलेले व झुळझुळ वहाणारे स्वच्छ, शुद्ध व पाचक पाण्याचे झरे, तीं सुंदर पोफळींचीं, माडांचीं व आंब्याफणसांचीं झाडें, कुंपणावरून फुलांनीं भरलेल्या वाऱ्याच्या झुळकेबरोबर खेळत असलेल्या हंसणाऱ्या वेली, तेथील गांवकऱ्यांना प्रफुल्लित करितात, त्यांचीं शरीरें ताजींतवानीं करतात; व त्यांचीं मनें आनंदानें दुमदुमून टाकतात. यामुळें जरी कोंकण अगदीं गरीब आहे तरी तें सृष्टिदेवीचें लाडकें बाळ आहे, सृष्टिदेवी-

च्या मांडीवर तें खेळत आहे, सृष्टिदेवीपासून तें दूर पळालें नाहीं. यामुळें या सृष्टिदेवीच्या बाळांना सृष्टिदेवी अतिशय बुद्धिवान् बनविते. बाळांनों, हें मी म्हणतों याला माझेजवळ भरभक्कम पुरावा आहे. आपले **न्यायमूर्ति माधवराव** हे याच सृष्टिदेवीच्या रम्य मोभारगांवच्या घराण्यांत झाले. आपल्या अलौकिक बुद्धीनें, लोकोत्तर स्वार्थत्यागानें, अत्यंत देशप्रेमानें लोकमान्य झालेले **लो. बळवंतरावजी टिळक** याच कोंकणांत रत्नागिरीस जन्मले. खरोखर असलें नररत्न निर्माण करून रत्नागिरीनें रत्नांचा गिरी म्हणजे रत्नांचा पर्वत हें आपलें नांव खरें करून दाखविलें. येथील सर्व परीक्षांत आपल्या बुद्धिवैभवानें पहिला नंबर पटकावून विलायतेंत जाऊन सर्व जगांतील गणित्यांना जिंकून पहिला नंबर पटकावणारे **सिनीअर रँगलर परांजपे** याच कोंकणानें आपल्याला दिले आहेत. बाळांनों, अशीं उदाहरणें देत गेलों तर त्यांचाच एक ग्रंथ होईल. यासाठीं एवढींच उदाहरणें देऊन आपल्या चरित्रनायकाकडे वळतों. आपल्या **माधवरावांचें** निपणजे भगवंतराव या मोभारगांवाहून पंढरपुराजवळ करकंब म्हणून गांव आहे तेथें येऊन राहिले. त्यांनीं सुप्रसिद्ध देशभक्त **नानाफडणीस** यांचें भविष्य अगदीं बरोबर वर्तविलें, यामुळें फडणीस नाना अगदीं आश्चर्यचकित झाले. या भगवंतरावांना भास्कर नांवाचा मुलगा झाला. हे भास्करराव फार प्रामाणिक, बुद्धिवान् व शूर निघाले. त्यांनीं मोठ्या शौर्यानें पटवर्धनी सैन्यांत हुद्देदार होऊन एक किल्ला सर केला. या भास्កररावांच्या मुलाचें नांव अमृतराव. हेच आपल्या चरित्रनायकाचे आजोबा, या अमृतरावांनीं आपल्या हुशारीनें पुणें जिल्ह्यांत मामलेदारीचा हुद्दा मिळविला. या अमृतरावांना चार मुलगे होते. त्यांचीं नांवें बळवंतराव, गोविंदराव, गोपाळराव, व विष्णुपंत. यापैकीं गोविंदराव हे आपल्या चरित्रनायकाचे वडील. हे गोविंदरावही अतिशय करारी, हुषार व धर्मशील होते. ते आपल्या अंगच्या हुषारीनें चढतचढत कोल्हापूर सरकारचे

खाजगी कारभारी झाले. तेव्हां त्यांना दरमहा २५० रुपये पगार मिळत असे.

या गोविंदरावांचे चिरंजीव म्हणजे आपले चरित्रनायक. यांचा जन्म माघ शुद्ध ६ शके १७६३ म्हणजे ता० २८ जानेवारी सन १८४२ रोज मंगळवार या दिवशीं संध्याकाळीं झाला. आपल्या चरित्रनायकाच्या आईचें नांव गोपिकाबाई असें होतें.

माधवरावांचें बाळपण.

प्राणसंकट.

आपल्यांत एक म्हण आहे कीं, ' दैव तारी त्याला कोण मारी, ' याच अर्थाची संस्कृतांतही एक म्हण आहे ती· ही:– " अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितं " या म्हणीचा खरेपणा बाळांनों, आतां मीं सांगतों त्या गोष्टीवरून तुम्हांला कळून येईल. आपले चरित्रनायक अगदीं लहान म्हणजे केवळ दोन अडीच वर्षांचे होते त्यावेळची गोष्ट. आपल्या चरित्रनायकाची आई, त्यांना व त्यांच्या धाकट्या बहिणीला बरोबर घेऊन बैलगाडींत बसून निफाडाहून आंबेगांवास येण्यास निघाली. बैलगाडीच्या मागून आपल्या चरित्रनायकांचे चुलत चुलते विठूकाका घोड्यावरून येत होते. हा प्रवास रात्रीं करावा असें ठरलें. कारण ते कडक उन्हाळ्याचे दिवस होते. ही मंडळी निघाली ती काळोखी रात्र होती. बैलगाडींतील मंडळी बरीच रात्र झाली तशी झोंपी गेली. बैल आपले मनाप्रमाणें गाडी ओढीत चालले होते. रात्रीचे दोन वाजण्याचा सुमार होता. त्यावेळीं मोठी उतरण लागल्यामुळें बैलांनीं अतिशय वेगानें गाडी एकदम ओढीत नेली. त्या झटक्यासरशीं पांघरुणांत गुरफटून निजलेलें हें माधव बाळ एकदम पांघरुणासकट खालीं पडलें. माधवबाळाची आई गाढ झोंपी गेली होती. यामुळें ही गोष्ट त्या बिचारीला समजली नाहीं.

गाडीच्या खडखडाटामुळें मूल पडल्याचा आवाज गाडीवानास ऐकूं आला नाहीं. गाडी तशीच मैल दोन मैल पुढें गेली. मागून बऱ्याच अंतरावरून विठूकाका घोड्यावरून येत होते. त्यांच्या घोड्यांच्या टापांचा आवाज रस्त्यावर पडलेल्या या दोन वर्षांच्या माधव बाळानें ऐकला व बाळ विठूकाकांना म्हणाला ' काका, काका मी येथें पडलों आहें. ' हे शब्द कानीं पडतांच विठूकाकांनीं घोड्यावरून झटकन् खालीं उडी मारली व तें गारठलेलें गरीब बिचारें बाळ आपल्या उबदार पांघरुणांत गुरफटून घेतलें व ते पुनः घोड्यावर बसले. नंतर भरधांव घोडा फेंकून त्यांनीं ती बैलगाडी गांठली व माधव बाळाच्या आईस हाक मारून म्हणाले, ' गोपिकावहिनी गाडींत सर्व ठीक आहेना ? ' गोपिकावहिनी अर्धवट झोंपेंत म्हणाल्या ' ठीक आहे. ' तेव्हां विठूकाका पुनः म्हणाले, ' दोनही मुलें तुमच्याजवळच आहेतना ? ' हे शब्द ऐकतांच गोपिकावहिनी झटकन उठल्या व इकडे तिकडे चांचपून पहातात तों माधव नाहीं. हें समजतांच त्या अतिशय रडूं लागल्या. तेव्हां पोटाशीं घेतलेलें तें माधव-बाळ विठूकाकांनीं गोपिकावहिनींजवळ दिलें, व ' आज परमेश्वरानें केवढी कृपा केली ! ' असें ते म्हणाले.

स्वभाव.

बाळांनों, आपले चरित्रनायक माधवराव यांचा स्वभाव लहानपणापासून अगदीं सरळ, निष्कपट, न्यायी व दयाळू होता. लहानपणीं ते जरासे हट्टीही होते. त्यांच्या बाळपणांतील स्वभावदर्शक कित्येक मजेदार गोष्टी त्यांच्या सुशील सहधर्मचारिणी परमपूज्य श्रीमंत वहिनी-बाईसाहेब यांनीं आपल्या ' आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी ' या अत्यंत सुंदर पुस्तकांत लिहून ठेविल्या आहेत. त्या बाळांनों, तुम्हांला अतिशय बोधपर व मनोरंजक वाटतील अशी खात्री वाटते म्हणून खालीं देतों:—

निरभिमानदर्शक गोष्ट.

कोल्हापूर शहरांत कीर्तने माडीवर व रानडे तळमजल्यावर असे एका घरांत रहात असत. या दोनही कटुंबांतील लहानथोर सर्व माणसें

अगर्दी एका कुटुंबांतील प्रेमळ माणसांसारखीं रहात असत. सणवार एकत्र करीत असत. दुरून पहाणाराला हें एकच कुटुंब आहे असें वाटत असे. कीर्तन्यांचीं मुलें लहानपणापासून हुषार व तरतरीत. पण रानड्यांचा माधव आपला अगदीं थंड व धिमा. त्याला कांहीं समजत नसे. धड निरोपही सांगतां यावयाचा नाहीं. शाळेंत परीक्षा झाली म्हणजे कीर्तन्यांचीं मुलें ‘ आम्हीं पास झालों, आम्हांला परीक्षक असें असें म्हणाले ’ वगैरे किती तरी घरीं येऊन सांगत. पण माधवाचें असें कांहींच नाहीं. माधव स्वतः ‘मी पास झालों !’ असेंसुद्धां कधींच सांगत नसे. कीर्तन्यांच्या मुलांकडून हा पास झाला हें समजायचें. ‘अरे माधवा, तूं पास झालास हें आम्हांला नाहीं कुठें सांगितलंस, ’ असें घरच्या माणसांनीं म्हटलें तर माधव म्हणे ‘ त्यांत काय सांगायचें आहे ! रोज शाळेंत जाऊन आम्ही अभ्यास करतों तर पास होणारच; त्यांत काय जास्त आहे ! ’

सरळ एकमार्गीपणाची गोष्ट.

माधवराव लहानपणापासून सरळ व एकनादी असत. त्यांना डावपेंच मुळींच माहीत नसत. एकदां एका गोष्टीला आरंभ केला कीं, ती आपली ह्यांनीं करायचीच. त्याबद्दल पुनः त्यांना सांगावें लागत नसे. पण त्यांत कोणीं अडथळा केला, कीं हट्ट धरून हे रडत बसायचे; मग समजूत लवकर व्हावयाची नाहीं. पहिल्यांदा धुळाक्षरांच्या शाळेंत घातल्यावर शाळेंतून आलेन् आले, कीं घरीं सारा दिवस तेच आपल्याशीं हळूहळू बडबडत बसत, व बोटानें भिंतीवर अक्षरें व उजळणी काढीत रहावयाचे. हीच यांची करमणूक व हाच यांचा खेळ. रस्त्यांत देखील हे धुळींत उजळणी काढीत बसत.

एकमार्गीपणाची आणखी एक गोष्ट.

माधवरावांची मुंज अगदीं लहानपणीं झाली. तेव्हां ते मराठी शाळेंत शिकत असत. शाळा सकाळीं असे. शाळा दहा वाजतां सुटत

असे. वय लहान असल्यामुळें दहा वाजेपर्यंत भूक फार लागत असे. यामुळें माधव घरीं येतांच भूकभूक करणार हें त्याच्या आईस ठाऊक असे. यामुळें माधवबाळासाठीं त्याची आई दशमी करून ठेवीत असे. व माधव घरीं येतांच दशमीवर तूप घालून त्याला देत. एके दिवशीं नुकतें ताक केलें होतें. लोणी कढविलें नव्हतें, म्हणून आईनें दशमीवर लोणी घातलें. झालें. गेली बाळाची मर्जी. माधव हट्ट धरून बसला, कीं रोजच्यासारखें पातळ तूप वाढ. 'तूप कढविलें नाहीं उद्यां वाढीन,' म्हणून आईनें पुष्कळ सांगितलें, पण नाहीं. तेव्हां आईनें तुपाच्या तांबलींत चमचाभर पाणी घालून ती चुलींत ऊन केली व तांबली दशमीवर ओतली, त्याबरोबर याची समजूत होऊन यानें मुकाट्यानें दशमी खाल्ली. दशमीवर पाणी वाढलें हें कांहीं स्वारीच्या लक्षांत आलें नाहीं. वासबीस कोण पहातो, कारण हे पडले एकमार्गी.

थाटामाटाचा तिटकारा.

माधवराव नेहमीं साधा पोषाख करीत व अगदीं साधेपणानें रहात. त्यांना डामडौल किंवा नटवेपणाचा अगदीं कंटाळा असे. हा गुण त्यांचे आंगीं अगदीं लहानपणापासून होता. एकदां एका सणाला त्यांचे आईनें हें लहान बाळ म्हणून मोठ्या हौसेनें सोन्याचा गोफ, सोन्याचीं कडीं व हिऱ्याची आंगठी यांचे अंगावर घातलीं. हें स्वारीला बिलकूल आवडलें नाहीं. पण आईची अवज्ञा होईल म्हणून हें स्वारीनें कसें तरी सहन केलें. पण आपल्या गळ्यांतला गोफ कोणाला दिसूं नये म्हणून स्वारीनें त्यावरून धोतर गुंडाळलें, कडीं बंडीच्या बाहींत मागें सरकून ठेवलीं, व आंगठीचा हिरा पुढें वळवून हाताची मूठ वळवून आंगठी कोणालाही दिसूं नये असें केलें. वडील माणसांनीं हें पाहिलें व 'तूं असें कां बरें करतोस' असें विचारिलें, तेव्हां स्वारीनें सांगितलें, 'आपल्या घरीं माधुकरी येतात त्यांना कुठें असतात दागिने, मग आपणच कशाला घालावे?' किती ही साधेपणाची हौस!

विलक्षण न्यायीपणाची गोष्ट.

रानड्यांच्या कुटुंबांत दरवर्षी कोजागिरीला रात्रीं दोन वाजे-पर्यंत मुलांना सोंगट्या खेळण्याची परवानगी होती. माधवरावाला नुकतेंच सहावें वर्ष लागलें होतें त्या सुमारास कोजागिरी आली. त्या दिवशीं माधव व त्याची धाकटी बहीण दुर्गाताई हीं दोनच मुलें घरांत होतीं. त्या दोघांपैकीं दुर्गाताई ९ वाजतांच निजली. माधवाचें जेवण झालें व दरवर्षीप्रमाणें आपण आज सोंगट्या खेळत दोन वाजेपर्यंत जागावें असें त्याला वाटलें. म्हणून त्यानें सोंगट्या खेळा-वयास मागितल्या, तेव्हां आईनें विचारलें; 'अरे तूं खेळणार कोणाबरोबर? दुर्गादेखील निजली!' तेव्हां माधव म्हणाला 'कोणीच खेळावयाला नाहीं तर मग मी आपला खांबाबरोबर खेळेन.' आणि खरोखरच स्वारीनें खांबाबरोबर खेळण्यास आरंभ केला. बाळांनों, तुम्ही म्हणाल हें कांहीं तरी सांगतां. खांब कसा खेळेल? त्याला का हात आहेत? हात नाहींत हें खरें. पण माधव पडला मोठा कल्पक. त्यानें आपला उजवा हात खेळण्यासाठीं खांबाला उसना दिला व आपला डाव माधव डाव्या हातानें खेळूं लागला. खांबाचा डाव माधव उजव्या हातानें खेळे व आपला डाव्या हातानें खेळे. शेवटीं खांबानें माधवावर दोन बिन तोडी दिल्या. खांब कांहीं बोलत नव्हता, तरी पण खांबानें आपला पराभव केला हें माधवानें सर्वांचे जवळ कबूल केलें. असला हा माधव मोठा न्यायप्रिय होता; म्हणूनच माधवाचे पुढें जगद्विख्यात न्यायमूर्ति माधवराव गोविंद रानडे बनले. पोराचे पाय पाळण्यांत दिस-तात ते असे.

माधवाचा विद्याभ्यास.

आपल्या वयाच्या चवदाव्या वर्षापर्यंत माधवानें कोल्हापुरासच अभ्यास केला. नंतर त्याला पुढील अभ्यासासाठीं मुंबईस १८५६ सालीं ठेविलें. तेथें एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट नांवाची फारच उत्तम इंग्रजी शाळा

होती. त्यांत माधव शिकावयास जाऊं लागला. पहिल्यापासूनच तेथें माधवाचा पहिला नंबर असे. त्याला पहिल्या वर्षी दहा, दुसऱ्या वर्षी पंधरा व तिसऱ्या वर्षी वीस रुपये अशी स्कालरशीप होती. मुंबईस आल्यापासून तीनच वर्षांत माधव मॅट्रिक्युलेशनचे परीक्षेंत पास झाला व त्या परीक्षेंत त्याचा पहिला नंबर आला. बाळांनों, हें कशाचें फळ बरें ? बाळांनों, हें माधवाच्या एकाग्रतेचें फळ. कोणत्याही गोष्टींत मन घातलें म्हणजे दुसरा कोणताही विषय मनांत येऊं द्यावयाचा नाहीं असा माधवाचा नियम असे. नाहींतर तुम्ही. इकडे भूगोल घोकणें चाललें आहे तोंडानें, तर तिकडे रस्त्यांत कोण जातो येतो आहे इकडे सारें लक्ष्य. मग पाठ कितपत होईल तें दिसतेंच आहे. असा अभ्यास करून पहिला नंबर येत नसतो. अभ्यास करावयास बसलेत म्हणजे बाळांनों, अभ्यासाशिवाय दुसऱ्या कशाकडेही तुमचें लक्ष जातां उपयोगी नाहीं. असो. १८५९ सालीं अशा तऱ्हेनें मॅट्रिक झाल्यावर आपले माधवराव कॉलेजचा अभ्यास करूं लागले. कालेजांत त्यांना प्रथम दरमहा साठ व नंतर १२० रुपये फेलोशिप मिळत असे. कालेजांतीलही सर्व परीक्षांत त्यांचा पहिला नंबर असे. ते १८६२ त बी. ए. ची व ऑनर्सची परीक्षा पास झाले व त्यांत त्यांना सोन्याचें पदक व दोनशें रुपयांचीं पुस्तकें बक्षीस मिळालीं. नंतर १८६४ सालीं ते एम्. ए. झाले. बी. ए. झाल्यावर दोन वर्षें नवीनच इंदुप्रकाश नांवाचें पत्र निघालें होतें त्याचे त्यांना संपादक नेमिलें. त्यांच्या उत्तम लेखांनीं तें पत्र अतिशय लोकमान्य झालें. एम्. ए. झाल्यावर माधवराव एल्फिन्स्टन कॉलेजांत प्रोफेसर झाले व शिवाय एलूएलू. बी. चाही अभ्यास करूं लागले. एलूएलू. बी. च्या परीक्षेंतही त्यांचा पहिला नंबर आला. याच वेळीं एल्फिन्स्टन कॉलेजांत त्यांनीं इतके उत्तम तऱ्हेनें शिकविलें, कीं तेथील विद्यार्थी, प्रोफेसर व प्रिन्सिपाल यांनीं त्यांना सन्मानपूर्वक एक तीनशें रुपयांचें सोन्याचें घड्याळ बक्षीस दिलें.

नोकरी.

अशा रीतीनें लोक व सरकार माधवरावांची विलक्षण बुद्धिमत्ता पाहून आश्चर्यचकित झाले. दोघांनाही असली अलौकिक बुद्धि आपल्या उपयोगीं पडावी असें वाटलें. माधवरावजी दोघांच्याही अतिशय उपयोगीं पडले व दोघांचेंही यामुळें त्यांच्यावर विलक्षण प्रेम जडलें. बाळांना, संस्कृत भाषेंत ' नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ' असें एका कवीनें म्हटलें आहे. त्याचा अर्थ ' एकाच मनुष्याच्या हातून राजा व प्रजा यांची सेवा होणें आतिशय कठीण ' असा आहे. परंतु असल्या दुर्लभ माणसांपैकींच बाळांनों, आपले माधवराव होते म्हणूनच त्यांनीं राजा व प्रजा या दोघांकडून धन्य धन्य म्हणवून घेतलें. असो. वर सांगितलेंच आहे, कीं माधवरावांची अलौकिक बुद्धि सरकारनें आपल्या कामास उपयोगीं पडावी असें मनांत आणलें, आणि लगेच त्यांनीं १८६६ सालीं माधवरावांची एकदम दोनशें रुपये पगारावर ऑक्टिंग मराठी ट्रॅन्स्लेटर या जागेवर नेमणूक केली. नंतर त्यांना अक्कलकोटच्या कारभाऱ्याची जागा मिळाली. पण तेथून उचलून कोल्हापूर सरकारानें त्यांना आपलें मुख्य न्यायाधीश नेमिलें. पुनः इंग्रज सरकारानें १८६८ सालीं त्यांना एल्फिन्स्टन कॉलेजांत ४०० रुपयांवर इंग्लिशचे प्रोफेसर नेमिले. हिंदी मनुष्याला इंग्लिशचा प्रोफेसर नेमणें म्हणजे कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. अशा रीतीनें मुंबईस राहावयास सांपडतांच माधवरावांनीं प्रोफेसरचें अवघड काम उत्तम तऱ्हेनें करून शिवाय त्याच वेळीं ॲडव्होकेटच्या परीक्षेचा अभ्यास केला; व त्या परीक्षेंतही त्यांनीं उत्तम यश मिळविलें. वेळांत वेळ काढून अनेक कामें करण्याची माधवरावांची हातोटी बाळांनों, तुम्हीं नीट लक्ष्यांत ठेवा. म्हणजे आईनें कांहीं काम सांगितलें, कीं आईच्या कामामुळें माझा अभ्यास बुडाला, नंबर खालीं गेला, परीक्षा नापास झाली, अशी कुरकूर तुम्हीं कधींही करणार नाहीं. १८७१ पर्यंत मुंबईस ४०० रुपयांवर इंग्लिशचे प्रोफेसरचें काम केल्यावर त्यांची कायद्यांतील हुशारी लक्ष्यांत घेऊन

सरकारनें त्यांना एकदम दरमहा आठशें रुपयांवर पुण्यास फर्स्टक्लास सबजज्ज नेमिलें. यानंतर त्यांना स्पेशल जज्जाची जागा मिळाली व इ० स० १८९२ सालीं मुंबई हायकोर्टांत न्यायाधीशाची जागा त्यांची थोर योग्यता लक्ष्यांत आणून सरकारांनीं त्यांना दिली. या थोर पदावर माधवरावजींनीं १९०१ पर्यंत उत्तम तऱ्हेनें काम केलें. त्यांनीं हायकोर्टजज्ज या नात्यानें हिंदू लॉ अथवा हिंदूंचा कायदा पुष्कळच सुधारला. निरनिराळ्या स्मृति व त्यावरील टीका यांचा नीट अर्थ लावून दत्तविधानासंबंधीं पुष्कळच इष्ट सुधारणा घडवून आणल्या. हें काम कांहीं सोपें नव्हतें. त्यासाठीं निरनिराळ्या स्मृति वाचणें अतिशय जरूर होतें. त्याशिवाय जुनी अर्थ लावण्याची पद्धति निरनिराळ्या शब्दांचा जुना अर्थ ह्या सर्वांचें मनन करणें अत्यंत जरूर होते. हे कष्टाचें काम स्वजनांचें हित करण्यासाठीं त्यांनीं केलें, नाहीं तर मागच्या निकालाप्रमाणें पुढें निकाल देणें हें फारच सोपें होतें. बरें इतके श्रम घेतल्यावर तरी न्यायमूर्तींनीं—कारण आतां माधवरावांना न्यायमूर्ति असेंच म्हणणें योग्य आहे—आणखी त्रास घ्यावयाचा नव्हता. पण स्वजनांबद्दलची कळकळ त्यांना थोडकीच स्वस्थ बसूं देणार होती ? त्यांनीं आपल्या मातृभाषेचा म्हणजे मराठीचा शिरकाव युनिव्हर्सिटीच्या सर्व परीक्षांत व्हावा म्हणून जिवापाड मेहनत केली व त्यामुळें त्यांची प्रकृति इतकी बिघडली कीं ती पुनः कांहीं ताळ्यावर आली नाहीं. त्यांचें नेहमीं एक म्हणणें असे कीं 'That is proper death while working' म्हणजे हंतरुणावर पडून व्यर्थ आयुष्य कंठीत झिजत झिजत मरण्यापेक्षां आपलें काम बजावीत असतां मरणें हेंच योग्य ?

या बाबतींत त्यांच्या इच्छेप्रमाणेंच झालें. स्वदेशाच्या व स्वजनांच्या सेवेंत देह झिजवीत असतांच त्यांना सन १९०१ च्या जानेवारींत शांतपणें मरण आलें. त्यांच्या मरणाची बातमी समजतांच सर्व हिंदुस्तान दुःखांत बुडून गेलें. विद्यार्थ्यांविषयींच्या त्यांच्या कळकळीमुळें

कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं त्यांचें प्रेत स्वतः वाहून नेण्याचा हट्ट धरला. व त्याप्रमाणें त्यांनीं केलें. सर्व जगांतून दुःखाच्या तारांचा नुसता वर्षाव झाला. त्यांच्या सुशील व त्यांच्याप्रमाणेंच थोर व स्वदेशसेवेंत नेहमीं गढून गेलेल्या त्यांच्या पत्नी श्री. रमाबाईसाहेब रानडे यांना राजे-लोकांपासून तों रंकापर्यंत सर्वांकडून सहानुभूतीचे संदेश आले. स्मशान-भूमि सर्व धर्मांच्या, व सर्व दर्जांच्या लोकांनीं अगदीं गजबजून गेली होती. निरनिराळया शाळांतील हजारों मुलें यासाधु पुरुषाचें शेवटचें दर्शन घेण्यासाठीं व त्यांना वंदन करण्यासाठीं आली होती. गव्हर्नरसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं टाऊनहॉलमध्यें मुंबईस प्रचंड सभा भरली व थोरथोरांनीं न्यायमूर्तींचें गुणवर्णन करून त्यांचे वियोगानें झालेलें दुःख निवेदन केलें.

बाळांनों, इतका वेळ न्यायमूर्तींच्या चरित्राचें माझ्या अल्पबुद्धीप्रमाणें मीं वर्णन केलें. आतां त्यांच्या निरानिराळ्या देश-हिताच्या कामागिरीबद्दल व ती आपल्याला कशी अत्यंत फायदेशीर झाली आहे त्याबद्दल थोडेसें सांगणार आहें. नंतर बाळांनों त्यांच्या चरित्रापासून तुम्हीं कोणत्या गोष्टी शिकाव्या तें सांगणार आहें. तें तुम्हीं पुनः पुनः वाचून त्याप्रमाणें वागा म्हणजे देव तुमचें कल्याण करील. तुमचे देशबंधू, आईबाप व नातलग तुमच्यावर प्रेम करतील व राजापासून रंकापर्यंत सर्व तुमची कीर्ति गातील.

न्यायमूर्ति यांची धार्मिक कामगिरी.

लहानपणापासून न्यायमूर्ति फार श्रद्धाळू व भक्तिमान होते. त्यांना साधुसंतांचे अभंग घोळून घोळून म्हणण्याची व ते म्हणत असतां अगदीं तल्लीन होण्याची संवय असे. मोठ्या पहांटेस म्हणजे तीन चार वाजतां उठून तुकोबारायांचे अभंग मोठ्या प्रेमानें घोळून घोळून नेहमीं ते म्हणत असत व अभंग म्हणत असतां भक्तीच्या प्रेमानंदानें त्यांचें अंतःकरण इतकें भरून जाई, कीं त्यांच्या डोळयांतून सारख्या आनंदा-श्रूंच्या धारा वाहूं लागत. यावरून ते किती प्रेमळ व थोर देशभक्त

होतें हें स्पष्ट दिसून येतें. देवाची भक्ति, देवाचें भजन करणें हें त्यांना फारच आवडत असे. ते नेहमीं भजन करून भजनापासून होणारा आनंद अनुभवीत असत. न्यायमूर्तींचा स्वभाव नेहमीं असा असे, कीं जो आनंद आपल्याला मिळाला तो आपलपोटेपणानें आपण एकट्यानेंच न अनु-भवतां, त्याचा अनुभव सर्वांस मिळवून द्यावा. या स्वभावाप्रमाणें ते ज्या ज्या शहरीं गेले तेथें तेथें त्यांनीं प्रार्थनासमाजांचा उत्कर्ष केला. प्रार्थनासमाज म्हणजे कांहीं तरी खूळ आहे, हें नुसतें ख्रिस्ती धर्माचें अनुकरण आहे, हें बडे लोकांचें एक सोंग आहे यांत कांहीं अर्थ नाहीं, असा दुर्दैवानें पुष्कळांचा चुकीचा समज झाला आहे. खरें पाहूं गेलें तर माझ्या अल्प मतीला जें दुरून तिऱ्हाईत या नात्यानें दिसलें तें हें कीं, प्रार्थनासमाज म्हणजे एक सुशिक्षितांचा भजनसमाज आहे. श्रद्धाळू देवभक्तांनीं रजेच्या दिवशीं म्हणजे रविवारीं एकत्र जमावें, ईश्वराचे गुण गावे, तुकाराम, रामदास वगैरे साधुसंतांचीं कवनें गावीं व आपलीं मनें भक्तीनें भरून व शुद्ध–निष्पाप–प्रफुल्लित करून घरोघर जावें असा साधारण या समाजाचा कार्यक्रम दिसतो. या कार्यक्रमांत वावगें काय आहे ? खरोखर वावगें कांहीं नाहीं. स्वजनांनीं तेथें जाऊन पाहावें म्हणजे खात्री होईल. आतां सर्व जाती मोडाव्या असें एक त्या समाजाचें तत्त्व आहे असें ऐकतों, पण स्वतःच्या जाती कायम ठेवून त्या समाजांत असलेले पुष्कळ लोक दृष्टीस पडतात. तेव्हां तें तत्त्व न पाळलें तरी चालतें असें दिसतें. असो. न्यायमूर्तिंनीं भक्तिमार्गाची व भागवतधर्माची उन्नति कर-ण्याचा अतिशय यत्न केला व त्यांत त्यांना पुष्कळ यशही आलें. याच संबंधानें त्यांनीं पुष्कळ धर्मपर व्याख्यानें दिलीं, तीं अतिशय सुंदर होतीं, असें तीं ज्या लोकांनीं ऐकलीं त्यांच्या अनुभवास आलें. त्या व्याख्या-नांचा लाभ आपणां सर्वांस मिळावा म्हणून स्वदेशहितरत श्रीमती **रमाबाईसाहेब रानडे** न्यायमूर्तींच्या सुशील पत्नी यांनीं अतिशय परि-श्रम घेऊन तीं व्याख्यानें एकत्र गोळा केलीं आहेत व त्यांचें एक सुंदर पुस्तक तयार केलें आहे. बाळांनों, तीं व्याख्यानें भक्तीच्या प्रेमळ रसानें

भरलेलीं आहेत. बाळांनों, तीं वाचलीं असतां मन आनंदानें व पवित्र विचारांनीं भरून जातें. तीं तुम्हीं वाचा म्हणजे तुमचें मन निष्पाप व पवित्र होईल व तुम्हीं देवाचे प्रेमळ भक्त व्हाल.बाळांनों,त्या पुस्तकाशिवाय श्रीमती परमपूज्य **रमाबाईसाहेब रानडे** यांनीं दुसरें एक सुंदर पुस्तक लिहिलें आहे. त्याचें नांव ' आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी. ' बाळांनों, हें पुस्तक फारच मनोवेधक व बोधपर आहे. मीं तें कितीतरी वेळां वाचलें आहे तरी आणखी पुनः पुनः ते वाचावें असें वाटतें. त्या पुस्तकांत न्यायमूर्ति रानडे यांची पितृभक्ति, वडील माणसांविषयीं आदर-बुद्धि, कुटुंबांतील माणसांचें खरें हित साधण्याबद्दल तत्परता, नोकरा-विषयीं प्रेम व कळकळ, पत्नीस सुशिक्षित, भगवद्भक्त व परहिततत्पर करण्याविषयींची आस्था, निरनिराळ्या स्वदेशबांधवांना उत्तेजन देऊन त्यांच्याकडून धार्मिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक व शिक्षण-संबंधीं कामगिरी करून घेण्याची हातोटी, विरोधी माणसाबद्दलही त्यांना वाटणारा आदर व प्रेम, विद्यार्थ्यांस मदत करण्याविषयीं आवड,शारीरिक क्लेश भोगीत असतांही देशहितासाठीं चालू ठेवलेली धडपड, लोकहिताचीं अनेक कामें करीत असतांही त्यामुळें होणारीं स्तुतिस्तोत्रें टाळण्याचा अट्टाहास, पुणें शहर, पुणेंकर व मराठी भाषा यांवरचें निस्सीम प्रेम, डामडौलाचा व नटण्याचा तिटकारा, साधेपणाची हौस, बाळांच्या संगतीची विलक्षण आवड, एकही मिनिट व्यर्थ जाऊं न देण्याचा निश्चय, दुसऱ्याच्या सुखासाठीं स्वतः नुकसान व मानहानि सोसण्याची तयारी, नियमबद्ध आहारविहार, पूर्वजांच्या थोर पराक्रमांबद्दल अभिमान, सुखांत आणि दुःखांत मनाची शांतता कायम ठेवण्याचें सामर्थ्य वगैरे फारच उत्तम तऱ्हेनें दाखविलें आहे. यासाठीं तें पुस्तक बाळांनों, तुम्हीं अवश्य वाचा. त्या पुस्तकांत नमुनेदार गृहस्थ व नमुनेदार गृहिणी कशी असते हें तुम्हांला दिसून येईल.

न्यायमूर्ति यांची राजकीय कामगिरी

आमचा हिंदुस्तान देश देवाचा सर्वांत लाडका आहे. गेल्या पंचवीस हजार वर्षांत मोठमोठालीं राष्ट्रें उदय पावलीं, भरभराटीच्या

शिखरावर गेलीं व शेवटीं नाश पावलीं. त्यांचें आतां नांवदेखील ऐकूं येत नाहीं. तसें आमच्या प्रियकर हिंदुस्तानाचें नाहीं. आमचें प्रियकर हिंदुस्तान हजारों वर्षांपासून अत्यंत सुधारलेलें आहे. आमच्या प्रियकर हिंदुस्तानाचे वेदग्रंथ हे सर्व जगांत अतिशय जुने आहेत. आमचा आर्य-धर्म, आमचा ऋषींनीं लालनपालन व संवर्धन केलेला आर्यधर्म सर्व धर्मांत जुना आहे. आमची भरतभूमि धर्मभूमि आहे. सर्व धर्मांचा उगम आमचे देशांत झालेला आहे. सर्व देश अज्ञानांत लोळत होते, तेव्हांपासून आमचा देश सुधारलेला आहे. पुष्कळ भरभराटीस आलेले देश नाहींसे झाले तरी आमचा हिंदुस्तान देश देवानें कायम ठेवला आहे. यावरून हा देश देवाचा अतिशय लाडका आहे, पुढें मागें या देशाकडून सर्व जगाची मोठी कामगिरी देवाचे मनांत करून घ्यावयाची आहे, असें न्यायमूर्ति माधवराव यांचें नेहमीं म्हणणें असे. त्याप्रमाणें ते नेहमीं स्वदेशबांधवांना सांगत असत. आपल्या हिंदुस्तानाचें ऐक्य व्हावें व संयुक्त हिंदुस्तानाला स्वराज्य प्राप्त व्हावें असें त्यांचें मत असे. हिंदुस्तानची राजकीय स्थिति सुधारावी राजकीय हक्क मिळविण्यासाठीं सर्व हिंदुस्तानांत राजकीय चळ-वळ सुरू करावी म्हणून सर्व हिंदुस्तानची **राष्ट्रीयसभा** स्थापण्यांत आली. तिची रचना करण्याचे कामांत सर्व राष्ट्रीय पुढारी माधवरावजी रानडे यांचेकडे गेले व माधवरावजींनीं अतिशय मेहनत घेऊन त्यांचें लाडकें पुणें शहर येथेंच राष्ट्रीय सभेची पहिली बैठक इसवी सन १८८५ सालीं भरविण्याचें ठरविलें. सर्व जुळवाजुळव झाली, पण नेमानेम कांहीं निराळा होता. यामुळें त्या सुमारास पुण्यास कॉलरा सुरू झाला, यामुळें पहिली राष्ट्रीय सभा मुंबईस १८८५ च्या डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत भरली. यावरून बाळांनों, आपले माधवरावजी राष्ट्रीय सभा स्थापन करणारांपैकीं एक प्रमुख होते, हें आपल्या लक्षांत येईल. आरंभापासून तों शेवटच्या दुखण्यानें जाणें अशक्य होईपर्यंत ते स्वदेशप्रेमानें दरवर्षी राष्ट्रीय सभेस जात असत व आपल्या बुद्धि-

बळानें या आपल्या देशास जास्त राजकीय हक्क मिळवून देण्यासाठीं झटत असत. सन १९०० सालीं डिसेंबर महिन्यांत म्हणजे मरणाच्या केवळ पंधरावीस दिवस आधीं ते अतिशय आजारी व अशक्त झाले होते तरी राष्ट्रीय सभेस जाण्याची माधवरावजींनीं तयारी केली, बांधाबांध केली. छातींत एकसारखी कळ येत होती, झोंप येत नव्हती तरी त्यांनीं त्याची पर्वा न करतां स्वदेशप्रेमासाठीं राष्ट्रीय सभेस जाण्याचा निश्चय कायम केला. इतक्यांत डॉ. सर भालचंद्र आले व त्यांनीं सांगितलें, ' डॉक्टर या नात्यानें मी तुम्हांला जाऊं देत नाहीं. ' कुटुंबांतील सर्व मंडळी व इतर थोर देशभक्त यांनीं डॉक्टरांच्या मताला दुजोरा दिला व सर्वांनीं संगनमत करून केवळ न्यायमूर्तींच्या भयंकर स्थितीकडे लक्ष देऊन त्यांना जाऊं दिलें नाहीं. तेव्हां न्यायमूर्तींना अतिशय वाईट वाटलें. डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या व आजपर्यंत राष्ट्रीयसभेचें दर्शन आरंभापासून एकसारखें होत होतें तें यंदां होत नाहीं म्हणून न्यायमूर्तींना अतिशय गहिंवर आला. नामदार गोखले व ना. न्या. चंदावरकर यांनीं पुष्कळ समाधान केलें. तुम्हीं सांगाल ती कामगिरी आम्हीं तुमच्या मनाप्रमाणें करितों असें सांगितलें. तेव्हां न्यायमूर्ति म्हणाले ' आतां या कार्यांचा भार यापुढें तुम्हांलाच वहावयाचा आहे. ' असो. बाळांनों, पाहिलेंतना केवढें हें स्वदेशप्रेम. बाळांनों, तुम्ही देखील स्वदेशावर असेंच निस्सीम प्रेम ठेवा व देशसेवा करा.

न्यायमूर्तींची औद्योगिक कामगिरी.

आपला हिंदुस्तान देश ईश्वराचा अतिशय लाडका, असें जें न्यायमूर्ति नेहमीं म्हणत असत तें अगदीं खरें आहे. सर्व जगांतील निरनिराळ्या ठिकाणांतील उत्तम हवा-पाणी, उत्तम पदार्थ निरनिराळे सुंदर व उपयोगी पशुपक्षी, निरनिराळ्या देशांतील सुंदर फुलें, फळें, वेली, वृक्ष, धातु, हिरे, माणकें, कोळसे, मोतीं, जें वाटेल तें या आमच्या देशांत आहे. सुंदर वनशोभा, अत्यंत मोठ्या नद्या, अत्यंत उंच पर्वत आमच्या देशांत आहेत. आमच्या देशासारखी सुपीक जमीन दुसरीकडे

क्वचितच असेल. निरनिराळे धर्म, हिंदु, महंमदी, पारशी, जैन, बौद्ध, ख्रिस्ती, इत्यादि घ्या. त्यांचे उत्तम अनुयायी या देशांत एकत्र बंधु-भावानें नांदत असलेले तुम्हांला दिसतील. नाहींतर इतर देशांत निर-निराळ्या पंथांत सारख्या मारामाऱ्या चालू असायच्या. देवानें हिंदु-स्तानाला अशा तऱ्हेनें अगदीं लाडका लेक केला. उलट इंग्लंडकडे पहा. त्या देशांतील जमीन म्हणजे शुद्ध खडक. तेथील लोकांना वर्षांत थोडेच दिवस स्वतःच्या देशांत पिकलेल्या धान्यांवर पोट भरतां येईल. बरें, हिंदुस्तानप्रमाणें तेथें सोनें, रुपें, हिरे, मोतीं, पिकत असतील तर तेंही नाहीं. तेथें फक्त लोखंड व कोळसे सांपडणार. आतां हें लोखंड व हे कोळसे खायला उपयोगी पडतील का ? मुळींच नाहीं. बरें; असें आहे तर मग हिंदुस्तान देश अतिशय संपत्तिवान, सुखी व इंग्लंड अतिशय दरिद्री व दुःखी असावयास पाहिजे. पण पाहूं गेलें तर वस्तु-स्थिति याच्या अगदीं उलट आहे. म्हणजे इंग्लंड अत्यंत श्रीमान्, सुखी, प्रबळ व प्रभावशाली बनलें आहे व हिंदुस्तान अत्यंत भिकारी, दुःखी, दुर्बळ व दुबळा बनला आहे. बाळांनों, याचें कारण आतां मी तुम्हांला सांगतों. जगांत आपण पहातों, कीं ज्या मुलाचे आईबाप अतिशय लाड करितात तो अतिशय आळशी बनतो; व शेवटीं दरिद्री, दुःखी व दुबळा होतो. उलट ज्या मुलाला आईबाप कांहीं देत नाहींत व ज्याचे लाड करीत नाहींत तो मुलगा उद्योगी, धाडसी, चलाख, स्वावलंबी निपजतो व आपल्या उद्योगाच्या व हुषारीच्या जोरावर श्रीमंत, प्रबळ व सुखी होतो. तोच न्याय येथें लागू. आपल्या जगाचा बाप ईश्वर, त्यानें हिंदुस्तानचे केले लाड. त्यामुळें हिंदुस्तान पुरा आळशी बनला. त्यानें उद्योगधंद्याकडे बिलकूल लक्ष दिलें नाहीं. त्यानें स्वतःच्या सुपीक जमिनींत पिकणारें धान्य स्वतःला पुरून उरेल तें दुसऱ्या देशांत पाठ-विलें व त्याच धान्यापासून इंग्लंडसारखे खडकाळ देश उत्तम वस्तु बनवून हिंदुस्तानापासून त्या वस्तूंबद्दल दसपट किंमत घेऊं लागले. झालें यामुळें हिंदुस्तान दरिद्री व इंग्लंड श्रीमंत. म्हणजे सांगण्याचा

मतलब हा, कीं हिंदुस्तानच्या दारिद्र्याचें कारण आळस व उद्योग धंद्याची हेळसांड हें आहे. न्यायमूर्ति माधवरावजी रानडे यांनीं आपल्या देशाच्या दारिद्र्याबद्दल जेव्हां विचार केला तेव्हां ही गोष्ट त्यांच्या चटकन लक्षांत आली. लक्षांत आल्यावर **स्वदेशप्रेमी माधवराव** स्वस्थ थोडेच बसणार. त्यांनीं लगेच बऱ्याच लोकांजवळ ही गोष्ट काढिली. या गोष्टीबद्दल सर्वत्र चर्चा चालू केली व अतोनात खटपट करून सर्व देशाचें इकडे लक्ष लागावें व सर्व देशानें उद्योगधंद्याची भरभराट करण्यास सुरवात करावी व झटावें म्हणून पहिली औद्योगिक परिषद सन १८९० त पुणें येथें भरविली. त्या वर्षापासून उद्योगधंद्यांतील लोकांची व त्यांबद्दल कळकळ बाळगणारांची औद्योगिक परिषद दर-वर्षीं भरू लागली आहे. त्यामुळें देशांतील उद्योगधंदे सुधारण्याकडे पुष्कळ लोकांचें लक्ष गेलें आहे व पुष्कळ कारखाने निघून त्यांत कच्च्या पदार्थांपासून नवीन जिन्नस बनूं लागले आहेत. याचें सर्व श्रेय खरो-खर **न्यायमूर्तींनांच** दिलें पाहिजे. हिंदी सांपत्तिक शास्त्रावर **न्यायमूर्ति माधवराव** यांनीं पुष्कळ उत्तम निबंध लिहिले आहेत. त्या निबंधांच्या वाचनानें स्वदेशबंधूंना धंदे भरभराटीस कसे आणावे, नवीन धंदे कोणते काढावे, ते कोठें काढावे, हें कळूं लागलें आहे. हिंदुस्तानांत नैसर्गिक शक्तीवर चालणारे पुष्कळ धंदे सुरू करतां येतील, असें न्यायमूर्तींनीं इ० स० १८९० सालींच लोकांना सांगितलें. हिंदुस्तानांत निरनिराळे धबधबे आहेत, त्यांपासुन वीज उत्पन्न करून त्यावर मोठाले कारखाने थोड्या खर्चानें चालावितां येतील, असें त्यांनीं औद्योगिक परिषदेपुढें दिलेल्या व्याख्यानांत सांगितलें. तें किती खरें होतें हें आज आपण टाटांच्या निरनिराळ्या कारखान्यांवरून पहात आहों. आज आपणांला जें दिसत आहे तें न्यायमूर्ति माधवरावांना तीस वर्षांपूर्वींच स्पष्ट दिसत होतें. केवढें हें बुद्धिसामर्थ्य !

माधवरावांनीं एका निबंधांत असें म्हटलें आहे, कीं तीळ वगैरे गळितांचीं धान्यें आपण विलायतेला पाठवितों व त्यांचें तेल तिकडे

निघून मग इकडे आपण तें कितीतरी पट किंमत देऊन घेतों, असें करूं नये. येथेंच तेल काढण्याच्या गिरण्या काढाव्या. या त्यांच्या उपदेशाप्रमाणें हल्लीं बऱ्याच ठिकाणीं तीळ, जवस, एरंडी, सरकी वगैरे-पासून तेल काढण्याच्या मोठाल्या इंजिनाच्या मदतीनें चालणाऱ्या गिरण्या निघाल्या आहेत. ही आनंदाची गोष्ट आहे. याचप्रमाणें ज्या पदार्थांपासून रंग तयार करतां येतात ते पदार्थ, विलायतेंत न पाठवितां इकडेच त्यांपासून रंग तयार करावे, असेंही त्यांचें सांगणें होतें. त्या-प्रमाणें होईल तर आपल्या देशाचा अतोनात फायदा होईल. तसेंच चिंध्यांपासून कागद, रसापासून साखर, कातड्यापासून बूट, येथेंच तयार करावे, असें त्यांचें म्हणणें होतें. त्याप्रमाणें आतां हळूहळू होऊं लागलें आहे. आतां आपला देश निव्वळ शेतीवर अवलंबून नाहीं. नवीन उद्योगधंदे व कारखाने झपाट्यानें निघत आहेत. यामुळें, एकादे वर्षीं पाऊस न पडला तर लोकांना कारखान्यांत काम मिळतें. या सर्व गोष्टींवरून उद्योगधंद्याची भरभराट करावी, व नवीन धंदे काढावे असें लोकांच्या मनांत बिंबवून न्यायमूर्तींनीं देशाची स्थिति सुधारण्यास किती मदत केली, हें बाळांनों, तुम्हांला समजलेंच असेल.

न्यायमूर्तींची सामाजिक कामगिरी

आपल्या देशाची राजकीय स्थिति सुधारावी, आपल्याला राजकीय हक्क मिळावे, आपली धार्मिक उन्नति व्हावी, आपले देशबंधू धार्मिक व्हावे, आपला देश निरानिराळे जिन्नस उत्पन्न करणाऱ्या कारखान्यांनीं गजबजून जावा असें ज्याप्रमाणें आपणाला वाटतें त्याचप्रमाणें आपल्या समाजांत ज्या वाईट चालीरीती व अनाचार शिरले असतील ते जाऊन आपल्या समाजाची स्थिति सुधारावी, आपला समाज ऋषिकाळांतील समाजाप्रमाणें तेजस्वी, ज्ञानसंपन्न व्हावा, ऋषिकाळीं जसे पुरुष मोठे ज्ञानी झाले होते, तसे हल्लींही पुरुष ज्ञानसंपन्न व्हावे, ऋषिकाळीं ज्याप्रमाणें स्त्रिया विद्वान् झाल्या होत्या तशा हल्लींही व्हाव्या, ऋषि-

काळीं ज्याप्रमाणें मुलें गुटगुटीत, चपळ, गुरूवर प्रेम करणारी, विद्या शिकण्यांत गर्क झालेलीं व कष्टाचीं कामें करून धट्टींकट्टीं व तालिमबाज असत तशीं हल्लींचीही असावीं, असें आपणाला साहजिकच वाटतें. असेंच न्यायमूर्तींना वाटत असे याबद्दल त्यांना अतिशय तळमळ वाटत असे. यामुळें त्यांनीं राष्ट्रीयसभेबरोबरच सामाजिक परिषद् भरण्याचा क्रम सुरू ठेवला होता. निरनिराळ्या प्रांतांत हें कार्य चालावें म्हणून ते अतिशय खटपट व श्रम करीत, सर्व प्रांतांतील पुढाऱ्यांस पत्रें लिहून त्यांचेकडून निरनिराळया प्रांतांत काय काय चुकीच्या चालीरीती आहेत, त्यांत बदल करण्याचा कसकसा प्रयत्न होत आहे, हें सर्व ते समजावून घेत व सर्व सामाजिक चळवळीचा वर्षाचा रिपोर्ट तयार करून तो डिसेंबरांत भरणाऱ्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेपुढें मांडीत असत. राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या जनरल सेक्रेटरीचें काम त्यांनीं पुष्कळ वर्षें अतीशय कळकळीनें केलें. त्यांचीं सामाजिक परिषदेंतील भाषणें अतिशय मनन करण्यासारखीं झालीं आहेत. समाजांतील सर्वांना समतेनें व न्यायानें वागवावें, अशी जी प्राचीन ऋषिकाळाप्रमाणें आतांही लोकांची समजूत होऊं लागली आहे हें त्यांच्याच खटपटीचें फळ होय. स्त्रीशिक्षणाची हल्लीं जी एवढीं वाढ झाली आहे, मुलांच्याप्रमाणें मुलीदेखील हायस्कुलांत व कालेजांत दिसूं लागल्या आहेत व पहिला नंबर आणून संस्कृत लराशिपा व बक्षिसें सालोसाल पटकावूं लागल्या आहेत हें देखील **न्यायमूर्ति माधवरावांच्या** खटपटीचें फळ होय. **न्यायमूर्ति माधवराव** यांच्या समाजसुधारणेच्या चळवळींत एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. अमुक एक सुधारणा अथवा नवीन गोष्ट परकीय लोकांपासून आपण घ्यावी अथवा नवीनच सुरू करावी, असें त्यांनीं कधींही केलें नाहीं. आपल्या ऋषींचा व ऋषिकाळांतील उत्तम गोष्टीचा **माधवरावांना** फार अभिमान असे. ऋषिकाळांत अमुक अमुक गोष्ट किंवा चाल होती ती मधल्या अज्ञानाच्या काळांत बंद पडली, ती आपण पुनःसुरूं

करूं या, असें त्यांचें नेहमीं सांगणें असे. त्याचप्रमाणें लोकांना मागें टाकून भरकन आपण पुढें जावें हें त्यांना बरोबर वाटत नसे. थोडे मंदगतीनें पण लोकांचीं मनें न दुखवितां त्यांना बरोबर घेऊन पुढें पाऊल टाकावें असें त्यांचें मत होतें. यामुळें सर्व लोकांना जुन्यांना व नव्यांना ते थोर व वंदनीय असे वाटत असत.

न्यायमूर्तींची शिक्षणविषयक कामगिरी.

न्यू इंग्लिश स्कूल व **फर्ग्युसन कॉलेज** स्थापून लोकांना तेजस्वी व स्वाभिमानपूर्ण शिक्षण होईल तितक्या थोड्या खर्चांत द्यावें असें जेव्हां **लोकमान्य टिळक** व **प्रिन्सिपॉल आगरकर** यांचे मनांत आलें तेव्हां ते **माधवरावाकडे** गेले व त्यांची सल्ला त्यांनीं विचारली. त्याकामीं **माधवरावांनीं** त्यांना पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या व उत्तेजन व मदत दिली. औद्योगिक शिक्षणासाठीं देखील त्यांनीं पुष्कळ खटपट केली. त्यांना विद्यार्थ्यांच्याविषयीं नेहमीं कळकळ वाटत असे. विद्यार्थ्यांनीं वर्षभर सर्व विषयांवर अतिशय परिश्रम घ्यावे व मग एखाद्या विषयांत थोडेसे कमी मार्क मिळतांच त्यांना बाकीच्या पास झालेल्या विषयांचा देखील पुनः पुढले वर्षी अभ्यास करण्यास भाग पाडावें ही गोष्ट अगदीं अयोग्य, अन्यायाची व जुलमाची आहे, असें न्यायमूर्तींना वाटत असे. यासाठीं हा अन्याय दूर करण्यासाठीं प्रकृति बरोबर नसतांही त्यांनीं जिवापाड मेहनत केली. या त्यांच्या मेहनतीचा त्यांच्या मृत्यूनंतर उपयोग होऊन आतां बऱ्याच परीक्षांत पास झालेल्या विषयांत पुनः परीक्षा देण्याची जरूर नाहीं असा नियम झाला आहे. यामुळें विद्यार्थ्यांचे बरेच श्रम वांचले आहेत.

न्यायमूर्तींची दुसरी खटपट म्हणजे मराठी भाषेला युनिव्हर्सिटींत योग्य मानाचें स्थळ मिळवून देण्याची. त्या कामीं त्यांनीं फार खटपट केली. त्या खटपटीमुळें आतां एम. ए. च्या परीक्षेंत व मॅट्रिकच्या परीक्षेंत मराठीचा प्रवेश झाला आहे.

न्यायमूर्तींची शेतकी सुधारण्यासंबंधाची कामगिरी.

शेतकरी लोक सर्व देशाचे आधारस्तंभ, त्यांनीं पिकवावें व सर्वांनीं खावें अशी खरी स्थिति. पण पहावें तों सर्व वर्गांपेक्षां शेतकऱ्यांची स्थिति अधिक वाईट, हें न्यायमूर्ति माधवराव यांच्या लक्ष्यांत येतांच त्यांनीं नीट चौकशी करून शेतकरी लोकांचा कर्जबाजारीपणा दूर होईल अशा तऱ्हेची व्यवस्था सरकारकडून करविली. पण अज्ञानामुळें शेतकऱ्यांची स्थिति अजून सुधारली नाहीं. आतां हें अर्धवट राहिलेलें काम स्वदेशबंधूंनीं स्वार्थत्यागपूर्वक श्रम करून शेतकरी लोकांना शिक्षण देऊन पुरें करावें.

असो. अशा तऱ्हेने अत्यंत परिश्रम करून देह झिजवून न्यायमूर्तींनीं देशबंधूंची सर्व बाजूंनीं सुधारणा व्हावी म्हणून अतिशय कष्ट केले. त्यांच्या खटपटीनें आपल्या देशाचा शिक्षणांत, उद्योगधंद्यांत, राजकीय प्रगतींत व सामाजिक सुधारणेच्या कामीं फार फायदा झाला आहे. त्यांनीं केलेल्या उपकारांची आपण फेड करावी असें बाळांनों, तुम्हांला वाटतेंना ? तर मग तुम्ही देखील स्वदेशाची स्थिति सुधारण्यासाठीं मोठेपणीं झटा म्हणजे स्वर्गांत **न्यायमूर्ति माधवरावांना** आनंद होईल व ते तुम्हांला आशीर्वाद देतील. बाळांनों, आपले न्यायमूर्ति हे गेल्या शतकांतील स्वदेशास सुस्थिति प्राप्त करून देण्यासाठीं ज्या ज्या नाना प्रकारच्या चळवळी झाल्या त्या सर्व चळवळींचे एक मुख्य उत्पादक होते. हें आतांपर्यंत सांगितलेल्या हकीगतीवरून बाळांनो, तुमच्या लक्षांत आलेंच असेल. दुसरे पुढारी एक दिशा घेऊन त्या एकच दिशेनें देशसेवा करितात. आपल्या प्रिय **न्यायमूर्तींनीं** देशाची सेवा सर्व दिशांनीं केली. राजकीय प्रगतीसाठीं त्यांनीं राष्ट्रीय सभा काढली, पुण्यास सार्वजनिक सभा व डेक्कन सभा स्थापिल्या, धार्मिक सुस्थिति प्राप्त व्हावी म्हणून प्रार्थनासमाज अथवा भजनसमाज काढले, समाजाची सुस्थिति व्हावी, त्याला ऋषींच्या काळांतील चांगल्या गोष्टींची व चांगल्या चालीरीतींची प्राप्ती व्हावी म्हणून दरवर्षी सामा-

जिक परिषदा भरवूं लागले, शेतकऱ्यांची उन्नति होण्यासाठीं, शेतकऱ्यांची कर्जबाजारी दूर करण्याकरितां कायदा करविला, उद्योगधंद्यांची वाढ व्हावी म्हणून औद्योगिक परिषदा दरवर्षी भरवूं लागले, शिक्षणांतही सुधारणा केली, अशा सर्व दिशांनीं त्यांनीं देशसेवा केली. आपली विशाल, व्यापक व तेजस्वी बुद्धि, अगाध ज्ञान व मनमिळाऊपणा हीं सर्व न्यायमूर्तींनीं स्वदेशसेवेस वाहिलीं होतीं. आपल्या देशाचें सर्व बाजूंनीं पाऊल पुढें कसें पडेल याचीच ते रात्रंदिवस काळजी वहात असत. न्यायमूर्तींच्या अंगांतील एकेका गुणानें देखील मोठें पद प्राप्त होतें. मग इतके सर्व गुण त्यांच्या आंगीं एकवटल्यावर व त्या सर्वांवर कळस करणारी साधुसंतांसारखी त्यांची मनोवृत्ति असल्यावर त्यांना हल्लींच्या काळचे संत, हल्लींच्या काळचे ऋषी कोण म्हणणार नाहीं ? सर्वच म्हणतील. नव्हे, संत संत म्हणून त्यांची सर्व लोक स्तुति करीत आहेतच व ती योग्यही आहे. असो. बाळांनों, या अर्वाचीन संतांचें अनुकरण करा व देशाला चांगले दिवस आणण्यासाठीं रात्रंदिवस झटा.

अर्वाचीन महाराष्ट्राचे जनक

विष्णुशास्त्री चिपळूणकर.

इंग्रजी अम्मल व इंग्रजी भाषा आपल्या या महाराष्ट्रांत इसवी सन १८१८ पासून सुरू झाली. इंग्रजी भाषा आपल्यांतील हुषार लोक शिकूं लागले. इंग्रजी साधारण थाडस शिकतांच मोठाल्या नोकऱ्या मिळूं लागल्या. या गोष्टीचा असा परिणाम झाला, कीं आपलें जुनें तेवढें सर्व वाईट. इंग्रजी पोषाख, इंग्रजी चालीरीति, इंग्रजी भाषा, इंग्रजी खाणें पिणें वगैरे सर्व चांगलें, आपलें तेवढें सर्व वाईट, असा सर्वत्र ग्रह होऊं लागला. ‘ राजा कालस्य कारणं ’ म्हणजे राज्यकर्त्याप्रमाणें काळ बदलतो अथवा राज्यकर्त्यांचें सर्व उत्तम असें सहज लोकांच्या मनांत येतें व लोक आपला पोषाख वगैरे सर्व राज्यकर्त्याप्रमाणें करूं लागतात. त्याचें प्रत्यंतर शाहाजी राजे, शिवाजी महाराज व त्या काळचे मराठी सरदार अथवा त्या काळची मराठी भाषा यांच्याकडे पाहिलें म्हणजे लक्ष्यांत येईल. त्याकाळचे मराठे मुसलमानांप्रमाणें पोषाख करीत असत. त्याकाळच्या मराठ्यांची मराठी भाषा मुसलमानी म्हणजे उर्दू शब्दांनीं भरलेली असे. आजही अफगाणिस्तानांत पहाल तर हिंदूंचा पोषाख थेट अफगाण लोकांसारखा आहे. आपलाही पोषाख आज इंग्रजी वळणावर झुकला आहे. हें असें चालावयाचेंच, पण याचा अतिरेक झाला म्हणजे याला थांबविण्यासाठीं एखादा थोर पुरुष निर्माण होतो. अशाच तऱ्हेचे थोर पुरुष निर्माण होण्याची १८५०च्या सुमारास फार जरूर होती; कारण सन १८१८ पासून आपलें तेवढें सर्व टाकाऊ व परकीय तेवढें सर्व चांगलें, या मताचा तीस वर्षें एकसारखा फैलाव होऊन १८५० च्या सुमारास त्याचा अतिरेक झाला. त्याबरोबर त्या मताचें खंडण करणारा व जुन्यांचा आपण अभिमान बाळगला पाहिजे, आपली भाषा, आपले रीतरिवाज, आपले पूर्वज, आपला धर्म, आपला इतिहास, आपलीं पुराणें, यांचा आपण अभिमान

बाळगला पाहिजे. हें मत स्थापन करणारा पुरुष जन्माला आला. त्याचें नांव **विष्णु कृष्ण चिपळूणकर.** याच थोर पुरुषाचें चरित्र सोप्या भाषेंत बाळांनों, मी तुम्हाला सांगणार आहें. या थोर पुरुषानें नवें महाराष्ट्र अवघ्या ८–१० वर्षांत निर्माण केलें. त्यांनीं नोकरीपेक्षां स्वतःच धंदा करून पोट भरणें अधिक चांगलें आहे हें लोकांना शिकविलें. त्यांनीं नवीन पद्धतीचें शिक्षण मुलांना देण्यासाठीं न्यू इंग्लिश स्कूल म्हणजे नवीन इंग्रजी शाळा काढली. लोकांना चांगलीं पुस्तकें मिळावीं म्हणून नवीन किताबखाना काढला. लोकांत स्वावलंबन व स्वाभिमान वाढावा व मराठी भाषेचें बखरीवजा मिळमिळीत वळण बदलून तिला तेजस्वी व जोरदार बनवावी म्हणून **निबंधमाला** सुरू केली. सर्व लोकांना नवीन विचार, नवीन ज्ञान, नवीन राजकीय चळवळ व सामाजिक, औद्योगिक, धार्मिक सुधारणांबद्दल माहिती मिळावी म्हणून केसरी व मराठा अशीं दोन वर्तमानपत्रें काढलीं. व तीं छापण्याचें काम नीट व्हावें म्हणून आर्य-भूषण नांवाचा नवीन छापखाना काढला. लोकांना आपल्या देवांच्या व पूर्वजांच्या सुंदर तसबिरी थोडक्यांत मिळाव्या म्हणून चित्रशाळा नांवाचा नवीन छापखाना काढला. आपले पूर्वज किती थोर होते हें समजून त्यांचेबद्दल आपल्या मनांत आदर उत्पन्न व्हावा म्हणून काव्येतिहाससंग्रह नांवाचें मासिक पुस्तक काढलें. अशा तऱ्हेनें आपल्या ह्या महाराष्ट्र देशाला त्यांनीं अगदीं नवीनच रूप दिलें. या महाराष्ट्रांत नवयुग सुरू केलें, म्हणूनच त्यांना नव्या महाराष्ट्राचे जनक अथवा उत्पादक असें आपण म्हटलें आहे.

अशा या तेजस्वी, कर्तबगार, हिम्मतबहाद्दर यशस्वी पुरुषाचा जन्म तारीख २० मे १८५० रोजीं पुणें येथें झाला. ह्यांच्या वडिलांचें नांव कृष्णशास्त्री चिपळूणकर.

पूर्वजांची थोडी माहिती.

चिपळूणकरांचें घराणें मूळच पावस या गांवचें. हें गांव रत्नागिरी जिल्ह्यांत आहे. सतरावे शतकाचे आरंभीं या घराण्यांतील एक पुरुष

त्रिंबक क्षेत्रीं गेला. त्र्यंबकेश्वराजवळचे श्रीहर्ष किल्ल्याची फडणिशी त्या पुरुषाला मिळाली. नंतर ती सुटल्यावर त्या वंशांतले हरिपंत धाकटे बाजीरावांचे धाकटे बंधू चिमणाजीआप्पा यांचे शागीर्द झाले. इ० स० १८१८त पेशवाई बुडाली व बाजीराव आणि चिमणाजीआप्पा ब्रह्मावर्तास गेले. तेव्हां हरिपंत पुण्यासच राहिले व एका अफूचे दुकानावर आपलें पोट भरूं लागले. त्यांस १८२४ सनांत कृष्णशास्त्री झाले. हे कृष्णशास्त्री आपले चरित्रनायक विष्णुशास्त्री यांचे वडील. कृष्णशास्त्री अतिशय हुषार निघाले. ते मोरशास्त्री यांचेजवळ संस्कृत शिकत असत. त्यांची तीव्र बुद्धि पाहून मोरशास्त्री फार खूष झाले व कृष्णशास्त्री यांना ते बृहस्पती असें म्हणूं लागले. मोरशास्त्री फार दूरदर्शी होते. त्यांनीं पाहिलें कीं, दिवसानुदिवस संस्कृत विद्या व संस्कृत पंडित यांची किंमत कमी होणार व इंग्रजी विद्या व इंग्रजी पंडित यांना सपाटून मान मिळणार. मोरशास्त्री यांचें आपले शिष्य कृष्णशास्त्री यांचेवर अगदीं स्वतःच्या मुलासारखे प्रेम होतें. म्हणून आपल्या लक्ष्यांत आलेली गोष्ट त्यांनीं कृष्णशास्त्री यांना सांगितली व त्यांचें मन वळवून ही गुरुशिष्यांची जोडी इंग्रजी शिकूं लागली. यावेळीं मोरशास्त्री म्हातारे झाले होते तरी त्यांनीं इंग्रजी शिकण्यास कंबर बांधिली ही गोष्ट घरगुती अडचणींत आमचें बरेंच वय फुकट गेलें व आतां आम्ही मोठे झालों, आतां आमचे जून मनांत विद्येचा प्रवेश होणार नाहीं असें म्हणणारे लोकांनीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. मनुष्य कितीही म्हातारा झाला तरी कांहीं नवीन शिकण्यासारखें असल्यास त्यानें म्हातारपणाची सबब कधींही सांगू नये. तर तरुणाप्रमाणें एकदम नवीन विद्या शिकण्यास सुरवात करावी. कृष्णशास्त्रीदेखील या वेळेला लहान नव्हते. त्यांचें या वेळीं एकोणतीस वर्षांचें वय होतें. त्यांनीं गुरुजींची हिम्मत व उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून इंग्रजी शिकण्यास सुरवात केली. कृष्णशास्त्र्यांची तीव्र बुद्धि जशी संस्कृत भाषा हस्तगत करण्यांत यशस्वी झाली तशीच ती इंग्रजी विद्येला काबीज करण्यासही समर्थ झाली.

या त्यांच्या निपुणतेमुळें इंग्रजी प्रोफेसर ग्रीन वगैरेंची त्यांचेवर मर्जी बसली. इंग्रजी व संस्कृत या दोनही भाषांत पारंगतता मिळविविल्यामुळें कृष्णशास्त्री यांची पंडितवर्गांत मोठी मानमान्यता झाली. यामुळें मराठी भाषेंत उत्तम ग्रंथ लिहिण्याची योग्यता त्यांचे अंगीं आली. त्यांनीं मराठींत पुष्कळ चांगलीं पुस्तकें लिहिलीं व तीं पंडितांना आणि सरकारला फार पसंत पडलीं.

त्यांची अलौकिक बुद्धि व विद्वत्ता लक्षांत आणून सरकारनें त्यांना मोठमोठ्या पगाराच्या जागा दिल्या व शेवटीं तर त्यांना रिपोर्टर ऑन दि नेटिव्ह प्रेस ही अतीशय मोठी जागा दिली. कृष्णशास्त्री यांनीं बऱ्याच संस्कृत नाटकांचीं मराठी भाषांतरें शुद्ध केलीं, मराठी व्याकरणावर उत्तम निबंध लिहिले. याशिवाय **अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी, अनेक विद्यामूलतत्वसंग्रह, अर्थशास्त्र, परिभाषा, साक्रेटिसाचें चरित्र, रासेलसाचें चरित्र** इत्यादि गद्यग्रंथ त्यांनीं लिहिले आहेत. याशिवाय एक लहानसाच पण खुबीदार असा '**पद्यरत्नावलि**' नांवाचा काव्यग्रंथ त्यांनीं लिहिला आहे. यांनीं आपल्या परिश्रमांनीं मराठी भाषेला बरेंच चांगलें रूप दिलें. अशा तऱ्हेनें त्यांचे चिरंजीव विष्णुशास्त्री यांचे कार्याचा त्यांनीं पाया घातला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

चरित्रनायकाचें जन्म व बाळपण.

वर सांगितलेंच आहे कीं, आपले चरित्रनायक विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा जन्म पुणें येथें तारीख २० मे १८५० रोजीं झाला. हे लहानपणीं बरेच अशक्त असत. ह्यांचें बाळपण मोठें मजेंत गेलें. याचीं बरींच कारणें आहेत. पण त्यांत मुख्य व पहिलें कारण हें कीं, ते आपल्या बापाचे पहिलेवाहिले चिरंजीव. पहिल्या मुलाचे लाड नवानवशाचा म्हणून फार होतात. हें बाळांनों तुम्हांला ठाऊक आहेच. दुसरें कारण यांचे आजोबा हरिपंत मामा व आजी भागीरथी मामी. बाळांनो

तुम्हांपैकीं ज्यांना बापाचा बाप व बापाची आई असेल त्यांना ही गोष्ट कांहीं सांगावयाला नको कीं आजाआजी नातवाचे फारच लाड करितात व त्याला कोठें ठेऊं व कोठें न ठेऊं असें त्यांना होतें. शिवाय असल्या बाळाला अपील कोर्टाचा मोठा आधार असतो. एखादे वेळेस जर आई किंवा बाप बोलले, रागावले किंवा त्यांनीं एखादी थापड लगावली कीं हें बाळ रडत आजोबांकडे किंवा आजीकडे अपील घेऊन जायचेंच व तसें गेल्यावर त्याचें काम सोळा आणे व्हावयाचेंच. लगेच आजोबा अथवा आजी नातवाला प्रेमानें कुरवाळीत बापावर अथवा आईवर रागावली म्हणजे बाळासाहेबांना खूप गंमत वाटावयाची. असो असलें हें आजोबाआजीचें सुख विष्णुशास्त्र्यांना मिळालें होतें. त्यांचे आजोबा हेच त्यांचे सर्व लाड पुरवीत असत. व त्यांची सर्व प्रकारें काळजी घेत असत. यामुळें विष्णुशास्त्र्यांचें प्रेम त्यांचे वडिलांपेक्षां आजोबांवर विशेष असे. विष्णुशास्त्री यांचे वडील कृष्णशास्त्री हे मोठेसे धार्मिक नव्हते. पण विष्णुशास्त्री यांचे आजोबा हरिपंत मामा हे फार कमठ व धार्मिक होते. विष्णुशास्त्री नेहमीं आजोबांच्याच जवळ असल्यामुळें त्यांनीं आजोबांचें अनुकरण केलें व ते धार्मिक बनले. विष्णुशास्त्री यांचें बाळपण सुखाचें होण्याला तिसरें कारण म्हटलें म्हणजे वडिलांची चांगली स्थिति. त्यांच्या लहानपणीं त्यांचे वडील कृष्णशास्त्री यांची स्थिति फारच सुखदायक होती. त्यांना लोकांत फार मान मिळत असे. नोकरी मोठ्या पगाराची व हुद्याची असे. यामुळें ते नेहमीं सढळ हातानें खर्च करीत व नेहमीं आनंदी असत. त्यांच्या चेहऱ्यावर त्रासिकपणा कधींही दिसत नसे. या तिसऱ्या कारणामुळें विष्णुशास्त्री यांचें बाळपण गरीबांच्या मुलाप्रमाणें किंचितही त्रासाचें किंवा दुःखाचें गेलें नाहीं. त्यांना जें जें हवेंसें वाटे तें लागलेंच मिळत असे. विष्णुशास्त्री यांचें बाळपण सुखाचें जाण्यास चौथें कारण घरांतले घरांतच बरोबरीचे पुष्कळ खेळगडी. त्यांचे बंधु व त्यांच्याच वयाचे त्यांचे चुलते सीतारामपंत व दुसरे नात्याचे खेळगडी त्यांना

पुष्कळ लाभले होते. यामुळें त्यांच्यां अंगीं एकलकोंडेपणा कधींही आला नाहीं. मोठेपणीं चारचौघांना बरोबर घेऊन देशकार्य करण्याचें जें त्यांना साधलें त्याचें कारण लहानपणापासून चारचौघांत मिसळून रहाण्याची संवय हेंच होय.

शिक्षण.

आपले चरित्रनायक यांचें शिक्षण बाळांनों, तुमच्यापेक्षां अगदीं निराळ्या तऱ्हेनें झालें. तें कधीं सरकारी शाळेंत तर कधीं गावठी शाळेंत याप्रमाणें चार पांच शाळांत झालें. त्यांचें इंग्रजी शिक्षण पुण्याच्या सरकारी हायस्कुलांत प्रिन्सिपाल कर्कहॅम व प्रि. वामन आबाजी मोडक यांचे नजरेखालीं झालें. वडिलांकडे संस्कृत व मराठी पुस्तकें नेहमीं परीक्षणासाठीं येत त्यामुळें विष्णुशास्त्री यांना मराठी व संस्कृत पुस्तकें वाचण्याचा नाद फार लागला. त्याचप्रमाणें इंग्रजी पुस्तकें वाचण्याकडेही त्यांचा फार ओढा होता. यामुळें इंग्रजी, मराठी व संस्कृत या भाषांत ते अतीशय प्रवीण झाले. पण यामुळें त्यांचें गणित या विषयाचें ज्ञान कच्चें राहिलें व तो विषय त्यांना आवडेनासाही झाला. बहुतकरून बाळांनों, असें दृष्टीस पडतें कीं जे गणितांत हुशार त्यांना भाषाविषय नावडता व ज्यांना भाषाविषयाची आवड त्यांना गणित नावडतें. असो, हायस्कूलमध्यें चांगल्या गुरुजींच्या हाताखालीं लक्षपूर्वक अभ्यास करून विष्णुशास्त्री आपल्या वयाचे सोळावे वर्षीं म्हणजे इ. स. १८६६ सालीं मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाले. नंतर ते कालेजचा अभ्यास करण्यासाठीं डेकन कालेजांत जाऊं लागले. बाळांनों, मनुष्याचे आयुष्यांत बाळपण हें तर मजेचें खरेंच, पण त्यांतही विद्यार्थिदशा फार बहारीची. पण त्या विद्यार्थिदशेंतही कालेजमध्यें घालविलेलीं वर्षें तर फारच आनंदाचीं; प्रपंचाची काळजी नाहीं, उद्यां कसें होईल याची पंचाईत नाहीं, विद्येच्या आनंदांत यथेच्छ रमावें, खावें, प्यावें, धांवावें, खेळावें, हंसावें, भांडावें, वादविवाद करावे, क्रिकेट टेनिस वगैरेंचा यथेच्छ समाचार घ्यावा, पोहावें,

फार काय सांगावें, निश्चिंतपणें चैन करावी असा तो मजेचा काळ. सर्व आयुष्यांत त्या काळाइतका सुखदायक काळ नाहीं. असे ते आनंदाचे दिवस विष्णुशास्त्र्यांना आतां लाभले. त्यांना कालेजमधें गेल्यापासून भाषाविषयाबद्दलच्या दोन स्कॉलरशिपा मिळत असत.

विष्णुशास्त्री हे विद्यार्थिदशेंत अतिशय अबोल असत. चारचौघे जमले म्हणजे यांचें काम नेहमीं श्रोतेपणाचें. हे चारचौघांत बहुतकरून क्वचितच तोंड उघडीत. आपल्या खोलींत आपल्याच विचाराचा, व आपला अगदीं जिवलग असा एखादा मित्र असला म्हणजे यांची कळी उमलावयाची. मग यांचा भाषणाचा ओघ सारखा आनंदानें झुळ झुळ तासचे तास वहात असावयाचा. मग त्या भाषणांत निरनिराळ्या पुस्तकांच त्यांच्या कर्त्यांचें परीक्षण चालावयाचें तर कधीं कधीं निरनिराळ्या अलीकडच्या माणसांच्यावर टीका चालावयाची. अशा वेळीं स्वारी बोलण्यात इतकी गढून जावयाची कीं, आपल्या खोलींत काळोख पडला आहे, बरीच रात्र झाली आहे, दिवा लावला पाहिजे, हें देखील स्वारीच्या ध्यानांत यावयाचें नाहीं.

विष्णुशास्त्री यांचा दुसरा स्वभावविशेष म्हणजे हल्लींच्या विद्यार्थ्यांचे प्रमाणें नाटकें पहाण्याचें त्यांना व्यसन नव्हतें. सिनेमा तर त्या वेळेला नव्हताच. त्यांना वाचनाशिवाय दुसरें कसलेंच व्यसन नव्हतें. खेळाचेंही त्यांना व्यसन नव्हतें. मात्र बरोबरीचे सोबती घेऊन जवळपासचीं रमणीय स्थळें पहाण्यास रमत गमत जावें या गोष्टीची त्यांना फार आवड असे.

अभ्यासाविषयीं म्हटलें तर वेळापत्रकाप्रमाणें काटेतोल अभ्यास करण्याचें त्यांना कधींच जमत नसे. आपल्या आवडीच्या विषयांच्या वाचनांत तासचे तास जावयाचे व आवडत नसतील ते गणितासारखे विषय यांची हेळसांड व्हावयाची असें यांचें चालत असे; यामुळें ते एक दोनदां नापासही झाले. विष्णुशास्त्री रात्रीं कधींही अभ्यास करीत

नसत. ही गोष्ट फारच चांगली. कारण एक तर लक्ष्य लावून दिवसास अभ्यास केला तर रात्रीं अभ्यास करण्याची जरूरच राहात नाहीं. आणि दुसरें,रात्रीं अभ्यास नीट होतही नाहीं.शिवाय रात्रीं अभ्यास केल्यानें नजरही बिघडते. रात्रींचा वेळ झोंप येईपर्यंत जिवलग मित्राशीं गप्पा मारण्यांत किंवा आपल्याच मनाशीं कांहीं तरी गुणगुणण्यांत ते घालवीत असत. बहुतेक विद्यार्थ्यांचें लक्ष्य परीक्षेस नेमलेलीं पुस्तकें उत्तम तऱ्हेनें व चणें एवढ्याच गोष्टींत गुंतून गेलेलें असतें. आपण बरे कीं आपली परीक्षा बरी असें त्यांना वाटत असतें. तसें विष्णुशास्त्र्यांचें नसे. परीक्षेला नेमलेल्या पुस्तकांशिवाय दुसरीं पुष्कळ उत्तमोत्तम पुस्तकें वाचण्यांत ते बराच वेळ घालवीत, यामुळें त्यांच्या अंगीं बहुश्रुतपणा फारच आला. यामुळें त्यांच्या हातून निबंधमालेसारखें उत्तम मासिक निर्माण झालें. विष्णुशास्त्र्यांचा दुसरा एक स्वभावविशेष म्हटला म्हणजे त्यांचा विलक्षण साधेपणा. ते जसे मनानें साधे होते तसेच ते पोषाखानेंही अगदीं साधे होते. आढ्यतेचा किंवा डामडौलाचा त्यांना मनापासून अगदीं तिटकारा असे. कालेजांत असतांना किती तरी विद्यार्थ्यांचा बराचसा पैसा व बराचसा वेळ पोषाखाची ठाकठिकी करण्यांत जातो. तसें विष्णुशास्त्री यांचें नसे. त्यांचा पोषाख अगदीं साधा असे. जसा त्यांचा पोषाख साधा तसाच त्यांचा स्वभाव अगदीं साधा असे. एक आंत व एक बाहेर असें त्यांचें कधींही नसे. त्यांच्या अंगीं आढ्यता मुळींच नव्हती. ते आपल्या बोलण्यानें कधींही कोणाला दुखवीत नसत यामुळें त्यांचें कोणाशींच शत्रुत्व नसे. ही गोष्ट बाळांनों, तुह्मांपैकीं भांडखोर व चढेल मुलांनीं लक्ष्यांत आणून आपला भांडखोरपणा व चढेलपणा टाकून द्यावा म्हणजे ते सर्वांना आवडते होतील.

विद्यार्थ्यांनीं नाटकें करण्याची चाल विष्णुशास्त्र्यांचे वेळींही होती व त्यांनीं देखील नाटकांत न्यायाधिशाचें काम केलें होतें असें त्यांचे एक बाळमित्र सांगत असत. पण हीं नाटकें गॅदरिंगचे वेळींच होत असत. उठले सुटले कीं लागले नाटक करायला असें त्यांचे वेळीं नव्हतें.

विष्णुशास्त्री यांचे शाळसोबती.

विष्णुशास्त्री यांचे बरोबर कॉलेजांत शिकत असलेल्या त्यांच्या मित्रांपैकीं बरेच विद्वान् व सुप्रसिद्ध झाले. त्यांपैकीं विष्णुशास्त्र्यांचे विशेष जिवलग मित्र म्हटले म्हणजे रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी. हे विष्णुशास्त्र्यांप्रमाणेंच स्वभावाचे गोड, रसाळ, निगर्वी व मनाचे मोकळे असत. विष्णुशास्त्र्यांच्या प्रमाणेंच परीक्षेला नेमलेल्या पुस्तकांशिवाय इतर पुस्तकें वाचण्याकडे यांचाही फार ओढा होता. यामुळें "समानशीले व्यसनेषु सख्यं" या न्यायानें त्यांची व विष्णुशास्त्र्यांची मैत्री जडली व ती शेवटपर्यंत कायम टिकली. त्यांचे दुसरे मित्र म्हटले म्हणजे बापुसाहेब भाजेकर. हेही स्वभावानें चांगले होते. पण यांचा पोषाख डामडौलाचा असे. तसाच यांचा स्वभावही डौली असे. यांना इंग्रजी भाषा पोकळ डौलदार वापरण्याची फार हौस असे. म्हणजे शब्द मात्र मोठे मोठे पण अर्थाच्या नांवानें पूज्य.

विष्णुशास्त्र्यांचे तिसरे मित्र प्रो. केरूनाना छत्रे यांचे चिरंजीव कोंडोपंत. हे मोठे विनोदी व मोकळ्या मनाचे असल्यामुळें यांच्या संगतींत विष्णुशास्त्र्यांचा काळ फार मजेंत जात असे.

विष्णुशास्त्र्यांचे चौथे मित्र कै. जनार्दन बाळाजी मोडक हे पुढें काव्येतिहाससंग्रह मासिक काढण्याचे कामीं विष्णुशास्त्री यांना पुष्कळ उपयोगी पडले. हे अबोल, थोडेसे भित्रे, पद्धतशीर अभ्यास करणारे, शांत व मनामिळाऊ असे होते. याच वेळीं सुप्रसिद्ध तेजस्वी व बाणेदार प्रो. जिनसीवाले हे या कॉलेजांत अभ्यास करीत असत. सर्व विद्यार्थ्यांपेक्षां यांची रहाणी अगदीं निराळी असे. कॉलेजांत बहुतेक विद्यार्थी संध्या व सोंवळेंओवळें यांना फांटा देतात तसें यांचें नसे. हे कॉलेजांतही अत्यंत कडकपणें स्नान, संध्या, पूजा, पोथी व सोंवळेंओवळें पाळीत असत. ह्यांच्या अलौकिक बुद्धिसामर्थ्यानें व अचाट वाचनानें यांची सर्व विद्यार्थी व प्रोफेसर यांचेवर विलक्षण छाप असे.

विष्णुशास्त्र्यांचा आवडीचा व्यायाम.

विष्णुशास्त्री कधीं कधीं बॅटबॉल खेळत, पण त्यांचा आवडीचा व्यायाम म्हटला म्हणजे पोहणें. ते डेक्कन कॉलेजमध्यें असतांना तासचे तास रा. ब. महाजनीबरोबर नदींत पोहत डुंबत असत. बाळांनों खरो-खरच मनुष्याला सशक्त, काटक व निरोगी बनविणारा, उत्तम व्यायाम म्हणजे पोहणें हाच होय. तुम्हांपैकीं ज्यांना पोहतां येत नसेल त्यांनीं तें लवकर शिकावें. कारण पुढें मोठेपणीं तें लवकर साधत नाहीं.

बाळांनों इतका वेळपर्यंत विष्णुशास्त्र्यांच्या [illegible]पणची व विद्यार्थिदशेंतील हकीगत सांगितली. आतां पुढें कर्ते पुरुष म्ह[illegible] त्यांचें चरित्र सांगावयाचे आहे. आतां म्हणजे इ. स. १८७१ चे शेवटीं विष्णुशास्त्री यांची बी. ए. ची परीक्षा पास झाली व ते विद्यार्थिदशा संपवून अध्यापकाचा म्हणजे शिक्षकाचा धंदा पतकरून नवीन आश्रमांत शिरले.

विष्णुशास्त्री—लेखक व शिक्षक.

कॉलेजला रामराम ठोकल्यावर प्रथम कांहीं दिवस विष्णु-शास्त्री एका खासगी हायस्कुलांत शिक्षक झाले. तें हायस्कूल कै. बाबा गोखले या नांवाच्या एका हुशार परंतु अव्यवस्थित गृहस्थांनीं काढलें होतें. तेथें शिकवीत असतांनाच फावल्या वेळीं 'शाळापत्रक' या नांवाच्या मासिकांत वडिलांच्या आज्ञेवरून ते लिहूं लागले. त्यांचा आवडीचा विषय संस्कृत होता. संस्कृत कवीचे ग्रंथही त्यांनीं मन लावून वाचले होते. यामुळें त्यांनीं तोच विषय प्रथम हातीं घेतला. संस्कृत कवि व त्यांचे ग्रंथ यांचेवर त्यांनीं फारच उत्तम लेख लिहिले आहेत. एकंदर पांच उत्तम संस्कृत कवींवर त्यांनीं शाळापत्रकांत निबंध लिहिले. त्यांची नांवें कालिदास, भवभुति, बाण, दंडी व हर्ष. हे निबंध इतके उत्तम आहेत कीं, ते कॉलेजच्या विद्यार्थ्यांस देखील पुष्कळ उपयोगी पडतात. हे निबंध जरी अगदीं लहानपणीं व नुकतेच बी. ए. झाले असतांना

विष्णुशास्त्री यांनीं लिहिले तरी त्यांतील विवेचन, टीका, भाषापद्धति व ग्रंथपरीक्षण, फारच मार्मिक आहे. त्यांचे शाळापत्रकांतील लेख वाचून त्यांचे वडील फार खूष झाले व त्यांनीं सर्वच शाळापत्रकाचें काम विष्णुशास्त्र्यांवर सोंपविलें. यामुळें विष्णुशास्त्री यांना फारच आनंद झाला; कारण आतां आपली लेखणी चालवावयाला हें चांगलेंच साधन मिळालें असें त्यांना वाटलें.

खासगी नोकरींत विष्णुशास्त्री यांना फार दिवस रहावें लागलें नाहीं. त्यांचे वडील कृष्णशास्त्री यांचेविषयीं शाळाखात्याचे डायरेक्टर चाटफील्ड साहेब यांचे मनांत फार आदर असे. यामुळें विष्णुशास्त्री बी. ए. झाले हें कळल्यावर लवकरच त्यांनीं आपण होऊन विष्णुशास्त्री यांना पुण्याच्या सरकारी हायस्कुलांत शिक्षकाची जागा दिली, व लवकरच तेथेंच त्यांना बढतीही दिली. अशा तऱ्हेनें विष्णुशास्त्री यांना प्रिय अशीं दोन कामें त्यांना सुरू करावयास सांपडलीं. हीं दोन कामें म्हणजे मासिक पुस्तक चालवून आपल्या मतांचा लोकांत प्रसार करणें व मुलांना उत्तम तऱ्हेचें देशाभिमानी बनविणारें शिक्षण देणें. आतां हें खरें कीं, हें दुसरें काम त्यांच्या मनाप्रमाणें उत्तम तऱ्हेनें त्यांना सरकारी शाळेंत करणें शक्य नव्हतें, आणि म्हणूनच ते सरकारी शाळेंत फार वर्षें टिकले नाहींत.

निबंधमालेस सुरवात.

श्रीकृष्णाचें नांव घेतांच आपल्या पुढें गीता उभी रहाते, वाल्मीकींचें नांव घेतांच रामायणाची आठवण होते, लो. टिळकांचें नांव घेतांच केसरी डोळ्यासमोर दिसूं लागतो, कै. प्रि. आगरकरांचें नांव घेतांच सुधारकाचें स्मरण होतें, त्याप्रमाणेंच विष्णुशास्त्र्यांचें नांव घेतांच, निबंधमाला दत्त म्हणून पुढें उभी रहाते. याचें कारण ज्या पुरुषाचें स्मरण करावें त्या पुरुषाचें जें अत्यंत महत्कार्य असेल तें आपल्या समोर उभें रहातें. विष्णुशास्त्री हे मोठे यशस्वी कार्यकर्ते होऊन गेले. त्यांनीं

इतकीं नवीन कार्यें घडवून आणलीं कीं, त्यांनीं जणू कांहीं नवीनच सृष्टि निर्माण केली असें वाटतें. परंतु त्यांच्या सर्व कार्यांत जर कोणाला पहिला नंबर द्यावा म्हणून विचारलें तर कोणीही न चुकतां निबंध-मालेचेंच नांव घेईल. असें जें तेजस्वी व लोकांचीं मतें खाड्दिशीं बदलून टाकणारें तेजस्वी मासिक ' निबंधमाला ' तें विष्णुशास्त्री यांनीं इ. स. १८७३ सालीं सुरू केलें.

बाळांनों, पुष्कळदां असें घडतें कीं अतीशय महत्त्वाच्या कार्याची कल्पना अगदीं सहज एखाद्या क्षुल्लक व्यक्तीकडून निघते. व ती निघते त्यावेळेला तें कार्य इतकें महत्त्वाचें होईल, एवढें परिणामकारी होईल असें कोणाच्याच मनांत येत नाहीं. तसेंच निबंधमालेचें झालें.

बाळांनों मागें तुम्हांला सांगितलेंच आहे कीं, एखाद्या सुटींत बरे-चसे फराळाचे डबे बरोबर घेऊन जिवलग मित्रांबरोबर रमतगमत एखाद्या सुटीच्या दिवशीं एखाद्या प्रसिद्ध स्थळाला पायीं जावें ही गोष्ट विष्णुशास्त्री यांना फार आवडत असे. त्याप्रमाणें सन १८७३ सालीं नाताळांत विष्णुशास्त्री आपल्या बऱ्याच मित्रांना बरोबर घेऊन आळंदीस पायीं रमत गमत गप्पा गोष्टी करीत गेले. तेथें पोहोंचल्यावर बराच वेळ तेथें मजेनें घालविल्यावर मंडळी परतली. परत येतांना वाटेनें गप्पा चालल्याच होत्या. गप्पांचे ओघांत विष्णुशास्त्री यांचे एक मित्र रा. जांभेकर हे विष्णुशास्त्री यांस सहज म्हणाले, “तुह्मी एखादें मासिक पुस्तक कां काढीत नाहीं? त्यांत कधीं नवीन विषय घालावे व कधीं तुह्मीं शाळापत्रकांत संस्कृत कवींविषयीं जे निबंध यापूर्वी छापले आहेत त्यांतीलच कांहीं घालावेत.” ही कल्पना विष्णुशास्त्री यांस बरी-चशी पसंत पडली. मात्र जुने लेख पुनः या नवीन पुस्तकांत घालावे हें त्यांना आवडलें नाहीं. नवीन मासिकांत नवीनच लेख घालावयाचे असें त्यांनीं ठरविलें, व सर्व मासिक होतां होईल तों एकट्यानेंच चालवावयाचें असें त्यांनीं ठरविलें. यावरून ज्या निबंधमालेनें मराठी भाषेला नवीन जोमदार व तेजस्वी रूप आणून दिलें व जिनें लोकांचे विचारांत अत्यंत

मोठी क्रांति घडवून आणली ती महत्वाची व चिरस्मरणीय निबंधमाला अगदीं सहज अशा रीतीनें जन्मास आली. यावरून मोठमोठ्या कार्यांचे उगम नदीच्या उगमाप्रमाणें कसे अगदीं लहान व क्षुल्लक असतात हें दिसून येईल.

हें मासिक पुस्तक विष्णुशास्त्री यांनीं अत्यंत मेहनत घेऊन इ. स. १८७३ पासून इसवी सन १८८० पर्यंत उत्तम तऱ्हेनें चालविलें. इतकें उत्तम विषयांनीं भरलेलें, इतकें शुद्ध विवेचनानें भरलेलें, इतकी निरनिराळ्या विषयांची यथास्थित व पद्धतशीर माहिती देणारें व इतकें निर्भीड पण सत्पक्षपाती मासिक पुस्तक पहिल्यापासून शेवटपर्यंत सर्व एकट्यानेंच चालविलेलें हें एवढेंच. असलें उत्तम मासिक पुस्तक पूर्वीं झालें नाहीं व पुढें होईल कीं नाहीं याची शंकाच आहे. इतकें या मासिक पुस्तकाविषयीं वाचून यांत विषय तरी काय काय आले असतील हें समजण्याची बाळांनों तुम्हांला सहजच इच्छा होईल. म्हणून त्यांत कोणकोणते विषय आले होते तें सांगतों. या मासिक पुस्तकांत १ मराठी भाषेची सांप्रतची स्थिति, २ विद्वत्व आणि कवित्व, ३ संपत्तीचा उपयोग, ४ इतिहास, ५ भाषादूषण, ६ लेखनशुद्धि, ७ भाषापद्धति, ८ वाचन, ९ भाषांतर, १० लोकभ्रम, ११ गर्व, १२ वक्तृत्व, १३ इंग्रजी भाषा, १४ डॉ. जॉन्सन, १५ मोरोपंताची कविता, व १६ आमच्या देशाची स्थिति, या विषयांवर माहितीनें अतिशय भरलेले, अनेक वेळ वाचावेसे वाटणारे अत्यंत उपयुक्त असे निबंध आलेले आहेत. शिवाय, निरनिराळ्या पुस्तकांचें परीक्षण फारच मार्मिक तऱ्हेनें केलेलें आहे. ह्या निबंधमालेचे एकंदर ८४ अंक काढून विष्णुशास्त्री यांनीं ती बंद केली. याचें कारण निबंध लिहून लोकांचे विचार पालटण्याचें इच्छिलेलें कार्य झालें असें त्यांस वाटलें, व शिवाय त्यापुढें ग्रंथमाला नांवाची एक उत्तम ग्रंथांची माला त्यांचे मनांतून तयार करावयाची होती.

या निबंधमालेंत मिशनरी मंडळी व कांहीं मोठे साहेब यांस आवडणार नाहींत असे विचार कित्येक निबंधांत आले होते. त्यावरून सौम्य शब्दांनीं थोर अधिकाऱ्यांनीं तुह्मी सरकारी नोकर आहां यामुळें इतकें कडक लिहूं नका असें विष्णुशास्त्र्यांना सांगितलें. पण तें शास्त्रीबोवांनीं मनावर घेतलें नाहीं. शेवटीं सुखाची व वाढत्या पगाराची दरमहा शंभर रुपयांची मानाची नोकरी सोडावी कीं निबंधमाला बंद करावी असा प्रश्न त्यांचे पुढें उभा राहिला. तेव्हां म्हणजे सन १८७९ सालीं निबंधमालेवरील त्यांच्या प्रेमामुळें, व स्वतंत्रतेच्या आवडीमुळें **विष्णुशास्त्री** यांनीं आपल्या नोकरीचा राजीनामा दिला.

राजीनामा देऊन पुण्यास आल्यावर पुढें काय करावयाचें हें त्यांनीं ठरविलेंच होतें. त्यांचा सर्वांत आवडीचा विषय म्हटला म्हणजे लहान मुलांना शिक्षण देणें. हें काम त्यांना सरकारी शाळेंत त्यांच्या मनाप्रमाणें करतां येत नसे, कारण त्यांच्या आवडीचे विषय त्यांना शिकवावयास मिळत नसत. हें शिक्षणाचें आवडीचें काम आपण आतां हातीं घ्यावें असें त्यांना वाटलें. हा त्यांचा विचार हां हां म्हणतां सर्व पुणें शहरांत सर्वांना लवकरच कळला. यामुळें १८७९ च्या नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांत पुणें शहरांत जिकडे तिकडे ज्याच्या त्याच्या तोंडीं हा विषय झाला. पुण्यांतील विद्यार्थ्यांचें **विष्णुशास्त्र्यांवर** अतोनात प्रेम होतें. याचें कारण **विष्णुशास्त्र्यांचा** सुस्वभाव, शिकविण्याची अतीशय आवड, विद्वत्ता, विद्यार्थ्यांविषयीं मनस्वी प्रेम, स्वार्थत्याग व उदारपणा. या सर्व गुणांमुळें **विष्णुशास्त्री** नवीन शाळा काढणार ही बातमी समजतांच स्कॉलरशिप मिळविणारे हुशार विद्यार्थी देखील आपल्या शाळेंतून नांव काढून **विष्णुशास्त्र्यांची** शाळा केव्हां निघते याची वाट पहात बसले. नवीन शाळेविषयीं इतका उत्साह यापूर्वीं विद्यार्थ्यांत कधींच दृष्टीस पडला नाहीं.

या नवीन शाळेचे कामीं शास्त्रीबुवांस मदत करण्यासाठीं त्यांच्यासारखेच स्वार्थत्यागी, युनिव्हर्सिटींत नांव मिळविलेले व अति-

शय विद्वान् असे कै. **गोपाळ गणेश आगरकर, लो. बाळ गंगाधर टिळक, रा. माधवराव नामजोशी, रा. भागवत, व रा. करंदीकर** हे लगेच येऊन मिळाले. यामुळें आपली शाळा पहिल्या प्रतीची होणार व ती 'पूना हायस्कुल'ला चांगलाच टोला लगावून सर्व शाळांत पहिला नंबर पटकावणार अशी **विष्णुशास्त्री** यांना खात्री वाटली, व ती खरी ठरली. बाळांनीं त्या शाळेचें नांव ' न्यू इंग्लिश स्कूल. ' हें न्यू इंग्लिश स्कूल सन १८८० चे जानेवारीचे पहिले तारखेस **विष्णुशास्त्री** यांनीं उघडलें. **विष्णुशास्त्री** यांचे हात अतीशय यशस्वी होते. त्यांनीं सुरू केलेली ही शाळा सर्व हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीची झाली आहे. त्या शाळेंतून हजारों गरीब विद्यार्थी विद्वान् झालेले आहेत. त्या शाळेच्या मंडळीनेंच पुढें नमुनेदार असें फर्ग्युसन कॉलेज काढलें. तेंही सर्व हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें झालेलें आहे. शास्त्रीबोवांच्या या **'न्यू इंग्लिश स्कूल'**मधून व **फर्ग्युसन कॉलेजा**मधून शिकून पुष्कळ विद्यार्थ्यांनीं युनिव्हर्सिटीच्या मोठमोठ्या स्कॉलरशिपा व पदव्या मिळविल्या आहेत व पुष्कळजण आज देशकार्य करीत आहेत. सर्व जगांतील विद्वान् गणित्यांची केंब्रिजला एक परीक्षा होते ती फारच अवघड असते व त्या परीक्षेस बसण्यासाठीं सर्व जगांतील नांवाजलेले गणिती येतात. त्या सर्वांत ज्याचा पहिला नंबर येतो त्याला सीनिअर रँग्लर असें म्हणतात व त्याला राजासारखा बहुमान मिळतो. असल्या तऱ्हेचा बहुमान आपल्या हिंदुस्थानाला या **विष्णुशास्त्र्यांच्या** फर्ग्युसन कॉलेजनेंच मिळवून दिला. याच कॉलेजमध्यें शिकलेले **ना. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे** हे हिंदुस्थानांतले पहिले सीनीअर रँग्लर झाले, तेव्हां त्यांची, फर्ग्युसन कॉलेजची व या आपल्या हिंदुस्तान देशाची सर्व जगांत वाहवा झाली. असो.

विष्णुशास्त्र्यांचें हें ' न्यू इंग्लिश स्कूल ' पहिल्यापासून अतीशय यशस्वी झालें. पहिल्याच वर्षी या शाळेंतील विद्यार्थ्यानें युनिव्ह-

र्सिटीच्या मॅट्रिक परीक्षेंत संस्कृतांत पहिला नंबर पटकावून जगन्नाथ शंकरशेट स्कॅालरशिप मिळविली.

विष्णुशास्त्री यांनीं जी जी गोष्ट हातीं घेतली ती ती अत्यंत यशस्वी झाली. ते नुसती शाळा काढून थांबले नाहींत. शाळा काढून फक्त मुलांचींच मनें सुविचारांनीं भरून टाकतां येतील पण ज्यांची शाळा सुटली आहे व जे आज निरनिराळ्या धंद्यांत गुंतलेले आहेत त्यांची वाट काय ? या मंडळीला स्वदेशाभिमानी, बाणेदार व बहुश्रुत बनवावें, एकंदर लोकांत चांगले विचार पसरवावे म्हणून आपल्या मदतगार मंडळीच्या अनुमतानें त्यांनीं किरण नांवाचा एक छापखाना विकत घेतला व त्याचें नांव बदलून त्याला आर्यभूषण असें सुंदर नांव दिलें. बाळांनों, तो छापखाना अजूनही चांगला चालला आहे.

केसरी व मराठा.

ज्यांना इंग्रजीचा गंधही नाहीं अशा लोकांना जगात काय चाललें आहे, आपल्या देशांत काय चाललें आहे, आपल्या देशाची स्थिति कशी आहे, ती सुधारण्यास आपण काय काम केलें पाहिजे, राजकीय हक्क आपण कसे मिळविले पाहिजेत, आपल्यांतील भुताखेतांच्या वगैरे वाईट समजुती कशा टाकून दिल्या पाहिजेत, ऋषिकाळांतील कोणत्या चांगल्या गोष्टी आपण पुनः सुरू केल्या पाहिजेत, इंग्रजांपासून आपण काय काय शिकलें पाहिजे, आपले उद्योगधंदे कसे सुधारले पाहिजेत वगैरे विषयांवर लेख लिहून सज्ञान व हुषार बनविण्यासाठीं विष्णुशास्त्र्यांनीं सन १८८१ चे जानेवारी पासून ' केसरी ' या नांवाचें वर्तमानपत्र मराठींत सुरू केलें तें आज सर्व मराठी पत्रांत पहिलें आहे. सन १८८१ च्या जानेवारीपासूनच निव्वळ इंग्रजी मजकुराचें ' मराठा ' पत्र त्यांनीं सुरू केलें. तें अशाकरितां कीं इंग्रजी समजणाऱ्या निरनिराळ्या गांवीं आपल्या देशबंधूंना इंग्रजी वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें

यांतील उत्तम विचाराची व लेखांची माहिती व्हावी. हेंही पत्र आज चांगल्या तऱ्हेनें लोकसेवा करीत आहे.

काव्येतिहाससंग्रह.

आपले पूर्वजांचा इतिहास वाचून आपणाला त्यांचेबद्दल अभिमान वाटावा, त्यांच्यासारखे थोर आपण व्हावें अशी इच्छा त्या वाचनानें आपल्या मनांत उत्पन्न व्हावी असें **विष्णुशास्त्री** याचे मनांत नेहमीं येत असे. आपले देशाचा इतिहास पूर्वींच्या लोकांनीं लिहून ठेवलेल्या बखरींत व रचलेल्या पोवाड्यांत उत्तम तऱ्हेनें दिलेला आहे अशी **विष्णुशास्त्र्यांप्रमाणें रा. शंकर तुकाराम शाळिग्राम, रा. काशिनाथ नारायण साने** व **कै. जनार्दन बाळाजी मोडक** यांचीही समजूत होती. म्हणून त्या कामासाठीं व प्राचीन संस्कृत काव्यें प्रसिद्ध करण्यासाठीं सन १८७८ च्या आरंभापासून रा. शाळिग्राम, रा. साने,व रा.मोडक यांचे मदतीनें विष्णुशास्त्री यांनीं काव्येतिहास संग्रह नांवाचें मासिक पुस्तक सुरू केलें. या मासिकानेंही चांगलें काम बरींच वर्षे केलें.

चित्रशाळा.

इ. स. १८७८ सालीं विष्णुशास्त्री यांनीं आणखी एक उपयुक्त संस्था स्थापन केली. तिचें नांव ' चित्रशाळा '. फोटो झिंको ऑफिसमध्यें ड्राफ्टमनचे कामांवर कोणी रा. बाळकृष्ण वासुदेव जोशी नांवाचे नोकर होते. त्यांना उत्तम उत्तम चित्रें काढण्याचा, व उत्तम चित्रें गोळा करण्याचा नाद असे. त्यांना त्यांच्या ऑफिसांत निरनिराळ्या रंगांत शिळाछापखान्यांत नकाशे कसे छापतात हें माहित होतें. त्यावरून निरनिराळ्या रंगांत प्रसिद्ध ऐतिहासिक माणसांचीं व पौराणिक देवतांचीं चित्रें निरनिराळ्या रंगांत छापवितां येतील असें त्यांना व विष्णुशास्त्री यांना वाटलें. नंतर विष्णुशास्त्री यांच्या पैशाच्या मदतीनें रंगीत चित्रें छापण्यासाठीं सन १८७८ च्या आरंभीं चित्रशाळा छापखाना

निघाला. तो अतिशय भरभराटीस आला असून त्याचें काम हल्लीं वाफेच्या ऐंजिनावर चालतें.

न्यू किताबखाना.

याच वेळीं ‘ न्यू किताबखाना ’ नांवाचें इंग्रजी, मराठी व संस्कृत पुस्तकें विकण्यासाठीं विष्णुशास्त्र्यांनीं एक दुकान काढलें. तेंही आज चांगल्या स्थितींत चालत आहे.

अशा तऱ्हेनें निरनिराळे धंदे व संस्था काढून विष्णशास्त्री यांनीं एक चांगला कित्ता तरुण सुशिक्षितांना घालून दिला. सुशिक्षितांना नोकरीवरच अवलंबून राहण्याचें कारण नाहीं. कोणताही धंदा काढून तो प्रामाणिकपणानें, मेहनतीनें व मन लावून चालविल्यास त्यावर स्वतंत्रतेनें आपलें पोट भरतां येतें हें विष्णुशास्त्री यांनीं प्रत्यक्ष कृतीनें तरुण पिढीस दाखवून दिलें.

शास्त्रीबोवांचा अंत.

आपला देश खरोखरच दुर्दैवी. एखादा तरुण कळकळीनें एकसारखा देशहितासाठीं झटत राहिला तर त्याला नानातऱ्हेच्या अडचणी यावयाच्या व कधीं कधीं तर अगदीं तरुणपणांतच देशहिताच्या त्या बिचाऱ्याच्या सर्व योजना अपुऱ्या राहून बिचाऱ्याला मरण यावयाचें असें पुष्कळ वेळां घडून येतें तसेंच थोडेंसें विष्णुशास्त्री यांचें झालें. आतां कोठें त्यांनीं स्थापन केलेल्या संस्था भरभराटीस व नांवारूपास येऊं लागल्या होत्या. त्यांची चांगली स्थिति पाहून एक नवीनच उद्योग सन १८८२ च्या आरंभापासून आपण सुरू करावा असें त्यांना वाटूं लागलें होतें. आपल्या मराठी भाषेंत निबंधमाला काढून जशी आपण उत्तम निबंधांची भर घातली, त्याप्रमाणेंच ‘ ग्रंथमाला ’ काढून उत्तम ग्रंथांची भर घालावी असें त्यांनीं ठरविलें होतें. पण दैवानें निराळेंच ठरविलें होतें. अत्यंत भयंकर प्रसंग येण्यास कधीं कधीं अतिशय क्षुल्लक कारण पुरतें तसें येथें झालें. विष्णुशास्त्री यांचे जिवलग मित्रांना वाटलें कीं आपणां सर्वांचा फोटो काढवावा म्हणून ता० १५ जानेवारी

रोजीं फोटोग्राफरला घरीं बोलावून बायकांचा फोटो काढविला व नंतर दुसरे दिवशीं विष्णुशास्त्री व त्यांचे मित्र लष्करांत फोटो काढविण्यास गेले. पहिल्यानें मित्र मंडळीसह शास्त्रीबोवांचा फोटो काढला, नंतर मंडळींचा आग्रह पडला कीं विष्णुशास्त्री यांचा एकट्याचाच उभे असलेला असा फोटो काढवावा. तेव्हां फोटो काढण्यासाठीं ते उन्हांत उभे राहिले. फोटोग्राफर जरा नवशिका होता यामुळें त्यांना जरा जास्त वेळ उन्हांत उभें रहावें लागलें. यामुळें त्यांना घेरी येऊन ते पडले. यामुळें त्यांच्या पुढील दांतांस व कानास इजा झाली. नंतर लगेच मित्रमंडळीसह ते घरीं परत आले. एक दोन दिवसांत झालेली इजा बरी झाली. पण त्यांना बारीक ताप येऊं लागला. त्यावर घरगुती इलाज त्यांनीं केले. पण ताप थांबला नाहीं. त्या बारीक तापामुळें ते फार अशक्त झाले. बाहेरून पहाणाराला हे आजारी आहेत असें वाटत नसे, पण आंतून ते दिवसेंदिवस थकत चालले. त्यांत त्यांस शौचाला साफ होईना म्हणून औषध दिलें. तें लागूं पडलें नाहीं व उलट त्यानें अंगाची अतिशय आग होऊं लागली. त्यामुळें त्यांनीं कलिंगड आणवून त्याचा तुकडा खाल्ला. हें कपथ्य झालें. त्यांचा ताप फारच वाढला, त्यांना वायू झाला व कोणाचे कांहींही इलाज न चालून आपल्या या दुर्दैवी महाराष्ट्राचा उद्धारक पंचप्राणाप्रमाणें प्रिय तेजस्वी सूर्य गुरुवार तारीख १७ मार्च १८८२ रोजीं सर्व महाराष्ट्राला शोकसागरांत लोटून पहांटेस ५॥ वाजतांच अस्ताला गेला !

विष्णुशास्त्र्यांच्या मरणाची बातमी ऐकून सर्व पुणें शहर दुःखानें विव्हळ झालें. जो तो हातांतलें काम टाकून मूढासारखा निश्चेष्ट झाला. शाळेंतील लहान लहान मुलें सकाळीं रस्त्यावर शाळेंत जाण्यासाठीं येतांच त्यांना ही भयंकर बातमी समजली. त्याबरोबर बिचाऱ्यांना रडूंच कोसळलें. तरुण व म्हातारे पुरुष व स्त्रिया यांना आपला अगदीं प्रिय नातेवाईक मेल्याप्रमाणें दुःख झालें.

प्रेतास अग्निसंस्कार.

अकरा वाजतां विष्णुशास्त्री यांची प्रेतयात्रा डोलकर आळींतून नदीकडे निघाली. हजारों लोक एकसारखे अश्रु ढाळीत प्रेताबरोबर चालले होते. नदीवर प्रेत नेलें तेव्हां एवढें तें ओंकारेश्वराचें वाळवंट पण मंडळीनें अगदीं खचून भरलें होतें. विष्णुशास्त्र्यांचें केवळ बत्तीस वर्षांतील अलौकिक कृत्यांचें थोडक्यांत पण योग्य स्तुतीपर वर्णन रा० रामभाऊ साने यांनीं केलें. नंतर प्रेतास अग्नि देऊन खिन्न मनानें तो प्रचंड समाज परत फिरला.

विष्णुशास्त्री यांचा पोषाख.

विष्णुशास्त्री अखेरपर्यंत अगदीं साधा पोषाख करीत असत. त्यांत हल्लीं झळकणारे प्रकार म्हणजे बूट, पाटलोण, नेकटाय, कॉलर वगैरे मुळींच नसत.

त्यांची आंगलट.

विष्णुशास्त्री फार किडकिडीतही नव्हते व फार लठ्ठही नव्हते. त्यांचा चेहरा अगदीं ओबडधोबड होता. तो प्रथम दर्शनी मनांत भरण्यासारखा नव्हता. प्रथम पहाणारास हे प्रचंड बुद्धि व कर्तबगारी यांचें सागर असतील असा नुसता संशय देखील येत नसे.

शास्त्रीबोवांचा स्वभाव.

शास्त्रीबोवा अबोल असत. वाटेल त्या माणसाबरोबर हवापाण्याच्या गप्पा कशा माराव्या हें त्यांना बिलकूल ठाऊक नव्हतें. हल्लींच्या बहुतेक लोकांना ताजी गरमागरम बातमी वाचण्याची अतोनात आवड दिसून येते. व त्यामुळें सकाळीं टाइम्स, क्रॉनिकल, लोकसंग्रह, ज्ञानप्रकाश, संदेश यांच्यावर त्यांच्य उड्या पडतात. पण विष्णुशास्त्र्यांचें याच्या अगदीं उलट होतें. या गरमागरम बातम्यांची त्यांना मुळींच आवड नसे व एक दिवसांतच ज्या वर्तमानपत्रांचें महत्व नाहींसें व्हावयाचें व जीं दुसऱ्या दिवशीं केराच्या टोपलीला आलिंगन द्यावयाचीं, असल्या वर्त-

मानपत्रांच्या वाचनाचा त्यांना मुळींच नाद नव्हता. फार काय वर्तमानपत्रांत चाल विषयांवर काय रणें माजलीं आहेत इकडेही त्यांचें लक्ष नसे. ते केसरींत लेख लिहीत ते देखील मासिक पुस्तकास शोभतील असे असत. उदाहरणार्थ—कालिदास श्रेष्ठ का भवभूति श्रेष्ठ, शाकुंतलपरीक्षण, असल्या विषयांवर ते लिहीत. पुण्याचें ड्रेनेज, किंवा रस्त्यांचें नामकरण, ‘ रस्त्यावरील धूळ व ती नाहींशी करण्याचे उपाय ’ किंवा ‘ मुंबईची मोडतोड ’ असल्या प्रचंड महत्वाच्या अग्रलेखांकडे ते कधींही लक्ष देत नसत. यामुळें एखादा मनुष्य असल्या चालू वर्तमानपत्री विषयांबद्दल त्यांचेजवळ बोलूं लागला तर नुसतें ‘ हुं, हुं ’ करण्यापलीकडे त्यांच्या तोंडांतून शब्दही बाहेर पडत नसे. सांगण्याचें तात्पर्य हें कीं, सर्वकाळ सारखेच महत्त्वाचे असतील असेच विषय शास्त्रीबोवांना आवडत असत. दुसरा त्यांचे स्वभावाचा विशेष म्हटला म्हणजे स्वतःविषयीं व स्वतःच्या कृत्यांविषयीं विशेष अभिमान अथवा गर्वही म्हटलें तरी चालेल. पण हा गुण चांगलाही आहे व वाईटही आहे. या अभिमानानें किंवा गर्वानें आत्मविश्वास वाढून यशस्वी कामगिरी हातून घडल्यास हा सद्गुण होतो. नुसत्या वल्गना करण्याकडे हा गुण लागल्यास त्याला दुर्गुण म्हणतात. मग ती शुद्ध बढाई होते. **विष्णुशास्त्री** यांचे आंगीं हा सद्गुण झाला. कारण या गुणानें त्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांनीं अलौकिक कामगिरी करून दाखविली. बाळांनो, यावरून आत्मविश्वास धरावा, पण व्यर्थ बढाई मारूं नये हें तुम्ही लक्ष्यांत ठेवाल तर तुमचें कल्याण होईल.

विष्णुशास्त्री यांचीं धर्ममतें.

विष्णुशास्त्री यांचे धर्माच्या बाबतींतील विचार नवीन शिकलेल्या सुधारकांप्रमाणेंच होते. म्हणजे, ब्रह्मा, विष्णु, शंकर वगैरे अनेक देव त्यांना संमत नव्हते. जेव्हां जेव्हां निबंधमालेंत देवाविषयीं लिहिण्याचा प्रसंग येई, तेव्हां ते जगन्नियंता परमेश्वर, किंवा जगच्चालक प्रभु असें लिहीत असत. शंकर किंवा विष्णु अशा नांवानें ते ईश्वराची प्रार्थना

करात नसत. असें जरी होतें तरी ते घरीं सर्व धर्मकर्में जुन्या चालत आलेल्या संप्रदायाप्रमाणें करीत असत. म्हणजे जरी स्वतःचें एकेश्वरी मत असलें तरी शेंकडों वर्षें आपल्या घराण्यांत शहाणे पूर्वज जें करीत आले ते आपल्या मनाला पटत नाहीं एवढ्यावर सर्व पूर्वजांना मूर्ख ठरवून आपल्या मनाप्रमाणें एकदम बदलायचें हें त्यांना बरोबर वाटत नसे. म्हणूनच वरच्या धर्मपद्धतींत त्यांनीं कांहीं बदल केला नाहीं.

विष्णुशास्त्री यांचीं शकुनभूतविषयक मतें.

लोकभ्रम या विषयावर **विष्णुशास्त्री** यांनीं निबंधमालेंत एक निबंध लिहिला आहे. त्यांत भूत, पिशाच्च वगैरे सर्व खोट्या कल्पना आहेत असें विवेचन केलेलें आहे. त्याच निबंधांत मांजर आडवें जाणें वगैरे ज्या अपशकुनांविषयीं कल्पना लोकांत पसरल्या आहेत त्या अगदीं वेडगळपणाच्या आहे असें त्यांनीं दाखविलें आहे.

विष्णुशास्त्र्यांचें एकच व्यसन.

विष्णुशास्त्री यांना कोणतेंही वाईट व्यसन नव्हतें. त्यांचे वेळच्या कॉलेजमधील विद्यार्थ्यांवर दारू, चिरूट, चहा या त्रिकुटांचा बराच अम्मल बसला होता. पण **विष्णुशास्त्री** यांना या व्यसनाचा विटाळही नव्हता. त्याचप्रमाणें त्यांनीं एकपत्नी व्रतही अत्यंत निश्चयानें पाळलें. हें सांगण्याचें कारण कीं, त्यांची बायको नेहमीं आजारी असे व पुष्कळ दिवस माहेरींच असे. तिच्यापासून त्यांना एकच मुलगी झाली व ती ५।६ दिवसांची होण्यापूर्वींच मेली. पुढें तिला मल झालें नाहीं. म्हणून **विष्णुशास्त्री** यांच्या आईनें त्यांना दुसरें लग्न करण्याविषयीं अतिशय आग्रह केला. **विष्णुशास्त्री** आईचा फार मान ठेवीत व तिच्या आज्ञेंत वागत; परंतु आईनें दुसरें लग्न करण्याची गोष्ट एक दोनदां काढली, त्यावर त्यांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. हेतु हा कीं, आईची अवज्ञा न व्हावी. परंतु पुनः तीच गोष्ट दुसऱ्याकडून आईनें त्यांच्याजवळ काढतांच त्यांना फार संताप आला व मला एक बायको

आहे तेवढी पुरे, मूल नसलें तरी चालेल. मला दुसरें लग्न बिलकूल करावयाचें नाहीं असें त्यांनीं निक्षून सांगितलें.

हल्लीं घरोघर बोकळलेल्या चहाचेंही त्यांना व्यसन नव्हतें. फार काय पण सुपारीचेंही त्यांना व्यसन नव्हतें. नाहीं म्हणायला त्यांना एक व्यसन जबरदस्त होतें. त्या व्यसनाचा मात्र त्यांच्यावर पुरा पगडा बसला होता. त्या व्यसनापायीं पैशाचा व वेळाचाही, बराच चुराडा झाला. तें व्यसन कोणतें म्हणाल तर पुस्तकांचें. विष्णुशास्त्रयांचे वडील जिवंत होते तोंपर्यंत त्यांना आपल्या प्राप्तीपैकीं संसाराकडे कांहींही द्यावें लागत नसे. असें होतें तरी स्वारीजवळ फारसे पैसे शिल्लक रहात नसत. केव्हांही स्वारी मुंबईस गेली कीं नवीन नवीन चांगलीं पुस्तकें खरेदी करण्यांत स्वारीचे पैसे हां हां म्हणतां उडून जावयाचे, इतकेंच नव्हे तर कोणी मित्र मुंबईस जाण्यास निघाला कीं, मुंबईहून खरेदी करून आणण्यासाठीं यांची नवीन पुस्तकांची यादी त्याचे जवळ जावयाचीच. याशिवाय जुनीं पुस्तकें सुंदर तऱ्हेनें बांधविण्यांतही त्यांचा बराच पैसा खर्च होत असे. आतां पुस्तकें आलीं कीं त्यांना दुसरें कांहीं सुचावयाचें नाहीं. सारा वेळ घरच्या लायब्ररींत तासचे तास बसून तें पुस्तक एकदांचें संपवावयाचें असें यांना पुस्तकांचें जबरदस्त व्यसन होतें. बाळांनो, या व्यसनामुळेंच त्यांचें ज्ञान अतोनात वाढलें व ते इतके थोर ग्रंथकार व लेखक झाले. बाळांनों, विष्णुशास्त्र्यांप्रमाणें सर्व दुर्व्यसनांपासून दूर रहा. विष्णुशास्त्र्यांप्रमाणें चहापासून देखील दूर रहा. आणि बाळांनों विष्णुशास्त्र्यांप्रमाणें पुस्तकांचें व्यसन लावून घ्या म्हणजे तुमचें कल्याण होईल. मात्र एक गोष्ट लक्षांत ठेवा कीं, पुस्तकांच्या व्यसनाप्रमाणेंच व्यायामाचेंही व्यसन लावून घ्या म्हणजे तुम्ही दीर्घायु व्हाल व देशाचें पुष्कळ कल्याण कराल. बाळांनों, हें विष्णुशास्त्र्यांचें सुंदर चारित्र नेहमीं आपल्या डोळ्यांसमोर ठेवा व त्यांच्याप्रमाणें देशाचें हित करण्यास झटा.

प्रिन्सिपाल गोपाळ गणेश आगरकर.

बाळांनों, आतां तुम्हांला एक तेजस्वी, निश्चयी, दीर्घोद्योगी, सत्यनिष्ठ देशभक्ताचें चरित्र सांगणार आहें. प्रसिद्ध संत तुकारामबोवा म्हणतात ' निश्चयाचें बळ तुका म्हणे तेंचि फळ' हें म्हणणें ज्यानें खरें करून दाखविलें अशा धाडसी वीराचें चरित्र आतां मी तुम्हांला सांगणार. लहानपणींच वडील मरणें, घरची अन्नान्नदशा होणें, कोणाचाही आधार नसणें, अंगांत घालायला देखील एका सदऱ्याशिवाय दुसरें कांहीं नसणें, असल्या कितीही अडचणी आल्या तरी ज्याचें धैर्य खचलें नाहीं, इतक्या अडचणी आल्या तरी ' उत्तम विद्या मी मिळवीनच मिळवीन ' हा निश्चय ज्यानें तडीस नेला, तुमच्यासारखे मॅट्रिकचे वर्गांतच रखडत बसणार असें गुरुजी म्हणतांच अंतस्थ तेजस्वितेनें व पूर्ण आत्मविश्वासानें आपल्या गरीब स्थितींतही ज्यानें निश्चयानें, धैर्यानें व स्पष्टवक्तेपणानें ' नाहीं गुरुजी, तुमच्यासारखा एम्. ए. होणार ' असें ठांसून उत्तर दिलें व तें हजारों अडचणींशीं व संकटांशीं झगडून त्यानें खरें करून दाखविलें अशा कर्मवीराचें चरित्र आतां तुम्हाला ऐकावयाला सांपडणार. अठराविश्वे दारिद्र्यांत बाळपण गेल्यावर स्वतःच्या हिमतीवर अतिशय विद्वान् झाल्यावर, व सपाटून पैसे मिळण्याची संधि प्राप्त झाल्यावर, ती संधि कोण फुकट जाऊं देईल ? कोणीही जाऊं देणार नाहीं. पण ज्यानें अत्यंत गरिबींत अत्यंत विद्वान् होऊन अत्यंत श्रीमंत व सुखी होण्याची संधि आली असतां आपल्या देशबंधूंच्या शिक्षणासाठीं, देशसेवेसाठीं त्या सोन्यासारख्या संधीला लाथ मारली व गरीबीला प्रेमानें मिठी मारली अशा एका थोर महात्म्याचें, अशा एका संताचें मी तुम्हाला चरित्र सांगणार आहें. ' जें जें म्हणून मनाला सत्य म्हणून वाटेल तें तें देशहितासाठीं स्पष्टपणें सांगावें, मग तें लोकांना डो किंवा न आवडो'

अशा स्पष्टवक्त्या देशसेवकाचें चरित्र बाळांनों आतां तुम्हांला मी सांगणार. असल्या अलौकिक गुणांनीं भूषित झालेले गोपाळरावजी यांचा जन्म इ. स. १८५६ च्या जून महिन्यांत झाला. त्यांचा जन्म एका मोठ्या शहरांत झाला नाहीं. त्यांचा जन्म अतिशय लहान अशा टेंभूनांवाच्या खेड्यांत झाला. एवढ्या थोर पराक्रमी पुरुषाचा जन्म असल्या लहान खेड्यांत झाला, याचें बाळांनों तुम्हांला आश्चर्य वाटायला नको. मोठमोठाल्या नद्यांचा उगम जसा अगदीं लहान आकुंचित स्थळीं होतो, तसा थोर पुरुषांचाही जन्म अगदीं लहानशा खेड्यांतही कधीं कधीं होतो. त्यांचें हें जन्मगांव टेंभू सातारा जिल्ह्यांत कऱ्हाडाजवळ आहे.

पूर्वजांची हकीकत.

गोपाळरावांच्या पणजोबांचें नांव बच्चाजीपंत. हे चांगलें खाऊन पिऊन सुखी होते. त्यांचे चिरंजीव **विष्णुपंत** यांचे कारकीर्दीतही या कुटुंबाची स्थिति साधारण होती. या **विष्णुपंतांचे** चिरंजीवांचें नांव **गणेशपंत**, हेच आपल्या चरित्रनायकांचे वडील. ह्यांचे कारकीर्दींत मात्र या कुटुंबाला अतिशय गरीबी आली. ह्यांचें लग्न टेंभू गांवालगतचे कऱ्हाड गांवच्या **विष्णुपंत भागवत** यांच्या ठकू नांवाच्या मुलीशीं झालें. **ठकूताईचें** सासरचें नांव **सरस्वतीबाई** असें होतें. बाळांनों, आलेंना आतां लक्ष्यांत कीं गोपाळरावांच्या बापाचें नाव **गणेशपंत** व आईचें नांव **सरस्वतीबाई**. हीं दोघेंही फार सज्जन व सुशील होतीं. दोघेंही मोठीं देवभक्त होतीं. सरस्वतीबाईंना देवावर सुंदर सुंदर गाणीं रचण्याचा व तीं आपल्या गोड आवाजानें म्हणण्याचा फार नाद असे. **गोपाळरावांना** एकंदर पांच भावंडें होतीं. दोन भाऊ व तीन बहिणी. **गोपाळरावांचा** जन्म झाला, तेव्हां त्यांच्या आईबापांची अगदीं अन्नान्नदशा झाली होती.

गोपाळरावांचें आजोळ कऱ्हाडास होतें. त्यांचे आजोळची स्थिति साधारण चांगली होती. यामुळें त्यांची आई मुलांना घेऊन कांहीं दिवस माहेरीं रहावयास जात असे.

गोपाळरावांचें शिकण्याचें वय झालें तेव्हां ते आपल्या आजोळीं कऱ्हाडास गेले, कारण टेंभू येथें शिकण्याची मुळींच सोय नव्हती. कऱ्हाडास मराठी शाळा होती, व तेथें इंग्रजी शाळाही होती. पण त्या शाळेंत इंग्रजी तीनच इयत्ता होत्या. गोपाळरावांचा अभ्यास कऱ्हाडास फार मजेनें झाला; याचें कारण त्यांच्याच वयाचे त्यांचे धाकटे मामा **दत्तोपंत** हे त्यांना फार चांगले सोबती मिळाले. या मामाभाच्यांचें एकमेकांवर फारच प्रेम होतें. असो. याप्रमाणें आनंदानें **गोपाळरावांनीं** आपला कऱ्हाड येथें होण्यासारखा होता तेवढा अभ्यास आपल्या वयाच्या तेराव्या वर्षींच पुरा केला.

गोपाळरावांचा बालस्वभाव.

गोपाळराव लहानपणीं निरोगी, चपळ, सशक्त व खेळांत फार पटाईत होते. चेंडू दांडू, आट्यापाट्या वगैरे धूमधडाक्याचे खेळ खेळून त्यांनीं आपलें शरीर धळकट बळकट व काटक बनविलें होतें. शिवाय अत्यंत आरोग्यदायक असा पोहण्याचा व्यायामही ते मनसोक्त घेत असत. पवित्र कृष्णानदी त्यांचे कऱ्हाडाजवळच असल्यामुळें त्यांची पोहण्याची चांगली सोय झाली होती.

अशा तऱ्हेनें, अभ्यासानें त्यांनीं आपलें मन सुशिक्षित केलें व व्यायामानें शरीर पीळदार बनविलें, यामुळें ते नेहमीं आनंदी व उल्हासी दिसत असत.

पुढें काय ?

येथवर झालें तें सर्व ठीक झालें; पण ' पुढें काय ?' हा प्रश्न गरीब मुलांना कितीतरी वेळां त्रास देतो, तसा तो आतां **गोपाळरावांना** त्रास देऊं लागला. कऱ्हाडच्या शाळेंतील शिक्षण मिळविलें. आतां त्या पुढचें शिक्षण मिळविण्यासाठीं त्यांचे बरेच मित्र पुण्यास गेले. आपल्या गरीबी-मुळें आपणांला जातां येत नाहीं हें मनांत येतांच **गोपाळरावांच्या** डोळ्यांतून टच्चदिशीं पाणी आलें. गरीबी मोठी कठीण आहे. आजपर्यंत

किती तरी हुशार मुलांच्या हुशारीचें हिनें मातेरें केलें आहे, किती तरी हुशार व महत्वाकांक्षी मुलांना निव्वळ खर्डेघांशे बनविलें आहे, किती तरी चलाख व पाणीदार बाळकांना नाउमेद करून टाकलें आहे. असल्या या दुष्ट गरीबीनें प्रथम **गोपाळरावांनाही** आपला इंगा चांगलाच दाखवला. त्यांचे सोबती पुण्यास शिकण्यास गेले. या बयाबाईनें बिचाऱ्या **गोपाळरावांना** नाउमेद करून केवळ आपल्या तेराव्या वर्षी कऱ्हाडच्या मुनसफकोर्टांत खर्डेघांशी कारकून बनविलें. एखादा लेंचापेंचा मुलगा असता तर गरीबीनें त्याला जन्मभर खर्डेघांशातच डांबून ठेवलें असतें. पण आमचे **गोपाळराव** कांहीं असे कच्च्या दमाचे नव्हते. ते निश्चयी व धाडशी होते. त्यांनीं इतरांप्रमाणें गरीबीपुढें वांकण्याचें साफ नाकारलें. इतकेंच नव्हे तर त्या गरीबीलाच आपल्यापुढें वांकवून आपण आपली महत्वाकांक्षा पूर्ण करून घ्यावयाची असा त्यांनीं पक्का निश्चय केला.

कऱ्हाडाहून रत्नागिरीस.

मुनसफ कोर्टांत खर्डे घांशीत असतां **गोपाळरावांना** आपल एक नातेवाईक रत्नागिरीस आहेत असें समजलें. लागलीच स्वारीनें रत्नागिरीस जाऊन तेथील हॉयस्कुलांतून मॅट्रिक होण्याचा निश्चय केला. हा त्यांचा धाडसी निश्चय पाहून त्यांचे मुनसफ रा. सा. नागपूरकर यांना मोठें कौतुक वाटलें व त्यांनीं मदतीदाखल या वीरबाळाला ७५ रुपये दिले. ते रुपये कंबरेला खोऊन **गोपाळराव** पायींच रत्नागिरीस जावयास निघाले.

आगींतून फोफाट्यांत.

कऱ्हाडाहून रत्नागिरीस म्हणजे सुमारें दोनशें मैलांचा प्रवास. एवढा लांबचा प्रवास केवळ मनाच्या उत्सुकतेनें एवढ्या लहान वयांत गोपाळरावांनीं पायींच केला. पण येथेंही त्यांचें दुर्दैव त्यांच्या पाठोपाठ आलेंच. ते ज्या नातेवाईकाच्या भरंवशावर इतक्या दूर आले होते, त्यानें त्यांच्याकडे पाठ फिरविली व त्यांना आश्रय देण्याचें साफ नाका-

रलें. एखादा कच्च्या धीराचा मुलगा असता तर या निराशेनें त्याची कंबरच खचून गेली असती. पण आमचे गोपाळराव इतक्या कोंवळ्या वयांतही पक्के हिंमतबहाद्दर होते. त्यांनीं लगेच मधुकरी मागण्याचें किंवा वार लावण्याचें ठरविलें व शाळेचे खर्चाकरितां लोकांकडे शागिर्दी करण्याचें ठरविलें. इतकें **गोपाळरावांनीं** केलें खरें, पण लोकांची नोकरी करून बिचाऱ्यांना अभ्यास करावयास मुळींच वेळ मिळेनासा झाला. यामुळें कऱ्हाडाहून रत्नागिरीस म्हणजे आगींतून फोफाट्यांत पडल्यासारखें त्यांना झालें. शेवटीं नाइलाज होऊन ते रत्नागिरीहून कऱ्हाडास परत आले.

पूर्वीं कारकून तर आतां काम्पौंडर.

गरीबी मनुष्याला काय करावयाला लावील व किती वांकवील याचा कांहीं नेम नाहीं. मुनसफकोर्टांतील खर्डेघांशींचें सुख **गोपाळरावांनीं** पूर्वीं अनुभविलेंच होतें. यामुळें खर्डेघांशींत पुनः ते पडले नाहींत शिवाय जन्मभर नोकरींत रहाण्याचा त्यांचा विचार नव्हता, म्हणून कांहीं दिवसांपुरते कांपौंडर बनले. तरी आपणांला पुढें शिकावयाचें हा आपला निश्चय त्यांनीं सोडला नाहीं. दैव तरी हात धुवून पाठीस लागून मनुष्याची परीक्षा पहातें. पण एकदां तें मनुष्य दैवाच्या परीक्षेंत उतरलें म्हणजे तेंच विरोधी दैव अनुकूल होतें. तसेंच कांहींसें **गोपाळ**रावांच्या बाबतींत झालें. दैव त्यांना आतां अनुकूल झालें. त्यांचे थोरले मामा वऱ्हाडांत अकोला या शहरीं होते. त्यांनीं तेथील हायस्कुलांत अभ्यास करण्यासाठीं आपला भाऊ **दत्तोपंत** व आपला भाचा म्हणजे आपले **गोपाळराव** यांना बोलावलें. झालें. आतां **गोपाळ**रावांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण निर्विघ्नपणें होणार अशी त्यांना खात्री वाटली व फार आनंद झाला.

अकोल्यांतील आनंदाचा काळ.

अशा तऱ्हेनें अचानक दैव अनुकूल होऊन **गोपाळरावांना** आपले मामा व जिवलग मित्र **दत्तोपंत** यांचेबरोबर आपले थोरले मामा

सदाशिवराव भागवत यांचे घरीं अकोल्यास जावयास सांपडलें. अकोल्यास गेल्यावर **दत्तोपंत** मामा व **गोपाळराव** भाचे अशी ही मामा-भाच्यांची जोडी आनंदानें हायस्कुलांत शिकावयास जाऊं लागली. तेथें त्यांना नशिबानें अतिशय हुषार, रसिक, प्रेमळ व सुशील असे राव बहादूर **विष्णु मोरेश्वर महाजनी** हे हेडमास्तर लाभले. **गोपाळराव** स्वभावतःच चलाख पण जरासे तापट असे होते. त्यांना खोटें मुळींच खपत नसे. तसेंच आपलें कांहीं एक मत ठाम असतां केवळ दुसऱ्याला खूष करण्याकरितां होस हो करण्याचा त्यांना अगदीं मनापासून तिटकारा असे. यामुळें त्यांचे त्यांच्या शिक्षकांबरोबर वारंवार खटके उडत असत. अशा प्रसंगीं **रा. ब. महाजनी** हे मध्यस्ती करून गुरुशिष्यांचा समेट घडवून आणीत असत.

एकदां तर प्रत्यक्ष **रा. ब. महाजनी** यांचेशींच **गोपाळरावांचा** खटका उडाला. तो प्रसंग असाः— एक दिवस कांहीं कारणामुळें गोपाळरावांना शाळेस जाण्याला उशीर झाला. हे शाळेंत उशिरां आलेले पाहून **रा. ब. महाजनी** म्हणाले ' हें कांहीं चांगलें लक्षण नाहीं. अशा रीतीनें आपण या मॅट्रिकक्लासांतच रखडत रहाणार ? ' हें भाषण का त्या मानी व तेजस्वी **गोपाळरावांना** खपणार ? त्यांनीं गुरुजींना लगेच ताडकन् उत्तर दिलें कीं ' येथें रखडण्याचें तर नांवच नको पण तुमच्यासारखा एम्. ए. होईन तरच नांवाचा आगरकर. ' हें उत्तर ऐकून एखादा दुसरा साधारण शिक्षक असता तर त्याला अतिशय संताप आला असता व त्यानें हा मुलगा उद्धट, अहंमन्य व बढाईखोर आहे, व यानें आपला अपमान केला असा समज करून घेतला असता. पण **राव. ब. महाजनी** हे उदार मताचे व सहानुभूतीनें विचार करणारे शिक्षक होते. यामुळें त्यांचें **गोपाळरावांविषयीं** वाईट मत तर झालेंच नाहीं, पण उलट त्यांच्या आत्मविश्वासाबद्दल व त्यांच्या तेजस्वी व बाणेदार स्वभावाबद्दल त्यांना मोठें कौतुक वाटलें. अंगांत तशीच धमक व तेजास्विता असल्याशिवाय अत्यंत गरीबींतील

मुलाच्या तोंडून असें धाडसाचें भाषण कधींच निघावयाचें नाहीं. कांहीं नुसत्याच बढाईखोर मुलांच्या तोंडून असें वाक्य कदाचित् निघेल. पण तें गोपाळरावांनीं जसें खरें करून दाखविलें तसें त्यांच्या हातून कधींच व्हावयाचें नाहीं.

असो. दरवर्षी वरच्या वर्गांत जात जात सरतेशेवटीं **गोपाळराव** व त्यांचे मामा **दत्तोपंत** हे इसवी सन १८७५ सालीं मॅट्रिक्युलेशनचे परीक्षेंत पास झाले. पुनः आतां पुढें काय करावें हा प्रश्न **गोपाळरावांच्या** पुढें उभा राहिला.

डेक्कन कॉलेजांत.

मॅट्रिक झाल्यावर आतां आपण पुढें काय करावें हा प्रश्न **गोपाळ-रावांपुढें** उभा राहिला, म्हणून मागें सांगितलेंच आहे. त्या प्रश्नाचें उत्तर लगेच **गोपाळरावांनीं** मनांत ठरवून टाकलें, तें हें कीं ' डेक्कन कॉले-जांत जावयाचें ' त्यांचे मामा **दत्तोपंत** हे त्यांच्याबरोबरच मॅट्रिक झाले. हे डेक्कन कॉलेजांत जाणार असें ठरलेंच होतें.

आपण डेक्कन कॉलेजांत जाणार असें जेव्हां **गोपाळरावांनीं** आपल्या मित्रमंडळीला सांगितलें, तेव्हां त्या मंडळींत एकच हंशा पिकला. ते म्हणाले, या स्वारीला खास वेड लागलें आहे. स्वारींची गरीबी म्हणजे कोण ? मॅट्रिकपर्यंत मजल मारावयाला सांपडली हेंच आश्चर्य आणि स्वारी आतां मनोराज्य करावयाला लागली आहे कीं, आम्ही डेक्कन कॉलेजांत जाणार. फुकटचेंच असेल डेक्कन कॉलेजमधें जाणें ! यांना खरोखर वेड्यांच्याच इस्पितळांत घातलें पाहिजे. इतकी जरी मंडळींनीं चेष्टा केली, तरी **गोपाळरावांचा** निश्चय ढळला नाहीं. त्यांनीं आपली तयारी सुरू केली. त्यांचा बेत पक्का ठरला हें पाहून त्यांचे प्रेमळ गुरुजी **रा. ब. महाजनी** व दुसरे एक दोन सद्गृहस्थ यांनीं त्यांना ५०-६० रुपये उसने दिले. ते घेऊन **गोपाळरावजींनीं** अकोलें सोडलें, पुण्यास गेले, व त्यांनीं डेक्कन कॉलेजांत आपलें नांव दाखल केलें.

एकच सदरा.

बाळांनों ' एकच सदरा ' हा मथळा वाचून तुम्हांला ' एकच प्याला ' नाटकाची आठवण होईल. त्या नाटकांतील एकच प्याला नायकाच्या नाशास कारण झाला, पण आमच्या या चरित्रांत एकच सदरा हा आमच्या चरित्रनायकाची अब्रू राखण्यास व त्याला नांवालौकिकास चढविण्यास कारण झाला. बाळांनों, **गोपाळराव** कॉलेजांत गेले तेव्हां त्यांची इतकी गरीबी होती कीं, बिचाऱ्याला अंगांत घालावयाला एकच सदरा होता. तुमच्याप्रमाणें एक दोन शर्ट परटाकडे गेले आहेत, एक दोन खुंटीवर लोळत आहेत व एक कडकडीत इस्तरीचा अंगावर चढला आहे व याशिवाय ज्याकिटें अन् कोट नी पाटलोणी आहेत त्या निराळयाच, अशी कांहीं **गोपाळरावांची** स्थिति नव्हती. त्यांचा एकच एक जिवलग सदरा होता. तेव्हां मळला असतां तो परटाकडे देणें अशक्य होतें म्हणून **गोपाळराव** रात्रीं सर्व रेसिडेन्सींतील मंडळी निजली म्हणजे आंघोळीच्या खोलींत जात. तेथें अंगांतील सदरा काढून स्वतः स्वच्छ धुवीत, वाळवीत व तोच मग पुन: अंगांत घालीत. कोणही गरीबी ! देवा असला दुःखकारक प्रसंग कोणावरही न येवो! **गोपाळरावांना** ५०।६०रु. उसने मिळाले होते म्हणून सांगितलें; पण ते केव्हांच खलास झाले. आतां पैसे आणावे कोठून ही त्यांना पंचाईत पडली; तेव्हां त्यांनीं पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक सभेंतील एका विषयावर भाषण केलें व त्या विषयाला नेमलेलें ५० रुपयांचें बक्षीस मिळविलें. त्याचप्रमाणें एक उत्तम निबंध लिहिणाराला त्यांच्या कॉलेजांत ५० रुपयांचें बक्षीस लावलें होतें, तो निबंध त्यांनीं लिहिला व तें ५० रुपयांचें बक्षीस मिळविलें. अशी कशी तरी धडपड करून व मेहनत घेऊन गोपाळराव कॉलेजचा खर्च कसा तरी भागवीत असत. या अतिशय मेहनतीचा **गोपाळरावांच्या** पीळदार शरीरावरही परिणाम झाला. त्यांची प्रकृति खराब झाली व त्यांचे आईला असलेला दम्याचा विकार त्यांना कायमचा जडला. एफ्. एच्या परीक्षेचा

अभ्यास **गोपाळरावांनीं** मन लावून केला, पण परीक्षेची वळ जवळ आली तरी परीक्षेची फी भरण्यास **गोपाळरावांच्या** जवळ पैसे नव्हते. ते पैसे मिळविण्यासाठीं **गोपाळरावांनीं** एक नाटक लिहिण्याचा निश्चय केला. हें जेव्हां त्या वेळचे दयाळू प्रोफेसर **केरूनाना छत्रे** यांना समजलें तेव्हां त्यांना फार वाईट वाटलें व त्यांनीं स्वतः **गोपाळरावांची** फी भरली व नाटक लिहिण्याच्या यातायातींतून त्यांना मुक्त केलें. असले प्रेमळ प्रोफेसरांवर विद्यार्थ्यांचें अत्यंत प्रेम असावयाचेंच हें सांगावयालाच नको. देव करो आणि असले प्रेमळ शिक्षक व तसेच प्रेमळ आज्ञाधारक शिष्य या आमच्या देशांत ऋषिकाळाप्रमाणें हल्लींहि हजारों निपजोत. व गुरुशिष्यसंबंध अत्यंत पवित्र व प्रेमळ असा सदोदित राहो. अशा तऱ्हेनें संकटांशीं झगडत **गोपाळराव** सन १८७८ सालीं बी. ए. ची परीक्षा उत्तम तऱ्हेनें पास झाले. यामुळें त्यांना डेक्कनकॉलेजांत फेलो नेमलें.

आतां **गोपाळरावांना** थोडी स्वस्थता प्राप्त झाली. आतां फेलोला ५० रुपये दरमहा मिळतात त्याप्रमाणें त्यांना मिळूं लागले, यामुळें पैशाची ददात राहिली नाहीं. आतां **गोपाळरावांनीं** एम्. ए. च्या परीक्षेचा अभ्यास सुरू केला. **गोपाळरावांनीं** एम. ए. साठीं तत्त्वज्ञान हा विषय घेतला होता. त्या विषयावरील जॉन स्टूअर्ट मिल नांवाच्या अत्यंत विशाल बुद्धीच्या पंडिताचे ग्रंथ त्यांनीं पुष्कळ लक्ष लावून वाचले. ह्या थोर मिलसाहेबांच्या अंगीं दोन फार उत्तम गुण होते. एक मनुष्यजातीचें हित करण्याविषयींची कळकळ व दुसरा न्याय व स्वातंत्र्य यांबद्दल निस्सीम प्रेम. हे साहेबांच्या अंगचे दोन उत्तम गुण त्यांचे ग्रंथ मनःपूर्वक वाचल्यानें **गोपाळरावांच्या** मनांत पूर्णपणें बिंबले व पुढें स्पेन्सर नामक उदार व हुषार पंडिताच्या ग्रंथांच्या वाचनानें ते त्यांच्या मनांत कायमचे रुजले. या थोर गुणांचा परिणाम गोपाळरावांनीं यापुढें जीं जीं कामें केलीं त्यांत व त्यांच्या लेखांत स्पष्ट दिसून येतो. अशा तऱ्हेनें कॉलेजांत उत्तम ग्रंथ वाचल्यामुळें त्याचा कायमचा परिणाम

पुढील आयुष्यांत फारच थोड्या विद्यार्थ्यांत दिसून येतो. याचें कारण ते खरे विद्यार्थी नसतात. तर ते नुसते परीक्षार्थी असतात. **न्यायमूर्ति रानडे, मालाकार चिपळुणकर, देशभक्त आगरकर, लो. टिळक** व **भारतसेवक गोखल,** हे खरे विद्यार्थी होते. ईश्वरा, असे खरे विद्यार्थी दरवर्षीं शेंकडों निपजोत व या भारतभूमातेचा उद्धार करोत. असो. गोपाळराव सन १८८० सालीं एम्. ए. झाले.

हा संसार का संन्यास ?

गोपाळरावांच्या विद्यार्थिदशेचें एवढा वेळ वर्णन झालें. आतां आमचे गोपाळराव संसारी क..ळ त्याविषयींची थोडीशी हकीगत सांगतों. बी. ए. च्या वर्गांत गे..वर गोपाळरावांचें लग्न झालें. हल्लीं आपल्या इकडे लग्नाची चाल पूर्वीपेक्षां बरीच निराळी आहे. बराचसा हुंडा मिळाला का, काशींतील नवरदेव रामेश्वरच्या नवरीशीं लग्न लावतो. पूर्वी असा प्रकार नसे. साधारण आपल्या गांवाजवळच्या गांवची मुलगी आपले मुलास करण्याची तेव्हां चाल असे. हेतु हा कीं, त्या मुलीची चालरीत व त्या कुटुंबाचें कुलशील आपणाला पूर्णपणें माहीत असावें. जवळच्या गांवची नवरा नवरी असली म्हणजे हें कांहीं कठीण नाहीं; पण तोच नवरा मुलगा दिल्लीचा व नवरी मद्रासची असें असलें म्हणजे सर्व माहिती सहज मिळते असें नाहीं. मग घाईघाईत पुष्कळ चुका होतात व मग सावकाशपणें सर्व जन्मभर पश्चात्ताप करण्यास चांगलेंच सांपडतें. असो. सांगायचें तात्पर्य हेंच कीं, पूर्वीं असें नव्हतें. गोपाळरावांचेंच उदाहरण घ्या. त्यांची आई कऱ्हाडची व बाप अगदींच शेजारीं असलेल्या टेंभूगांवचा. त्याचप्रमाणें गोपाळराव टेंभूचे तर त्यांच्या नवरीचें गांव जवळच असलेलें उंब्रण. उंब्रण येथें मोरभट फडके म्हणन एक सद्गृहस्थ रहात असत. त्यांच्या मुलीचें नांव अंबूताई. ह्या अंबूताईचें गोपाळरावांचे बरोबर गोपाळराव बी. ए. च्या वर्गांत असतांना लग्न झालें. अंबूताई सासरीं आल्याबरोबर यशोदाबाई आगरकर बनल्या.

गोपाळरावांचे एक बंधु संसार करावयाचा नाहीं असा निश्चय करून भगवीं वस्त्रें धारण करून संन्यासी बनले. **गोपाळरावांचा लो. टिळक** यांनीं वर्णिलेल्या कर्मयोगावर पूर्ण भरंवसा होता म्हणून ते संसारी बनले. पण जगाच्या हिताकडे पाहिलें तर त्यांच्या बंधूंनीं भगवीं वस्त्रें धारण करून जो संन्यास घेतला, त्यापेक्षां लग्न करून आपल्या अप्पलपोटेपणाचा संन्यास करून आपले **गोपाळराव** यांनीं निरपेक्ष बुद्धीनें जो संसार केला तोच खरा स्वार्थसंन्यास म्हणजे उत्तम प्रतीचा संन्यास होय. याचमुळें वर जो आम्हीं प्रश्न केला आहे कीं, हा गोपाळरावांचा संसार का संन्यास त्याचें उत्तर हा त्यांचा उत्तम संसार व म्हणूनच **उत्तम संन्यास**. असो, बाळांनों, हा विषय जरा कठीण आहे, यासाठीं हा आपण येथेंच सोडून देऊं. गोपाळरावांच्या संसाराविषयीं एक दोन गोष्टी सांगून नंतर आपण त्यांच्या सार्वजनिक कामगिरीकडे वळूं. गोपाळरावांना अत्यंत सुशील व संसारदक्ष बायको मिळाली, यामुळें त्यांना गृहसुख चांगलें मिळालें. त्यांना दोन मुलगेही झाले. ते दोन मलगे व गोपाळरावांची सुशील गृहिणी अकोला येथें रहातात. त्यांचे एक चिरंजीव अकोल्यास एका शाळेंत शिक्षकाचें पवित्र कार्य करीत आहेत व दुसरे चिरंजीव तेथें एका गिरणींत एंजिनी-अर आहेत. यशोदाबाई तेथेंच चिरंजीवांजवळ रहातात.

जनसेवा.

लो. टिळक व प्रि. **आगरकर** हे डेक्कन कॉलेजांत वर्गबंधु होते. दोघांनींही मिल्ल व स्पेन्सर यांचे ग्रंथ मनापासून वाचले. दोघांनाही त्यांतील तत्त्वें अतिशय आवडलीं. त्या ग्रंथांपासून लोककल्याण कर-ण्याची बुद्धि व स्वातंत्र्यप्रेम दोघांच्याही मनांत ठसलें. म्हणून दोघांनीं हातांत हात घालून असा निश्चय केला कीं, सरकारी नोकरींत हजारों रुपये मिळविण्यासाठीं शिरावयाचें नाहीं, जाणून बुजून गरीबी पत-करावयाची व जिवांत जीव आहे तोंपर्यंत स्वतंत्रतेनें लोककल्याण व जन-सेवा करावयाची असा हा पवित्र निश्चय या दोन थोर नररत्नांनीं केला व तो मरेपर्यंत निष्ठापूर्वक पाळला. या त्यांच्या एकनिष्ठ सेवेनेंच ते या आपल्या

महाराष्ट्राचे पंचप्राण बनले आहेत. आणि खरोखर पाहिलें तर ईश्वर-भक्ति म्हणजे दुसरी तिसरी कांहीं नाहीं. निष्काम बुद्धीनें लोकहित किंवा जनसेवा करणें हीच ईश्वराची उत्तम भक्ति होय.

या दोन वीरांचा इकडे हा पवित्र स्वार्थत्यागपूर्ण निश्चय होत असतां तिकडे कै. **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांनीं सरकारी नोकरीचा राजीनामा दिला व स्वतंत्रतेनें शाळा काढून व इतर धंदे करून अब्रूनें उदरनिर्वाह करतां येतो व देशसेवाही करतां येते हें तरुण सुशिक्षित मंडळीस आपल्या उदाहरणानें दाखविण्याचा त्यांनीं निश्चय केला.

शास्त्रीबोवा एक इंग्रजी शाळा काढण्याच्या विचारांत आहेत, ही बातमी **आगरकर** व **टिळक** यांना कळतांच त्यांनीं आपण होऊन या शाळेस आम्ही येऊन मिळतों, असें शास्त्रीबोवांना कळविलें. मग शास्त्रीबोवा, आगरकर, टिळक व आणखी दुसरे त्यांचे स्नेही यांनीं सॅन १८८० चे जानेवारीचे पहिलीपासून '**न्यू इंग्लिश स्कूल**' स्थापन केलें. तें एकदम भरभराटीस चढलें, व त्याची कीर्ति सर्वत्र पसरली. नंतर शास्त्रीबोवांनीं **केसरी** व **मराठा** हीं दोन वर्तमानपत्रें सन १८८१ च्या जानेवारीपासून सुरू केलीं. '**केसरी**' चे संपादक आगर-कर झाले व '**मराठा**' पत्राचे संपादक **टिळक** झाले. 'आरंभीं संकटें येऊन कार्यकर्त्या माणसांची परीक्षा पाहण्यांत येते' असें म्हणतात तें खरें. कारण '**न्यू इंग्लिश स्कूल**', '**केसरी**' पत्र व '**मराठा**' पत्र हीं सुरू होऊन कोठें एकदोन वर्षें होतात इतक्यांत १८८२ च्या मार्च महिन्यांत सर्वांचे आधारस्तंभ असे **विष्णुशास्त्री** मरण पावले व कोल्हा-पूरच्या कारभाऱ्यांनीं 'केसरी' व 'मराठा' या पत्रांवर केलेल्या बे-अब्रूच्या खटल्यांत **आगरकर** व **टिळक** यांना शिक्षा झाली. व त्यांना डोंगरीवरील तुरुंगांत १०१ दिवस तुरुंगवास भोगावा लागला. हीं जरी दोन भयंकर संकटें आलीं तरी त्यांतून या तीनही संस्था उत्तम प्रकारें निभावून निघाल्या. याचें कारण **आगरकर** व **टिळक** यांवरील त्यांच्या मित्रांचें प्रेम व त्यामुळें त्यांनीं केलेली मदत.

तुरुंगांतून सुटून आल्यावर **आगरकर, टिळक, वामनराव आपटे, नामजोशी** वगैरे मंडळींनीं फर्ग्युसन कॉलेज काढलें; आणि न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्यूसन कॉलेज उत्तम तऱ्हेनें चालविण्यासाठीं **डेक्कन एज्युकेशन सोसायटी** नांवाच्या मंडळीची स्थापना केली. अशा प्रकारें झपाट्यानें सर्व कामें या मंडळीनीं उत्तम प्रकारें चालू ठेवलीं. कै० **वामनराव आपटे** फर्ग्युसन कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल झाले. त्यांनीं आपल्या विद्वत्तेनें व शिस्तीनें कॉलेज व शाळा भरभराटीला आणली. **आगरकरांनीं** व **टिळकांनीं** वरील दोन पत्रें लोकप्रिय व वजनदार बनविलीं.

असें सर्व ठीक चाललें असतां कांहीं सामाजिक प्रश्नांवर **आगरकर** व **टिळक** यांचा मतभेद झाला. **आगरकरांना** वाटे उत्तम गोष्ट आपण स्वतः आपल्या वर्तनांत उतरवावी व उच्च ठिकाणीं उभें राहून लोकांना उपदेश करून त्या उत्तम स्थितीकडे येण्यास सांगावें. प्रथम आपण करतों ती गोष्ट लोकांना आवडणार नाहीं, पण कांहीं काळानें लोक आपल्या मताला येऊन मिळतील. **टिळकांना** वाटे एकादी गोष्ट उत्तम आहे असें जरी आपलें मत असलें तरी लोकांना ती गोष्ट पसंत नसेल तर लोकांना टाकून आपण एकटेच शिखरावर जाऊन बसूं नये. तर आपली उत्तम गोष्ट पुनः पुनः लोकांना सांगून, आपणांविषयीं त्यांच्यांत प्रेम उत्पन्न करून आपल्या मताप्रमाणें त्यांना हळूहळू वाटावयाला लावून त्यांना घेऊनच आपण पुढें जावें. मग यामुळें आपणांला अगदीं मंद गतीनें जावें लागलें तरी हरकत नाहीं. या दोनही थोर पुरुषांचा हेतु एकच. तो हा कीं, लोकांना पुढें पुढें उन्नतीच्या मार्गानें न्यावयाचें. पण दोघांच्या पद्धति भिन्न. यामुळें या दोघांना एकत्र काम करणें अशक्य झालें. यामुळें **आगरकरांनीं** 'केसरी' पत्राचा संबंध सोडून दिला व सन १८८८ पासून आपलीं मतें पसरविण्यासाठीं **सुधारक** पत्र काढलें व तें मरेपर्यंत उत्तम तऱ्हेनें चालविलें.

आगरकरांनीं उचललेल्या पद्धतीमुळें ते अत्यंत देशहितबुद्धीनें रात्रंदिवस काम करीत होते. तरी त्यांचेविषयीं लोकांत गैरसमज उत्पन्न झाले. यामुळें त्यांना लोकप्रीतीला कांहीं काळ मुकावें लागलें, तरी त्यांची स्वार्थत्यागपूर्वक केलेली देशसेवा, त्यांना वाटत असलेली देशाबद्दलची कळकळ व त्यांची सुधारकांतील सुंदर व तेजस्वी भाषा या तीन गोष्टींनीं त्यांना पुनः लोकप्रिय केलें.

आगरकरांनीं सुधारक पत्र काढलें त्यांत लोकांना कोणत्या गोष्टीबद्दल उपदेश केला होता हें जाणण्याची बाळांनों, तुम्हांला सहजच इच्छा होईल, म्हणून त्यांतील मुख्य मुख्य गोष्टी कोणत्या होत्या हें आतां तुम्हांला सांगतों, त्या ह्याः—

१ **सुधारक** पत्राचा बाणा ‘ इष्ट असेल तें बोलणार व शक्य असेल तें करणार ’ असा होता.

२ नशिबावर हवाला ठेवणें हें वाईट, उद्योगावर विश्वास ठेवून सतत उद्योग करीत रहावें, हें चांगलें.

३ संन्यासी होण्यापेक्षां परोपकारी सद्गृहस्थ होणें अधिक चांगलें.

४ मनुष्य ज्या जातींत जन्मला असेल त्या जातीवरून त्याची योग्यता ठरवूं नये. त्यानें जीं कृत्यें केलीं असतील त्यांवरून त्याची योग्यता ठरवावी. उदाहरणार्थ, तुकाराम वाणी होता म्हणून त्याला कमी मानूं नये तर त्याला ब्राम्हणाप्रमाणें पूज्य मानावें; व कलुषा ब्राह्मण असला तरी त्याच्या वाईट कृतीमुळें त्याला अत्यंत नीच मानावें.

५ हिंदुधर्मांतील वाईट चाली नाहींशा कराव्या.

६ वाईट चाली बंद करण्यासाठीं कायदे करून घेण्यास हरकत नाहीं.

७ पुरुष व स्त्री यांची योग्यता सारखी मानावी.

८ मुली व मुलगे मोठे झाल्यावर त्यांचीं लग्नें करावीं.

९ पुरुष व स्त्री या दोघांनाही धंदेशिक्षण द्यावें. दोघांनाही उच्च शिक्षण द्यावें.

१० शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणाचा प्रसार करावा.

हीं आणि अशींच नवीन मतें लोकांनां शिकविण्याचा प्रयत्न प्रि. **आगरकरांनीं** आपल्या **सुधारक** पत्रांतून केला व त्यावेळीं जरी हीं मत लोकांना सर्वस्वी पटलीं नाहींत तरी त्यांपैकीं बरींच मतें आतां लोकांना मान्य झालीं आहेत व त्याप्रमाणें लोक वागूंही लागले आहेत.

प्रि. **गोपाळराव** यांना कॉलजचें व सुधारक पत्राचें मिळून फारच काम पडत असे. त्यांना विद्यार्थिदशेंतच दम्याची व्यथा जडली होती. यामुळें त्यांची प्रकृति अशक्त झाली होती. त्यांत प्रि. **आपटे** व प्रो. **वासुदेवराव केळकर** यांच्या अकालीं मृत्यूनें त्यांना मोठाच धक्का बसला व आतां प्रि. आपट्यांच्या मागून ते प्रिन्सिपाल झाल्यामुळें त्यांच्यावर कामाचा बोजा अतोनात पडला. यामुळें त्यांची प्रकृति अधिकच खालावली.

सन १८९५ च्या मार्च महिन्यांत **गोपाळराव** फर्ग्युसन कॉलेजाचे कंपौंडांत प्रिन्सिपालसाठीं बांधलेल्या बंगल्यांत रहावयास गेले. १८९५ सालीं त्यांची प्रकृति अधिकाधिक बिघडतच गेली. शेवटीं ता. १६ जून १८९५ या दिवशीं त्यांना अतिशय वेदना झाल्या. त्या रात्रीं त्यांना मुळींच झोंप आली नाहीं. ता. १७ जूनच्या पहाटेस 'मला आतां जरा बरें वाटतें, मी निजतों व तुम्हीही निजा,' असें म्हणून ते जे निजले ते पुनः उठले नाहींत. अशा तऱ्हेनें या आद्वितीय सत्यप्रिय स्वार्थत्यागी लोककल्याणकर्त्याचा अंत झाला. प्रि. गोपाळराव आगरकर यांच्या मृत्यूची बातमी हां हां म्हणतां सर्व पुणें शहरभर पसरली. खरा देशसेवक, सत्यवादी, स्पष्टवक्ता, सुशील समाजसुधारक, गरिबींत जन्मून गरिबींत सर्व आयुष्य देशासाठीं खर्च करून गरिबींत मरण पावला असें म्हणत व त्यांचे अनेक गुण आठवीत हजारों लोक त्यांच्या प्रेतयात्रेंत सामील झाले. लो. **टिळकांच्या** दुःखास तर पारावार उरला नाहीं. आपला सख्खा प्रेमळ वडील बंधु मरण पावला असें त्यांना वाटलें. असें म्हणतात कीं, प्रि. आगरकरांचा मृत्युलेख ' **केसरी** ' पत्रासाठीं लिहीत

असतां मधून मधून दुःखावेगानें त्यांचा कंठ भरून येई व त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालत. केसरींतील तो मृत्युलेख अंतःकरणाच्या कळवळ्यानें व अंतःकरण उचंबळत असतांना लिहिला असल्यामुळें सर्व मृत्युलेखांत तोच उत्तम वठला आहे. अजूनही इतक्या वर्षांनीं कोणी तो वाचला तरी वाचकांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्याशिवाय रहाणार नाहींत. धन्य ते आगरकर ! व धन्य ते टिळक ! बाळांनों, मित्र असावे तर असे असावे. प्रि. आगरकरांची मृत्यूची बातमी सर्व देशभर पसरली व बहुतेक सर्व वर्तमानपत्रांनीं काळ्या रेघांनीं वर्तमानपत्रें छापून दुःखानें व प्रेमानें आगरकरांच्या निरनिराळ्या गुणांचें वर्णन केलें. सर्व पत्रांनीं असा स्वार्थत्यागी कर्मवीर आजपर्यंत झाला नाहीं असे उद्गार काढले.

प्रि. आगरकरांचा स्वभाव.

प्रि. आगरकरांचा स्वभाव सरळ व मोकळा असे. एक आंत व एक बाहेर असें त्यांचें कधींही नस. जीं मतें ते प्रतिपादीत तीं ते आपल्या आचरणांतही आणीत असत. त्यांना दांभिकपणाची फार चीड असे. दांभिक माणसावर ते जोराचे तडाके उडवीत असत. एरवीं त्यांचा स्वभाव मोठा विनोदी व थट्टेखोर असे. मंडळींत आगरकर असले म्हणजे हास्यरसाला कधींही कमताई नसावयाची. इतकी दम्याची व्यथा जडली होती तरी ते नेहमीं आनंदी असत. ते कोणाचाही द्वेष करीत नसत. लो. टिळक व प्रि. आगरकर यांचे वर्तमानपत्रांत पुष्कळ वेळां दोन हात होत असत. परंतु यामुळें त्यांच्या कॉलेजमधल्या जडलेल्या मैत्रीमध्यें व प्रेमामध्यें मुळींच अंतर पडलें नाहीं. टिळक व आगरकर यांना मालाकार हे माझे बाळगोपाळ आहेत असें प्रेमानें म्हणत असत. अशा बंधूप्रमाणें वागणाऱ्या बाळगोपाळांचें प्रेम अखेरपर्यंत अगदीं अकृत्रिम होतें. प्रि. आगरकर हे मोठे बाणेदार होते. त्यांच्या बाणेदारपणाचें व तेजस्वितेचें उदाहरण मागें दिलेंच आहे. गोपाळरावजी

हे मोठे दृढनिश्चयी व करारी असत. एकदां अमुक एक गोष्ट करावयाची असा त्यांनीं निश्चय केला म्हणजे तो तडीस नेल्याशिवाय ते कधींही रहात नसत. मग कितीही विघ्नें आलीं तरी त्यांस ते जुमानीत नसत.

त्यांची शिक्षणपद्धति.

प्रि. आगरकर हे अतिशय उत्तम शिक्षक होते. याचें मुख्य कारण शिकवीतं असतांना शिकविण्याच्या विषयांत त्यांचें मन अगदीं तल्लीन होऊन जात असे. शिवाय जो विषय शिकवावयाचा त्या विषयावरील सर्व टीका व ग्रंथ आधीं वाचून त्या विषयाची ते आगाऊ उत्तम तयारी करीत असत. त्यांची शिकविण्याची पद्धत विद्यार्थ्यांना फार आवडत असे, याचें तिसरें कारण विषय कितीही कठीण व रुक्ष असला तरी तो मनोरंजक व सुबोध कसा करावा हें त्यांना फार चांगलें साधलें होतें. या तीन गोष्टींमुळें प्रि. आगकरांचा तास केव्हां येईल असें विद्यार्थ्यांना होत असे.

लेखननैपुण्य.

प्रि. आगरकरांची मराठी भाषा ही अगदीं निराळ्याच वळणाची होती. तिच्यामध्यें कायदेशीर कडकपणा बिलकूल सांपडत नसे. त्यांची भाषा संस्कृत भाषेप्रमाणें सुंदर व गोंडस असे. सुंदरतेबरोबर त्यांच्य भाषेमध्यें स्पष्टवक्तेपणा व तेजस्विताही झळकत असे. ज्याप्रमाणें मराठी लिहिण्यांत त्यांचा हातखंडा होता तसाच इंग्रजी लिहिण्यांतही होता. भाषांतर ते इतकें बेमालूम व सुंदर करीत कीं, हें स्वतंत्रतेनें मराठींत लिहिलें आहे कां हें इंग्रजीचें भाषांतर आहे हें अतिशय हुषार माणसाला देखील ओळखतां येत नसे. त्यांची भाषांतर करण्याची हातोटी पहावयाची असल्यास त्यांनीं केलेलें हॅम्लेट नाटकाचें भाषांतर वाचावें. हॅम्लेट नाटकाचें **‘ विकारविलसित ’** नांवाचें भाषांतर अतिशय लोकप्रिय झालेलें आहे. या पुस्तकाशिवाय **‘ आमचे डोंगरांवरील १०१ दिवस ’** या नांवाचें आपल्या तुरुंगवासाचें त्यांनीं एक पुस्तक लिहिलें

आहे तेंही फार वाचनीय झालें आहे. त्यावरून कोणत्याही संकटप्रसंगीं त्यांची कशी शांत वृत्ति रहात असे हें दिसून येतें. याशिवाय '**वाक्य-मीमांसा**' या नांवाचें मराठी व्याकरणावर त्यांनीं एक पुस्तक लिहिलें आहे, तेंही उत्कृष्ट साधलें आहे. याशिवाय **सुधारकांतील** व **केसरींतील** त्यांचे लेख अत्यंत वाचनीय होते. सुदैवानें त्या लेखांतील उत्तम लेखांच्या संग्रहाचे तीन भाग पुस्तकरूपानें छापले आहेत. यामुळें ते आपणांला वाटेल तेव्हां वाचावयाला सांपडतील.

प्रिन्सिपाल आगरकरांची राहणी.

गोपाळरावजी जसे मनानें साधे होते तसे पोषाखानें देखील अगदीं साधे होते. त्यांचें चरित्र व लेख वाचल्यावर हे मोठे सुधारक तेव्हां हे नेकटाय, कॉलर, बूट, पाटलोण वगैरेनीं अगदीं नटलेले असतील असा प्रथम समज होतो. पण त्यांचा फोटो पाहिला म्हणजे तो ताबडतोब दूर होतो. **प्रि. आगरकर** हे खरे कळकळीचे सुधारक होते, पोषाखी सुधारक नव्हते. ते नेहमीं स्वदेशी कपडा वापरीत असत. झकपक परदेशी कपड्यांपेक्षां मिळेल तसा जाडा भरडा स्वदेशी कपडा त्यांना अधिक प्रिय असे.

त्यांची राहणी संताला शोभेल अशी अगदीं साधी असे. त्यांनीं देशहित ही एकच गोष्ट आपल्या डोळ्यांसमोर ठेवली होती. ते पुष्कळ पैसा मिळविण्याचे फंदांत कधींच पडले नाहींत. जे कांहीं थोडे पैसे मिळत त्यांत अगदीं काटकसरीनें व ठाकठिकीनें ते रहात असत. ते कधीं कोणाचें कांहींही उसनें घेत नसत व कर्ज कधींही काढीत नसत. देशहित साधण्यासाठीं प्रसंगीं कडक व कडू बोलण्याचा प्रसंग आला तरी तसें बोलण्याला ते कचरत नसत. मग त्यामुळें लोकांची अप्रीति पतकरावी लागली तरी तिला ते तयार असत. अशा तऱ्हेची तुकोबारायांना शोभेल अशी त्यांची साधुवृत्ति असे. बाळांनो, असेच तुम्ही सुशील, शांत, व स्वार्थत्यागी देशभक्त व्हा.

लो० बाळ गंगाधर टिळक.

बाळांनों, आतांपर्यंत मी तुम्हांला **न्या. रानडे**, मालाकार **चिपळूणकर** व **प्रि. गोपाळ गणेश आगरकर** यांचीं चरित्रें सांगितलीं. आतां **प्रि. आगरकरांचे** जिवलग मित्र व **आगरकरां**बरोबर ज्यांनीं डेक्कन कॉलेजमध्येंच असतांना सर्व आयुष्य देशसेवेंत खर्च करण्याचा निश्चय केला व तो निश्चय शेवटपर्यंत कायम ठेवला अशा **लोकमान्य टिळकांचें** चरित्र सांगणार आहें.

जन्म व बाळपण.

टिळकघराण्याचें मूळ गांव चिखली या नांवाचें आहे. चिखली हें गांव रत्नागिरी जिल्ह्यांत दापोली नांवाच्या तालुक्यांत आहे. **टिळक**-घराण्याकडे चिखलीची खोती आहे. अशी जरी स्थिति आहे तरी **टिळकां**च्या पूर्वजांचा ओढा शेतीपेक्षां शिक्षणाकडेच पहिल्यापासून अधिक होता. **लो. टिळकांचें** घराणें चित्पावन ब्राह्मणांपैकीं आहे. **टिळक** हे ऋग्वेदी असून आश्वलायन शाखेचे आहेत. या **टिळक**-घराण्यांत **रामचंद्रपंत अप्पा** नांवाचे एक सुशील कर्मनिष्ठ गृहस्थ होऊन गेले. बाळांनों, हेच आपल्या चरित्र नायकांचे आजोबा. मागें तुम्हांला **विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें** चरित्र सांगितलें त्यावेळीं एक गोष्ट सांगितली होती. ती ही कीं, ज्या मुलाला आजोबा असतात त्याची मोठी गंमत होते. म्हणजे त्याला बापाच्या कडक अमलांत रहावें लागत नाहीं. त्याचे लाड आजोबा वाटेल तितके पुरवितात.

ज्याप्रमाणें **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांचे आजोबा **हरिपंत** मामा हे **विष्णुशास्त्री** यांचें फार प्रेमानें पालन करीत असत, त्याप्रमाणेंच

आपले चरित्रनायक **बळवंतराव** यांचेही लाड त्यांचे आजोबा **रामचंद्र-पंत** हे करीत असत.

आपल्या जन्माचे वेळीं व लहानपणीं आजोबा जिवंत असणें हीं फारच भाग्याची गोष्ट आहे. आजोबा नसले तर निदान आजी तरी जिवंत असावी. असो. आपले **लोकमान्य बाळ** फारच नशीबवान, कारण त्यांचा जन्म झाला तेव्हां त्यांचे आजोबा जिवंत होते. शिवाय हें बाळ नवानवस्यानें झालेलें, मग काय विचारतां !

लोकमान्य बळवंतराव यांचे वडिलांचें नाव **गंगाधरपंत** असें होतें. **गंगाधरपंत** यांना पहिल्या प्रथम मुलगीच झाली व या मुलीच्या पाठीवर दोन मुलीच झाल्या, तेव्हां **गंगाधरपंतांच्या** पत्नीला अजूनहीं आपल्याला पुत्र होत नाहीं म्हणून फार वाईट वाटलें. ती फार भाविक व देवभोळी होती. तेव्हां पुत्र व्हावा म्हणून तिनें सूर्यदेवाची अनन्य-भावानें व मोठ्या भक्तीनें वर्ष दीडवर्ष एकसारखी आराधना केली. तेव्हां सूर्यदेव त्या साध्वीच्या व्रतानें व भक्तीनें प्रसन्न झाला व त्यानें तिची इच्छा पूर्ण केली. अशा रीतीनें सूर्यदेवाच्या कृपेनें **गंगाधरपंत** यांना शके १७७८ आषाढ वद्य षष्ठीस म्हणजे सन १८५६ च्या जुलै महिन्याचे २३ वे तारखेस बरोबर सूर्योदयाचे वेळीं रत्नागिरी येथें पुत्ररत्न झालें. तें पुत्ररत्न म्हणजेच आपले चरित्रनायक **बळवंतरावजी**. **बळवंतरावांच्या** चरित्रांत सर्वच विलक्षण आहे. त्याप्रमाणें त्यांच्या नांवाचीही विलक्षण तऱ्हा आहे. वास्तविक **बळवंतरावांचें** मूळचें नांव कांहीं बाळ हें नाहीं. त्यांचें मूळचें खरें नांव **वासुदेव** असें होतें. तर मग बाळांनों, तुह्मी सहजच विचाराल कीं, ‘कायहो जर त्यांचें नांव **वासु-देव** होतें तर त्या **वासुदेव** नांवाला मागें टाकून **लोकमान्य बाळ** कसे झाले ? ’ त्याचें उत्तर असें. आपले **लोकमान्य** पहिलेवहिले मुलगे. बाळांनों, तुह्मांला माहीतच आहे कीं, पहिला मुलगा घरांतील सर्व मंड-ळींचा व विशेषतः आईचा अतिशय लाडका असावयाचा व पहिल्या मुलाला ‘बाळ’ या प्रेमळ नांवानें आई हांक मारावयाची, व मग घरांतील

सर्व मंडळीही त्यांला **बाळच** म्हणावयाची. तसाच येथें प्रकार झाला. आपल्या चरित्रनायकाची आई त्यांना '**बाळ**' म्हणूं लागली, यामुळें साहजिकच घरांतील सर्व मंडळी यांना **बाळ, बाळ** असेंच म्हणूं लागली.

पण बाळांनों, तुह्मी म्हणाल, 'असें जरीं असलें तरी शाळेंत नांव घालतांना असलें **बाळ** हें टोपणनांव कांहीं कोणी शाळेंत दाखल करीत नाहींत. जें पाळण्यांतलें नांव असेल तेंच नांव शाळेंत चालू होतें व तेंच मग कागदोपत्रीं चालू होतें.' बाळांनों, हें सर्व खरें,पण तसें येथें झालें नाहीं. याचें कारण आपले चरित्रनायक म्हणाले, 'माझ्या आईनें प्रेमानें जें माझें नांव ठेविलें तेंच शास्त्रांतील नांवापेक्षां मला अधिक प्रिय आहे व तेंच मी नेहमीं चालू ठेवणार.' तेव्हां आईवरील प्रेमामुळें व भक्तीमुळें आपल्या चरित्रनायकांनीं **वासुदेव** हें नांव टाकून दिलें व आईनें प्रेमानें ठेवलेलें **बाळ** हेंच नांव चालू ठेवलें. आणि एकाअर्थीं तेंही योग्यच झालें. कारण प्रेमाच्या माणसाला **बाळ** असें म्हणतात. आपले चरित्रनायकांवर सर्व देशाचें अत्यंत प्रेम तेव्हां सर्व देशानें त्यांना माझा बाळ असें प्रेमानें म्हणावें हें योग्यच आहे. असो. इतका खुलासा पुरे झाला.

बळवंतरावजींचा जन्म झाला तेव्हां त्यांचे वडील **गंगाधरपंत** हे रत्नागिरी येथें शाळाखात्यांत असिस्टंट डेप्युटी होते. **गंगाधरपंतांचे** विशेष आवडीचे विषय गणित व संस्कृत हे होते. त्यांनीं व्याकरणावरही एक पुस्तक लिहिलें आहे.

बळवंतरावजींचें बाळपण रत्नागिरीसच गेलें.**बळवंतरावजी** हे अगदीं लहानपणापासून करारी व सरळ स्वभावाचे होते. एक गोष्ट अमक्यानें केली तर ती आपल्यालाही करण्याचा हक्क आहे असें त्यांना अगदीं लहानपणापासून वाटत होतें. याविषयीं एक गमतीची गोष्ट बाळांनों, मी तुह्मला सांगतों. **बळवंतराव** नुकतेच कोठें चार वर्षांचे झाले होते. तो श्रावण महिना होता. त्या दिवशीं **गंगाधरपंतांकडे** श्रावणी होती. श्रावणी चालू असतां **बळवंतरावांचे** आजोबा यांनीं या

बळवंतरावांना, लाडानें मांडीवर घेतलें व आपण गळ्यांत नवीन जानवें घातलें. तेव्हां मजेनें या चार वर्षांच्या **बळवंतरावांच्याही** गळ्यांत त्यांनीं एक जानवें दिलें अडकवून. तें पाहून **बळवंतरावांना** फार आनंद झाला. नंतर जेवणाची वेळ झाली. **गंगाधरपंत** व **बळवंतरावांचे** आजोबा **रामचंद्रपंत** सोंवळें नेसले. **रामचंद्रपंताचे** जवळ **बळवंतराव** जेवावयाला बसावयाचे. तेव्हां **रामचंद्रपंत** म्हणाले, 'बाळ तें गळ्यांतलें जानवें काढून ठेव, तें ओवळें आहे' तेव्हां **बळवंतराव** म्हणाले, 'तुह्मीं व बाबांनीं बरें जानवें गळ्यांत ठेवलें आहे ? तेव्हां मीही ठेवणार.' आतां या लहान बाळाला सांगितलें तरी काय समजणार कीं त्याचें जानवें मंतरलेलें नसल्यामुळें व त्याची मुंज झाली नसल्यामुळें तें ओवळें व तें काढलें पाहिजें हें ? ' असो. **बळवंतराव** हट्ट धरून बसले कीं 'मी कांहीं जानवें काढणार नाहीं.' आजोबांनीं पुष्कळ सांगून पाहिलें, पण **बळवंतराव** आपला हट्ट सोडीनात. पण जेव्हां **गंगाधरपंत** खूप रागावले तेव्हां स्वारीनें जानवें एकदांचें काढलें.

अशीच पुनः एकदां गम्मत झाली. आपल्या या चरित्रनायक बाळास रत्नागिरी येथें त्यांचे वडील **गंगाधरपंत** यांनीं मराठी शाळेंत घातलें. एके दिवशीं यानें कांहीं एक क्षुल्लक अपराध केला असें वाटून याच्या शिक्षकानें ' छडी घेण्यास हात पुढें कर ' असा त्याला हुकूम केला. ' मीं कांहीं अपराध केला नाहीं तेव्हां मी कांहीं छडी घेणार नाहीं असा बाळानें रोखठोक जबाब दिला. त्यावर ' छडी घेत नाहींस तर वर्गांतून चालता हो. असा शिक्षकानें दुसरा हुकूम केला. त्याबरोबर स्वारीनें आपल्या पुस्तकांचें दप्तर उचललें व वर्गांतून निघून घरीं आला. घरीं गेल्यावर बाळानें सर्व हकीगत वडिलांना सांगितली. ती ऐकून 'आपला अपराध नसला तरी शिक्षकांची आज्ञा पाळावी ' असें वडिलांनीं त्याला पुष्कळ सांगून पाहिलें. शेवटीं मुलाचा सत्याग्रही स्वभाव ठाऊक असल्यामुळें वडिलांनीं त्याला दुसऱ्या शाळेंत घातलें. असो. आपला चरित्रनायक बाळ दहा वर्षांचा झाल्यावर पुण्यास आला.

आपल्या वयाच्या दहाव्या वर्षी **बाळानें** रत्नागिरी सोडली. तिला पुनः कधींही भेट देण्याचा प्रसंग त्याला आला नाहीं. आपला चरित्रनायक **बाळ** दहाव्या वर्षापासून जो पुणेकर बनला तो अखेरपर्यंत. आणि तसें त्याचें पुण्यावर प्रेमही विलक्षण होतें. ज्याप्रमाणें **न्या. रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रि. आगरकर व ना. गोखले** कोठेंही असले तरी त्यांचें प्रेम त्यांचें मन पुण्याकडे, त्यांना अत्यंत अभिमान पुण्याचा, त्याचप्रमाणें **बाळाचेंही** अखेरपर्यंत पुण्यावर अतोनात प्रेम होतें, आणि म्हणूनच योगायोगानें त्याला जरी मुंबईस मरण आलें तरी देखील मरणानंतरही आपल्या जबरदस्त इच्छाशक्तीनें अनुयायांना प्रेरित करून त्यांचेकडून त्यानें स्पेशल गाडीनें आपल्या अस्थि लगेच पुण्यास आणविल्या. असो.

बळवंतरावांचे वडील **गंगाधरपंत** यांचे गणित व संस्कृत हे विषय फार आवडीचे होते, हें वर सांगितलेंच आहे. ते त्यांनीं आपल्या **बाळास** उत्तम तऱ्हेनें शिकविले. यामुळें हे विषय **बाळाचे** अतिशय आवडीचे झाले, व त्यांत तो अगदीं पटाईत झाला.

पुण्यास आल्यावर **बाळ** हायस्कुलांत जाऊं लागला व वयाला सोळा वर्षें पुरीं होतांच मॅट्रिकची परीक्षा पास झाला. नंतर वडिलांच्या आज्ञेप्रमाणें तो डेक्कन कॉलेजमध्यें पुढील शिक्षणासाठीं गेला. **बाळ** आतां कॉलेजमध्यें गेला, मोठा झाला तेव्हां आतां आपण त्याला **बळवंतराव** म्हटलें पाहिजे.

बळवंतरावांचे वडील **गंगाधरपंत** हे मोठे विचारी व धोरणी होते. मुलें कॉलेजमध्यें जातात. उरावर जाडीं जाडीं पुस्तकें घेतात. रात्रंदिवस पुस्तकांत डोकें खुपसून बसतात व शेवटीं काडीपैलवान होऊन तरुणपणांतच म्हातारे होतात व मरतात हें त्यांना माहीत होतें. म्हणून कॉलेजमध्यें जातांनाच त्यांनीं आपल्या **बळवंतरावांना** बजावून सांगितलें कीं 'बाळ, जसा अभ्यास करणें व ज्ञान मिळविणें हा विद्यार्थ्यांचा

धर्म आहे तसा किंवा त्यापेक्षां अधिक पवित्र व महत्वाचा धर्म व कर्तव्यकर्म व्यायामकरणें, पोहणें, निरनिराळे खेळ खेळणें, तालीम करणें व शरीर कमावणें हा आहे. यासाठीं रोज तालिम करीत जा व निरनिराळे शरीर पिळदार बनवणारे खेळही खेळत जा.' हा वडिलांचा उपदेश बळवंतरावांना पटला व त्या उपदेशाप्रमाणें बळवंतरावांनीं कॉलेजमध्यें आपला बराच वेळ पोहणें, इतर मर्दानी खेळ खेळणें व तालीम करणें, यांत खर्च केला व शरीर बळकट व कणखर बनविलें, ही गोष्ट फार चांगली झाली. शरीर पिळदार बनविल्यामुळें हल्लींच्या बऱ्याच बी. ए. प्रमाणें झुरुमुरु काडीपैलवान ग्रॅजुएट होऊन ते बाहेर पडले नाहींत. तर बी. ए. च्या परीक्षेंत फर्स्ट क्लासांत पास होऊन पिळदार सतेज शरीराचे जवानमर्द ग्रॅजुएट होऊन ते कॉलेजच्या बाहेर पडले. बी. ए. झाल्यावर त्यांनीं एलूएलू. बी. चा अभ्यास सुरू केला. ते कॉलेजमध्यें असतांनाच त्यांची व देशभक्त प्रसिद्ध सुधारक प्रि. आगरकर यांची मैत्री जडली. दोघेही थोर मनाचे होते. दोघांच्याही मनांत स्वदेशाबद्दल अतिशय प्रेम वागत होतें. व दोघांच्याही मनांत स्वतःला श्रीमंत बनविणारी सरकारी नोकरी न धरतां गरीबी पतकरून देशाची सेवा करण्याचें होतें. दोघेही मिल, स्पेन्सर या उदार साधु ग्रंथकारांचे भक्त होते. या साधु ग्रंथकारांच्या ग्रंथांनीं दोघांच्या मनांत स्वातंत्र्यप्रेम व जनसेवाप्रेम बिंबलें होतें. अशी ही जोडी बी. ए. ची परीक्षा पास झाल्यावर, पुढें काय करावें याबद्दल तासचे तास एकत्र विचार करीत बसत असे. इ. स. १८७९ सालीं याप्रमाणें ही बाळ-गोपाळांची जोडी कोणती देशसेवा करावी याचा विचार करीत असतां दुसरा एक थोर उदार देशभक्त सुखाची व श्रीमंत बनविणारी सरकारी नोकरी सोडून देण्याच्या बेतांत होता. त्याचें नांव विष्णुशास्त्री चिपळूणकर. बाळांनों, या थोर पुरुषाचें चरित्र मीं तुम्हांला नुकतेंच सांगितलें आहे तें तुमच्या लक्ष्यांत असेलच. तेव्हां इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं, या निबंधमालाकर्त्या विष्णुशास्त्र्यांनीं इ. स. १८७९

सालीं आपली सरकारी नोकरी सोडली व तेजस्वी देशभक्तीनें भरलेलें शिक्षण देण्यासाठीं एक नवीनच इंग्रजी शाळा पुण्यास काढण्याचें ठरविलें, ही गोष्ट आपल्या या **बाळगोपाळां**-च्या जोडीला समजली. लगेच या **बाळगोपाळांच्या** जोडीनें म्हणजे **बळवंतराव टिळक व गोपाळराव आगरकर** यांनीं 'आह्मी तुमच्या शाळेस येऊन मिळणार' असें **विष्णुशास्त्री** यांना पत्र पाठवून कळविलें. हीं **बाळगोपाळांची** जोडी आपल्याला येऊन मिळणार हें ऐकतांच **विष्णु-शास्त्र्यांना** फार आनंद झाला.अशाच दुसऱ्या तरुण पदवीधरांनीं **विष्णु-शास्त्री यांना** मिळण्याचें ठरविलें, व मग या सर्व उत्साही तरुण देश-भक्तांच्या मदतीनें **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांनी जानेवारी ता. २, सन १८८० या शुभ दिवशीं '**न्यू इंग्लिश स्कूल**' नांवाची इंग्रजी शाळा सुरू केली. ती शाळा लवकरच अतिशय भरभराटीस आली. यानंतर एक वर्षानें **बाळगोपाळांच्या** देखरेखीखालीं **आर्यभूषण छापखाना**, व **केसरी** व **मराठा** वर्तमानपत्रें सुरू झालीं. तींहि चांगलीं लोकप्रिय झालीं. केसरीचे प्रथम संपादक **आगरकर** झाले; व मराठा पत्राचे संपादक **टिळक** झाले. या पत्रांत कोल्हापूरचे कारभारी यांच्या संबंधीं कांहीं टीका आली. ती टीका आपली बेअब्रू करण्यासारखी आहे, असं त्या कारभाऱ्यांस वाटून त्यांनीं **बळवंतराव** व त्यांचे मित्र **गोपाळ-राव** यांचेवर अब्रूनुकसानीचा दावा मुंबईचे हायकोर्टांत लाविला. त्यांत या जोडीला दोषी ठरवून शिक्षा देण्यांत आली. यामुळें त्यांना १०१ दिवस तुरुंगवास भोगावा लागला. ते सुटून आल्यावर पुनः त्यांनीं आपलीं सर्व कामें जोरांत सुरू केलीं. मध्यंतरीं सन १८८२ च्या मार्च महिन्यांत **विष्णुशास्त्री** वारल्यामुळें या तरुण मंडळीस आपला मुख्य आधारच नाहींसा झाला असें वाटलें. तरी त्यांनीं हातीं घेतलेलें काम अधिक जोरानें सुरू ठेवलें. न्यू इंग्लिश स्कूल-च्या भरभराटीनें **बळवंतराव** व त्यांचे मित्र यांना उत्तेजन आलें व **बळवंतरावांची** इच्छा होती त्याप्रमाणें एकदांचें 'फर्ग्युसन कॉलेज'

सुरू करण्यांत आलें. मग सर्व व्यवस्था सुरळीत चालावी म्हणून या मंडळींनें आपली सोसायटी बनविली तिला **डेक्कन एज्युकेशन सोसायटी** असें नांव दिलं. तिच्यांत या मंडळीशिवाय आणखी दुसरी सन्माननीय मंडळी घेण्यात आली. असें सर्व नीट चाललें होतें.परंतु सन १८९० सालीं **बळवंतराव** व सोसायटींतील इतर सभासद यांच्यांत कांहीं बाबतींत मतभेद झाला। यामुळें या मंडळींतून **बळवंतरावांनीं** आपलें अंग काढून घेतलें. त्याचप्रमाणें सन १८८८ सालीं **बळवंतराव** व **गोपाळराव आगरकर** यांच्यांत मतभेद होऊन **गोपाळरावांनीं** केसरीशीं असलेला आपला संबंध तोडून टाकला. यानंतर **केसरी** व **मराठा** हीं पत्रें **बळवंतरावांच्या** एकट्याच्या मालकीचीं झालीं. त्यावेळीं त्या पत्रांवर ७००० रुपये कर्ज होतें. तें **बळवंतरावांनीं** नीट व्यवस्था ठेवून पुढें दहा वर्षांत फेडून टाकलें. एवढें मोठें कर्ज त्या वर्तमानपत्रांवर असतां हीं पत्रें **बळवंतरावांनीं** आपल्या ताब्यांत घेतलीं व एवढें जड ओझें आपल्या डोक्यावर आपण होऊन लादून घेतलें तें काय म्हणून' असें बाळांनों, तुह्मी सहज विचाराल। त्याचें खरें कारण हें कीं, वर्तमानपत्र हें लोकांना चांगले विचार शिकविण्याचें एक साधन आहे हें **बळवंतरावांना** पक्कें माहीत होतें. आपल्या देशबंधूंना आपले विचार कळवावे, त्यांच्या मनांत प्रबळ देशप्रेम उत्पन्न करावें, त्यांना देशसेवा करण्यास उत्सुक करावें, त्यांना जगांत काय चाललें आहे तें सांगून शहाणें करावें, त्यांना युरोपिअन लोकांनीं ज्या नवीन नवीन अचाट गोष्टी केलेल्या आहेत त्यांची माहिती द्यावी, इतर देश भराभर पुढें जात आहेत तसा आपला देशही पुढें गेला पाहिजे असें लोकांच्या मनांत ठसवावें, असें **बळवंतरावांना** फार वाटत असे. आणि म्हणूनच या कामीं **केसरी** व **मराठा** या वर्तमानपत्रांचा फार उपयोग होईल असें वाटून त्यांनीं ही जबाबदारीची कामगिरी आपल्या डोक्यावर घेतली. बाकी आपलें पोट भरावें व चैन चालावी या हेतूनें त्यांनीं हीं वर्तमानपत्रें आपले हातांत घेतलीं नाहींत व पहिल्या दहा वर्षांत तरी त्यांना या वर्तमानपत्रांपासून स्वतःच्या प्रपंचाला मुळींच मदत झाली

नाहीं. स्वतःच्या उदरनिर्वाहासाठीं त्यांनीं १८९० सालीं एक लॉक्लास चालू केला. या लॉक्लासांत कायद्याचा अभ्यास करणारे विद्यार्थी शिकत असत व वकीलीच्या परीक्षेला बसत असत. बळवंतरावांची शिकविण्याची पद्धत फारच चांगली होती. वरवर कसा तरी विषय शिकवावा व वेळ मारून न्यावी असें त्यांचें कधींच नव्हतें. कोणचाही विषय शिकवूं लागले म्हणजे त्या विषयांत ते अगदीं तल्लीन होऊन जात असत. खऱ्या शिक्षकाचें असेंच असतें. कधीं एकदां घंटा होईल व कधीं आपण चालते होऊं असें त्यांच मुळींच नसतें. उलट एवढ्यांत कशी घंटा झाली व एवढ्यांत कसा तास संपला याचेंच त्यांना आश्चर्य वाटे. बळवंतरावांच्या लॉक्लासाविषयीं एक मजेदार हकीगत ऐकली आहे ती येथें देतों. न्यायमूर्ति माधवराव गोविंद रानडे हे फार थोर पुरुष त्या वेळीं पुण्यास होते. टिळकांचा नवीनच लॉक्लास निघाला होता. नवीन सर्व संस्था पहाव्या, त्यांतील गुणांचें गौरव करावें, असा न्या. माधवरावांचा रिवाज असे. त्याप्रमाणें एके दिवशीं सकाळीं न्या. माधवराव अगदीं संथपणें बळवंतरावांच्या लॉक्लासांत आले व अगदीं मागच्या बांकावर बसले. बळवंतराव शिकविण्यांत तल्लीन झाले होते. व विद्यार्थी शिकण्यांत गुंग झाले होते. यामुळें एवढा थोर पुरुष आल्याचें कोणाच्याच लक्षांत आलें नाहीं. माधवरावजीही शांतपणें तास सरेपर्यंत बसले. तास सरल्यावर माधवरावांनीं टिळकांना कांहीं प्रश्न केले. टिळकांनीं त्या प्रश्नांचीं खुलासेवार व समाधानकारक उत्तरें दिलीं, त्यामुळें, माधवराव खूष झाले, व त्यांनीं टिळकांची पाठ थोपटली. बाळांनों, पुष्कळ लोकांना असें वाटे व अजूनही वाटतें कीं न्या. माधवराव व बळवंतराव टिळक यांचें वांकडें होतें, पण तें अगदीं खोटें आहे. बळवंतराव टिळकांविषयीं माधवरावांच्या मनांत फार प्रेम होतें व बळवंतरावांचे मनांतही माधवरावांविषयीं फार आदर वसत होता. नुकतांच बळवंतराव टिळकांच्या गुणांचे वर्णनपर, एक लेख न्या. डॉ. सर नारायणराव चंदावरकर यांनीं लिहिला आहे,त्यांत त्यांनीं असें

लिहिलें आहे कीं 'केसरीपत्र' व 'मराठा पत्र' काढण्यापूर्वी बळवंतराव टिळक व गोपाळराव आगरकर हे न्या. माधवराव रानडे यांचे घरीं गेले, त्यांना कसें करावें म्हणून नम्रपणानें विचारलें व न्या. रानडे यांनीं अतीशय प्रेमानें व कळकळीनें त्यांना उत्तेजन दिलें व बराच वेळ बसून चांगली सल्ला दिली. नंतर बळवंतराव व त्यांचे मित्र यांनीं केसरी व मराठा वर्तमानपत्रें सुरू केलीं. एकदां कांहीं काम न्या. माधवराव रानडे यांस भेटून करून घ्यावें म्हणून बळवंतराव मुद्दाम पुण्याहून मुंबईस न्यायमूर्ति यांच्या बंगल्यावर गेले. टिळकांस पहातांच न्यायमूर्तींना फार आनंद झाला व लगेच त्यांनीं त्यांचें काम केलें व मग चहाचे वेळीं म्हणाले 'नुसती चिठी पाठवून काम झालें असतें त्याला इतकी येण्याची दगदग कशाला घेतली ?' असो; तर बाळांनो सांगावयाची गोष्ट ही कीं थोर माणसांनीं एकमेकांवर जरी कितीही कडक टीका केली तरी त्यांचें एकमेकांवर अतीशय प्रेम असतें. न्या. माधवराव रानडे, डॉ. सर रामकृष्ण भांडारकर, बळवंतराव टिळक, गोपाळराव आगरकर व नामदार गोखले यांचें एकमेकांवर अतीशय प्रेम होतें व एकमेकांविषयीं त्यांच्या मनांत आदर वसत असे.

बळवंतरावांना वर्तमानपत्रांपासून मदत होत नसे म्हणून संसारखर्चासाठीं त्यानीं लॉक्लास काढला हें वर सांगितलेंच आहे. त्याशिवाय मोगलाईत लातूर येथेंपूसथें पिंजण्याची त्यांनीं एक गिरणी काढली होती; ती गिरणी फारशी फायदेशीर झाली नाहीं व पुढें पुण्यास प्लेग सुरू झाल्यामुळें लॉक्लास बंद झाला. नंतर घरप्रपंचाचा खर्च भागविण्याचें हीं वर्तमानपत्रें हेंच एक साधन झाल्यामुळें त्याकडे अधिक लक्ष्य देऊन त्याची सर्व व्यवस्था बळवंतरावांनीं आपल्या देखरेखीखालीं आपले भाचे रा. धोंडोपंत विद्वांस यांचे मार्फत सुरू केली. जसे बळवंतरावजी उत्तम पंडीत, उत्तम लेखक, उत्तम मुत्सद्दी व उत्तम पुढारी होते तसेच उत्तम तऱ्हेचे व्यवहारचतुरही होते. यामुळें आपले रहाते घरीं केसरी व मराठा या वर्तमानपत्रांची कचेरी आणून त्या पत्रांची त्यांनीं इतकी चोख

व्यवस्था ठेविली कीं, लवकरच त्या पत्रांवर असलेलें मोठें कर्ज त्यांनीं फेडून टाकलें. नंतर केसरी व मराठा हीं पत्रें अतीशय खपूं लागलीं. विशेषतः केसरीच्या हजारों प्रती एक दिवसांत काढणें या देशांतील साध्या यंत्रांना अशक्य झालें, म्हणून बळवंतरावांनीं अतिशय जबरदस्त सामर्थ्याचें असें एक नवीनच छापण्याचें यंत्र विलायतेहून आणलें. व तें एंजिनाच्या जोरावर चालविण्याची व्यवस्था केली. असें म्हणतात कीं, पुस्तकी पंडितांना यांत्रिक घिसाडी काम साधावयाचें नाहीं व यांत्रिक घिसाड्यांना पुस्तकी पांडित्य करतां यावयाचें नाहीं, पण हें म्हणणें बळवंतरावांना बिलकूल लागू नाहीं. जसे ते पुस्तकी पंडित होते तसे जरूर पडतांच ते उत्तम यांत्रिक घिसाडी बनले. स्वतःचें नवीन छापखान्याचें यंत्र आलें तेव्हां बळवंतराव त्याचे आलेले भाग येथें कसे जोडावे व तें यंत्र येथें कसें उभारावें हें पुस्तकावरून स्वतः शिकले व एवढें अजस्र यंत्र त्यांनीं स्वतः जोडून स्वतः उभारले व स्वतः चालू केलें. पुढें कधीं तें नादुरुस्त झाल्यास किंवा बंद पडल्यास ते स्वतः तें चालू करून देत असत असें सांगतात. बाळांनों, ह्यावरून तुह्मांला पुष्कळ शिकतां येण्यासारखें आहे. आपल्या इकडे विद्वान् पंडितांना घिसाडी काम करणें म्हणजे लाजिरवाणी गोष्ट वाटते व शिवाय कॉलेजमध्यें नुसतीं पुस्तकें घोकून व व्यायाम सोडून त्यांनीं आपलें शरीर दुबळें करून टाकलेलें असतें. यामुळें त्यांचा मेंदू सशक्त व शरीर दुबळें अशी स्थिति होते, त्यांना अन्न पचेनासें होतें. त्यांचें शरीर रोगाचें क्रीडामंदीर व डॉक्टरांची प्रयोगशाळा बनतें व लवकरच त्यांना तरुणपणांतच मरावें लागतें. अशीच स्थिति आपल्या इकडच्या घिसाड्यांची होते. बिचारा हातोडीबहाद्दर असतो, पण अक्षरशत्रु असल्यामुळें आपल्या यांत्रिक घिसाडी कामांत इतर देशांत कसकशा सुधारणा होत आहेत हें त्याला वाचायला सांपडत नाहीं. यामुळें आपल्या धंद्यांत विलायती सुधारणा आणून विलायतच्या हातोडीबहाद्दरांप्रमाणें त्याला गब्बर होतां येत नाहीं. मरमर मरावें व पोटास ओली कोरडी भाकर मिळवावी

अशी बिचाऱ्याची स्थिति होते. यामुळें शरीर पिळदार व निरोगी करण्यास बिचाऱ्याला पोटभर अन्न व विश्रांतिच मिळत नाहीं. शिवाय अज्ञानामुळें दारू वगैरे वाईट व्यसनें त्याला जडतात, यामुळें पुस्तकी पंडिताप्रमाणेंच हे हातोडीबहाद्दर तरुणपणींच मृत्यूचे दरबारांत जातात. बाळांनों, याला उपाय एकच; तो हा कीं, पुस्तकी पंडितांनीं आपला फावला वेळ घिसाडी कामागिरी मजेनें व हौसेनें करण्यांत घालवावा व हातोडीबहाद्दरांनीं आपला फावला वेळ विद्या शिकण्यांत घालवावा. म्हणजे दोघेही निरोगी, सशक्त व दीर्घायु होतील व हल्लींप्रमाणें परस्परांचा तिरस्कार करण्याऐवजीं परस्परांवर आदरपूर्वक प्रेम करतील. असें झालें म्हणजे हा आपला देश अतिशय सुखी व श्रीमंत होईल. यासाठीं बाळांनों सांगायची गोष्ट ही कीं, ज्याप्रमाणें विलायतेंतले ग्लॅडस्टनसारखे थोर लोक मजेखातर घरचीं सरपणाचीं लांकडें फोडतात किंवा ज्याप्रमाणें थोर अमेरिकन पंडित प्रसंगीं घरचें गवंडीपणाचें व सुताराचें काम करितात, त्याप्रमाणें किंवा ज्याप्रमाणें जरूर पडतांच लोकमान्य पंडित बळवंतराव उत्तम यांत्रिक घिसाडी बनले त्याप्रमाणें तुम्ही व्हा, म्हणजे तुह्मांला एकांगीपणाचा दोष लागणार नाहीं व गरीबीची मीठ भाकर पंचपक्वान्नापेक्षां गोड लागेल.

हळूहळू बळवंतरावांनीं आपल्या प्रिय 'केसरी' पत्रासाठीं नवीन छापखाना आणला. आपल्याला व त्या पत्राला एके ठिकाणीं रहातां यावें म्हणून एक मोठा थोरला वाडा विकत घेतला. त्या वाड्याचें नांव 'गायकवाडाचा वाडा.' हा वाडा त्यांनीं श्रीमंत सर सयाजीराव महाराज गायकवाड यांचेपासून सुमारें पंधरा हजार रुपयांस विकत घेतला. या वाड्यांत त्यांना पाहिजे होत्या त्या सर्व सोयी त्यांना करतां आल्या. या वाड्यांत स्वतःला रहाण्यास सोईचें घर, छापखान्यासाठीं इमारती, केसरी व मराठा पत्रांचे ऑफिसासाठीं व अत्यंत दुर्मिळ व मौलवान् व उपयुक्त अशा हजारों पुस्तकांच्या लायब्ररीसाठीं मोठालीं दालनें, हजारों लोकां-

च्या सभा भरवण्यास योग्य असें विस्तीर्ण पटांगण, पाण्यानें भरलेले तुडुंब हौद सर्व कांहीं आतां या वाड्याच्या आवारांत आहे.

बळवंतरावजींनीं नुसतीं वर्तमानपत्रें चालविण्यांतच आपला सर्व वेळ खर्च केला असें नाहीं. वर्तमानपत्रें चालविणें हें काम त्यांच्या अनेक देशकार्यांपैकीं एक होतें. देशाच्या हितासंबंधीं जें जें काम त्यांच्या नजरेस पडे तें तें ते अत्यंत कळकळीनें बजावीत असत. राष्ट्रीय सभेला ते नेहमीं जात असत व राष्ट्रीय सभेसंबंधीं अनेक कामें ते मोठ्या हौसेनें करीत असत. जसें बळवंतरावांचें देशावर विलक्षण प्रेम होतें तसेंच त्यांचें स्वतःच्या मित्रांवरही अतिशय प्रेम असे. याची प्रचीति सन १८९४ मध्यें कळून आली. त्यांचे एक स्नेही रा. बापट यांचेवर बडोदें येथें एक भयंकर खटला चालू झाला. त्या प्रसंगीं केवळ मैत्रीखातर बळवंतराव बडोद्यास गेले. तेथें रात्रंदिवस अत्यंत मेहनत घेऊन त्यांनीं बापटांच्या बचावाची उत्तम तयारी केली व ना. दाजीसाहेब खरे यांच्या मदतीनें बापटांचा खटला जिंकून त्यांना दोषमुक्त ठरवून घेतलें. मित्र असावा तर असा असावा, नाहींतर भोजनभाऊ मित्र वाटेल तेवढे मिळतील.

बाळांनों, मागें न्या. रानडे यांचे चरित्र तुम्हाला सांगत असतांना मीं तुह्मांला सांगितलेंच कीं, भागवतधर्म न्या. रानडे यांना फार आवडत असे. भक्तिमार्ग विद्वान्, अडाणी पुरुष, बायका–मुलें या सर्वांना फारच सोपा व देवाचें प्रेम मनांत ठसविण्यास आतिशय उपयोगी असें न्या. रानडे यांना वाटत असे. आणि म्हणून ईश्वराची भक्ति करण्याकरितां, त्याची अनन्यभावें प्रार्थना करण्याकरितां सर्व लोकांना ज्यांत एकत्र हातां येईल अशा प्रार्थनासमाजांना न्या. रानडे यांचा पाठिंबा असे. त्याचप्रमाणें घरोघर देवपूजा अथवा देवभक्ति होत असली तरी लोकांत धर्माबद्दल प्रेम, धर्माची जागृति, धर्माचें ज्ञान व भक्तिमार्गाची आवड उत्पन्न करण्याकरितां व सर्व समाजानें एकत्र जमून वर्षांतून निदान दहा दिवस तरी धर्माचें विवेचन, धर्माचें चिंतन, देवाचें पूजन, देवाचें

भजन व गुणगायन एके ठिकाणीं जमून करावें म्हणून **बळवंतरावांनीं** सन १८९४ पासून गणपतीचे सार्वजनिक उत्सव सुरू केले. त्यामुळें दर वर्षीं धर्मावर गांवोगांव शेंकडों विद्वानांचीं व्याख्यानें हजारों लोकांना ऐकावयास मिळूं लागलीं आहेत व भक्तिमार्गाकडे लोकांचें बरेंच लक्ष्य लागलें आहे.

ज्याप्रमाणें देवाविषयीं पूज्य बुद्धि वाढविण्यासाठीं **बळवंतरावांनीं** गणपतिउत्सव सुरू केले त्याचप्रमाणें थोर ऐतिहासिक पूर्वजांविषयीं पूज्यबुद्धि वाढावी व ऐतिहासिक ज्ञानांत भर पडावी म्हणून त्यांनीं शिवाजीउत्सव सुरू केले. हेही उत्सव हिंदुस्तानांत व हिंदुस्तानाबाहेर आफ्रिका, अमेरिका खंडांत देखील गणपतिउत्सवाप्रमाणेंच दरवर्षीं मराठी लोक मोठ्या प्रेमानें साजरा करितात.

बळवंतरावांचेवर आपल्या या महाराष्ट्राचें त्यांच्या वर सांगितलेल्या अनेक सार्वजनिक हिताच्या कामांवरून व त्यांचा अलौकिक स्वार्थत्याग, धैर्य, देशभक्ति व करारीपणा वगैरे गुणांवरून अतीशय प्रेम जडलें व त्यांनीं **बळवंतरावजींना** आपल्या वतीनें सन १८९५ सालीं एकदां व सन १८९७ सालीं पुनः मुंबईसरकारच्या कायदे कौन्सिलाचे सभासद निवडिलें. अशा तऱ्हेनें सर्व सुरळीत चाललें होतें, इतक्यांत देशाच्या दुर्दैवानें सन १८९६ सालीं प्लेगची सांथ या देशांत सुरू झाली. तिनें मुंबईस व पुण्यास कहर उसळिला. हजारों माणसें पटापट मरूं लागलीं. लोक भीतीनें अगदीं गांगरून गेले. त्या भयंकर प्रसंगीं **बळवंतरावांनीं** जिवाकडे न पाहतां सरकारला व लोकांना अतिशय मदत केली. प्लेगचे रोग्यांसाठीं हॉस्पिटल काढलें. व तेथें प्लेगचे रोगी नेण्याची सरकारांनीं व्यवस्था केली. ती कोमल मनाच्या हिंदी लोकांना नापसंत झाली व त्यामुळें दोन बड्या अधिकाऱ्यांचे खून झाले. या बाबतींत संशय व गैरसमज उत्पन्न होऊन सरकारनें **बळवंतरावांवर** राजद्रोहाचा खटला केला व **बळवंतरावांना** १८ महिन्यांची शिक्षा झाली. पुढें **मॅक्समुलर** वगैरे विलायतेंतील विद्वानांनीं **बळवंतरावां-**

विषयीं चांगलें मत देऊन सरकारचा गैरसमज दूर केला, तेव्हां सरकारनें शिक्षा संपण्याच्या सहा महिने आधींच दयाळूपणानें **बळवंतरावांना** सोडून दिलें. थोर माणसें थोर माणसांच्या कशीं उपयोगीं पडतात तें पहा; प्रख्यात पंडित **मोक्षमुल्लर** यांची व **बळवंतरावांची** ओळख व मैत्रि कशी जमली ती सांगतों:—

ओरायन.

बाळांनों, ओरायन या नांवाचें पुस्तक बळवंतरावांनीं लिहिलें. तें त्यांनीं सन १८९२ सालीं लंडन शहरांत प्राचीन शास्त्रज्ञांच्या परिषदेकडे पाठविलें व नंतर १८९३ सालीं छापून जगांतील अतिशय विद्वान् प्राचीन शास्त्रांचा शोध करणाऱ्या पंडितांकडे पाठविलें. या पुस्तकांत आपले वेद ग्रंथ इ. सनापूर्वीं सुमारें ५००० वर्षांपूर्वीं लिहिले असले पाहिजेत असें ज्योतिषशास्त्र व वेदांतांतील वचनें यांवरून सिद्ध करून दाखविलें होतें. पुस्तकाची एक प्रत थोर पंडित **मोक्षमुल्लर** यांचेकडेही **बळवंतरावांनीं** पाठविली होती. ती वाचून **टिळक** हे अतीशय विद्वान्, शोधक व तीक्ष्ण बुद्धीचे आहेत अशी प्रो. **मोक्षमुल्लर** यांची खात्री झाली. त्या पुस्तकांतील विषयासंबंधानें **टिळकांचा** व **प्रो. मोक्षमुल्लरांचा** बराच पत्रव्यवहार झाला व त्यावरून या निरनिराळ्या देशांत रहाणाऱ्या पंडितांची मैत्री जुळली. हें पुस्तक सर्व जगांतील विद्वानांना अतिशय आवडलें व त्या वर्षांतील पुस्तकांत त्याला पहिला नंबर मिळाला. सन १८९७–९८ मध्यें **बळवंतरावांना** बारा महिने तुरुंगवासांत काढावे लागले. तुरुंगांत सक्त मजुरीची शिक्षा होती तरी रात्रीच्या वेळीं सरकारनें मेहेरबानी करून त्यांना वाचनाची सोय करून दिली होती. त्या सोईचा फायदा घेऊन तेथेंही योग्याप्रमाणें शांत मन ठेवून त्यांनीं आपला सर्व जगांतील पंडितांना थक्क करून सोडणारा एक ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथाचें नांव **'आर्टिक होम इन् दि वेदाज'** म्हणजे **'आर्यांचें उत्तरध्रुवाकडील मूलस्थान.'** या ग्रंथांत **लो. टिळकांनीं** आपले आर्यपूर्वज आरंभीं उत्तरध्रुवाजवळ रहात होते व तेथें त्यांनीं वेद लिहिले असें ज्योतिषशास्त्र, भूगर्भशास्त्र व दुसरीं अनेक शास्त्रें व

वेद व पारशीलोकांचें धर्मपुस्तक अवेस्ता या सर्वांच्या आधारानें सिद्ध केलें आहे. हें पुस्तक त्यांच्या पहिल्या पुस्तकापेक्षांही जगांतील विद्वानांना अतीशय आवडलें. आपल्या सरकारनेंही त्याची स्तुति केली, व त्यामुळें सर्व जगांताल थोर पंडितांत लोकमान्यांची गणना होऊं लागली. पाहिलेंत बाळांनों, मनुष्याला इच्छा असली म्हणजे प्रत्यक्ष तुरुंगांतही असलें सुंदर पुस्तक लिहितां येतें. यावरून वेळ असतां व चांगली स्थिति असती तर मीं हें केलें असतें व तें केलें असतें या तुमच्या वल्गना फुकट आहेत. बाळांनों, यावरून कितीही अडचणी, संकटें आलीं तरी वेळांत वेळ काढून आपण चांगलें काम करीत रहावें हा धडा तुम्ही शिका. वर सांगितलेलें सुंदर पुस्तक बळवंतरावांनीं सन १९०१ मध्यें लिहिलें.

लोकमान्य टिळकांच्या अंगांत निस्सीम देशभक्ति, स्वार्थत्याग, धैर्य व करारीपणा हे अतीशय मोलवान् गुण होते. यामुळेंच त्यांचे देशबंधु ह्यांना त्यांच्याविषयीं आदर वाटत असे. सरकारलाही हे त्यांचे गुण पाहून त्यांची किंमत कळून चुकली होती; पण सरकारला वाटे त्यांनीं आपल्या अंगांतील या उत्तम गुणांचा सरकारचे कामीं उपयोग करावा. **बळवंतराव** सरकारी नोकरींत शिरते तर या त्यांच्या गुणांनीं ते अगदीं वरिष्ठ अम्मलदारीच्या जाग्यावर गेले असते व सरकारानें त्यांचा अतिशय सन्मान केला असता.

वर सांगितलेल्या चार गुणांशिवाय मागें बापट प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मित्राकरितां वाटेल ते कष्ट सोसण्यास तयार व्हावयाचें, प्राणसंकटही सोसावयाचें याच गुणाचें उदाहरण त्यांनीं बापटांना रात्रंदिवस जिवापाड मेहतन करून मदत केली हें होय. यापेक्षांही अधीक ढळढळीत उदाहरण म्हटलें म्हणजे ताईमहाराजांचें दत्तक प्रकरण होय. त्याची हकीगत अशीः– लो. **टिळकांचे बाबामहाराज** म्हणून एक जिवलग स्नेही होते. त्या **बाबामहाराजांची** मोठी जहागिरी व इस्टेट होती. त्यांनीं मरतांना **टिळक** व इतर कांहीं मंडळींना बोलावून मृत्युपत्र केलें, व **टिळक** वगैरे ट्रस्टी त्या मृत्युपत्राप्रमाणें कारभार करण्यास

नेमले. बाबामहाराजांच्या बायकोचें नांव ताईमहाराज. बाबामहाराजांच्या मागें त्यांचा वंश व नांव चालावें म्हणून ताईमहराजांच्या मांडीवर टिळकांनीं एक लहान वयाचा जगन्नाथ नांवाचा मुलगा दत्तक दिला. पुढें या दत्तकप्रकरणांत बऱ्याच भानगडी व फिर्यादी-अर्यादी झाल्या. टिळकांना आपल्या अमोल वेळाचीं जवळ जवळ वीसवर्षें दगदग करावी लागली. बळवंतरावजींच्या मित्रांनीं जेव्हां हें प्रकरण अतिशय त्रासदायक होणार असें पाहिलें तेव्हां इतर कामांतील ट्रस्टी जसे राजिनामा देतात व मोकळे होतात तसें तुम्ही करा व या यातायातींतून सुटा असें अगदीं विनवून सांगितलें. पण ते म्हणाले, 'मी आपल्या मित्राचें कार्य सोडून देऊन त्याचा विश्वासघात करणार नाहीं.' या मित्रकार्यासाठीं मरणाच्या केवळ दहा दिवस आधींपर्यंत त्यांना एकसारखें कष्ट करीत रहावें लागलें. या कामांत त्यांच्या अंगच्या हुशारीनें व चिकाटीनें त्यांना शेवटीं यश आलें हें खरें, पण त्यामुळें त्यांचे हाल किती झाले ! ह्या प्रकरणांत हायकोर्टांत अतीशय कुशलतेनें ज्या दिवशीं सक्त मेहनतीनें त्यांनीं जय मिळविला त्याच दिवशीं रात्रीं जो त्यांना ताप भरला त्याच तापानें दहा दिवसांत त्यांना ओढून नेलें. म्हणजे मित्रासाठीं त्यांनीं देह झिजविला इतकेंच नव्हे तर मित्रकार्यास देहाची आहुति दिली. बाळांनों, पाहिलात हा लोकोत्तर मित्रप्रेमाचा मासला ! मित्र असावा तर असा असावा. बाळांनों असेंच तुम्ही आपल्या मित्रांवर प्रेम करा, म्हणजे तुमचे मित्रही तुमच्यावर असेंच प्रेम करतील. आपल्या देशाचा भाग्योदय व्हावा, त्याचा नांवलौकिक वाढावा, त्याची भरभराट व्हावी, देशबंधूंना पोटभर अन्न व अंगभर जाडेंभरडें तरी वस्त्र मिळावें याबद्दल रात्रंदिवस बळवंतरावांना तळमळ लागलेली असे. यासाठीं लोकांनीं स्वदेशी कापड वापरावें, स्वदेशी वस्तु परदेशी वस्तूपेक्षां जरी कमीप्रतीच्या असल्या तरी वापराव्या, त्यांना जरी जास्त किंमत पडली तरी ते पैसे आपल्या देशांतीलच मजुरांना व कामकरी मंडळीला मिळणार हें लक्षांत ठेवून महाग असल्या तरी

देशी वस्तूच विकत घ्याव्या असा त्यांनीं कळकळीचा उपदेश केला व त्यामुळें बरेच लोक देशी वस्तू व देशी कापड वापरूं लागले. बळवंतरावजी स्वतः देशीच कापड व देशी वस्तू वापरीत असत. नवीन नवीन देशी धंदे निघावे, जुन्या मोडकळीस आलेल्या उद्योगधंद्यांना चांगली स्थिति प्राप्त व्हावी म्हणून त्यांचे सारखे प्रयत्न चालू असत. याच हेतूनें त्यांनीं पैसाफंड हातीं घेऊन त्याला जोमांत आणून त्या पैसाफंडाच्या मदतीनें तळेगांव येथें कांचकारखाना व कांचकाम शिकविणारी शाळा काढली. या कामीं त्यांनीं पुष्कळ लोकांची मदत मिळविली. सरकारानेंही या तळेगांवच्या कांचकामाच्या कारखान्याला आतां मदत चालू केली आहे इतकेंच नव्हे तर या कारखान्यांतील माल सरकारी कामाला विकत घेत जावा असा ठरावही केला आहे. पहिल्यानें या कारखान्याविषयीं सरकारचें मन साशंक होतें पण पुढें त्यांचा संशय दूर झाला.

लोकांना धंदेशिक्षणाबरोबरच राष्ट्रीय शिक्षण द्यावें असें बळवंतरावजींना वाटत असे. ज्या शिक्षणानें स्वदेशाबद्दल, स्वधर्माबद्दल व स्वदेशाच्या इतिहासाबद्दल प्रेम व अभिमान उत्पन्न होईल तें राष्ट्रीय शिक्षण. असलें राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठीं समर्थविद्यालय नांवाची शाळा कांचकामाच्या कारखान्यालगत पुष्कळ मित्रांना बरोबर घेऊन तळेगांव येथें बळवंतरावजींनीं काढली. तिच्याबद्दलही पहिल्यानें सरकारचें मन साशंक होतें. पण आनंदाची गोष्ट ही कीं, त्या समर्थविद्यालयाबद्दलही सरकारचें मन आतां साफ झालें आहे व त्या विद्यालयाला सरकारांनीं मान्यता दर्शविली आहे. परस्परांविषयीं संशय दूर होण्यास परस्परांच्या भेटी व संभाषणें उपयोगी पडतात तसेंच येथें झालें. सरकारी बडे कामदार तळेगांवास गेले व त्यांनीं स्वतः या संस्था पाहिल्या तेव्हां त्यांचा संशय दूर झाला व त्यांचें व सरकारचें या संस्थांविषयीं चांगलें मत झालें.

आमच्या देशाचा कारभार आमच्या हातांत असावा असें बळवंतरावांना वाटत असे म्हणूनच स्वराज्याची चळवळ त्यांनीं चालू केली.

याबद्दलही आपलें सरकार व लो. टिळक यांचें आतां एकमत झालें आहे. हिंदुस्तानाला **स्वराज्य** द्यावयाचें असें हिंदुस्तानचे स्टेट सेक्रेटरी **मॉंटेग्यू** साहेब व हिंदुस्तानचे व्हाइसरॉय यांचें पक्कें मत झालें आहे. हिंदुस्तानाला पायरीपायरीनें **स्वराज्य** द्यावयाचें असा सन १९१७ सालींच मे. **मॉंटेग्यू** साहेबांनीं ठराव पास करून घेतला आहे. इतकेंच नव्हे तर त्या ठरावाप्रमाणें रिफॉर्म ॲक्ट पास करून पार्लमेंटानें स्वराज्याचा पहिला हप्ता आपणाला देऊनही टाकला आहे. या कामीं **लो. टिळकांचे** परिश्रम व खटपट सन १९०२ पासून चालू होती, तिचा फार उपयोग झाला व त्या त्यांच्या खटपटीचें गोड फळ सन १९१९ च्या डिसेंबर महिन्यांत पार्लमेंटसभेंत **स्वराज्याचा** ठराव पास होऊन त्याला **जॉर्ज बादशहा** यांची संमति मिळाली हें ऐकतांच **लो. टिळकांना** फार आनंद झाला व त्यांनीं साम्राज्य सरकार व बादशहा यांचे लगेच कृतज्ञतापूर्वक आभार मानले.

अशा तऱ्हेनें सन १९०२मध्यें **लो. टिळक** यांनीं हातीं घेतलेल्या तीन गोष्टी म्हणजे स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व **स्वराज्य** या बऱ्याच फलद्रूप झाल्या व त्यासंबंधीं सरकार व आपले देशबंधू यांचें एकमत झालें व विशेषतः आपलीं कार्यें सुपरिणामी व यशस्वी झालीं हें पहाण्यास दैवानें **लोकमान्यांना** तितकें तरी आयुष्य दिलें हें फार चांगलें झालें. **लो. टिळक** यांचे मनांत स्वदेशाविषयीं जितकें प्रेम वसत होतें तितकें किंवा त्याहूनही अधिक त्यांचें स्वधर्मावर प्रेम होतें. पण एकच मनुष्य कोठें कोठें पुरा पडेल ? **लो. टिळकांनीं** राष्ट्रीय सभेंत कामगिरी करावी, का राष्ट्रीय शिक्षणाची कामगिरी करावी, का मद्यपाननिषेधाची चळवळ करावी, का हिंदुलोकांचें प्रिय पुस्तक भगवद्गीता सोपें करून सर्वांना सांगावें का करावें तरी काय ? पण बाळांनों, वेळ मुळींच फुकट दवडावयाचा नाहीं. कारण वेळ ही ईश्वराची अमोल देणगी आहे. शेवटीं आपणास दिलेली ही देणगी म्हणजे आयुष्य आपण कसें खर्च केलें याचा जबाब देवाजवळ

द्यावा लागेल हें लो. टिळक नेहमीं मनांत बाळगीत असत म्हणूनच तुरुंगांतील वेळ देखील ते चांगलें काम करण्यांत घालवीत. या त्यांच्या वेळाच्या सदुपयोगमुळेंच एवढालीं प्रचंड कार्यें त्यांच्या हातून झालीं.

राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी व स्वराज्य यांबद्दलच्या त्यांच्या कामगिरीचें थोडेंसें वर्णन वर आलेलेंच आहे. राष्ट्रीय सभेंत या विषयांबद्दल त्यांनीं बरीच खटपट केली. पण त्या बाबतींत सन १९०७ सालीं राष्ट्रीय सभेंत मतभेद झाला. राष्ट्रीय सभा मोडली व त्या सभेंतील सभासदांत दोन पक्ष झाले. एक नेमस्त व दुसरा राष्ट्रीय. टिळक व त्यांचा राष्ट्रीय पक्ष हा १९०७ पासून १९१५ पर्यंत राष्ट्रीय सभेबाहेर होता.

सन १९०८ मध्यें टिळकांनीं मुंबईतील गिरण्यांतील मजुरांचीं दारूनें झालेली वाईट स्थिति पाहिली. त्यावरून आपल्या देशांतील बऱ्याच लोकांचें दारूच्या व्यसनानें जबरदस्त नुकसान होत आहे, ही गोष्ट त्यांच्या मनाला अतीशय दुःख देऊं लागली. लगेच त्यांनीं त्या व्यसनावर जोराची स्वारी केली व तें व्यसन कमी होऊं लागलें होतें. आणखी खटपट करावयास पाहिजे होती. पण इतक्यांत लो. टिळकांवर राजद्रोहाचा खटला झाला व त्यांना सहा वर्षें काळेपाण्याची शिक्षा न्यायमूर्ति दॉवर यांनीं दिली. तथापि मुंबईच्या त्यावेळच्या गव्हर्नरांनीं आपल्या अधिकारांत ती शिक्षा जितकी सौम्य करितां आली तेवढी केली. म्हणजे त्यांनीं सक्त मजुरीची शिक्षा होती ती बदलून नजरकैदेसारखी केली. लो. टिळक यांच्या जेवणाखाण्याची नीट व्यवस्था रहावी म्हणून दाक्षिणी ब्राह्मण स्वयंपाकी स्पेशल त्यांचेसाठीं पाठवून दिला. त्यांचा तुरुंगांतील वेळ फुकट जाऊं नये म्हणून त्यांचा पुस्तकसंग्रह त्यांचेकडे पाठवून दिला व त्यांना अंदमानास न पाठवितां मंडाले येथील किल्ल्यांत ठेविलें. या सर्व तजविजींमुळेंच लोकमान्य पुनः परत आले व पुढें सहा वर्षें त्यांनीं लोकसेवा केली. या चांगल्या व्यवस्थेचा दुसरा एक फायदा असा झाला कीं, लोकमान्यांचे हातून त्यांचें अगदीं

बाळपणापासून आवडतें व अत्यंत लोकोपयोगी असें तेजस्वी महत्कार्य स्वधर्मकार्य घडून आलें तें एवढें मोठें व महत्त्वाचें आहे कीं त्यांच्या आजपर्यंतच्या कामगिरीवरचा तो मुकुटच म्हणावयास हरकत नाहीं. तें महत्कार्य नुसतें देशकार्य नाहीं तें जगत्कार्य आहे. तें महत्कार्य म्हणजे '**भगवद्गीतारहस्या**'चें लेखन. **भगवद्गीता** हा ग्रंथ म्हणजे आपणा हिंदूंना अत्यंत पूज्य व अत्यंत वंद्य आहे. याचें महत्त्व सुप्रसिद्ध विदुषी योगिनी ॲनि बेझंट यांच्या परिश्रमानें युरोप व अमेरिका या खंडांतलि लोकांना आतां स्पष्ट कळूं लागलें आहे. **लो. टिळक** यांचें या ग्रंथाचें वाचन अगदीं बाळपणीं सुरू झालें. त्यांचे वडील आजारी असतां वडिलांच्या आज्ञेवरून **बळवंतराव** त्यांचे जवळ बसून भगवद्गीता वाचीत असत. तेव्हांपासून त्यांनीं अनेक वेळां गीता वाचली, तिचा अर्थ लावला, तिच्यावरच्या सर्व टीका वाचल्या व निरनिराळ्या विद्वानांनीं तिचे निरनिराळे अर्थ केले होते तेही त्यांनीं वाचिले. एकाच गीतेचे निरनिराळे अर्थ केलेले जेव्हां त्यांनीं पाहिले तेव्हां त्यांना आश्चर्य वाटलें. मग त्यांनीं गीता नुसती मूळ मात्र वाचली. आपल्या मनानें टीका न पहातां त्यांनीं गीतेचा सरळ अर्थ लावला. तेव्हां त्यांना स्पष्ट कळून आलें कीं, **शंकराचार्य** गीतेचा अर्थ करतात तसा तो नाहीं. गीता संन्यास घ्या म्हणून सांगत नाहीं, गीता आपापलें काम निरपेक्ष बुद्धीनें उत्तम करा असें सांगते. हें गीतेचें सांगणें, हा **कृष्णाचा** उपदेश स्वदेशाला इतकेंच नव्हे तर सर्व जगाला सांगावा असें त्यांच्या मनांत फार होतें. कारण त्यांचें मत असें होतें कीं, गीता ही केवळ हिंदुस्तानासाठीं नाहीं ती सर्व जगाकरितां आहे. ती सर्व जगाचें कल्याण करण्याकरितां **श्रीकृष्णांनीं** सांगितली आहे व ती सर्व जगांत प्रेम, ऐक्य, समता, बंधुभाव व शांति प्रस्थापित करण्यासाठीं ईश्वरानें जगाला दिलेली देणगी आहे. ती प्रथम आपले हातीं पडल्यामुळें सर्व जगाला ती देणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे, असें **लोकमान्यांचें** मत होतें. हें कार्य त्यांना फार प्रिय होतें. पण वारंवार इतर कामगिरी

करावी लागली यामुळें ही मोठी कामगिरी तशीच राहून गेली व कदाचित् राजकीय कामगिरींत सर्व वेळ गुंतून गेल्यामुळें ही पवित्र कामगिरी शेवटपर्यंत तशीच राहिली असती. पण ईश्वराच्या मनांत हें महत्कार्य त्यांचे हातून करून घ्यावयाचें होतें. राजकीय कामगिरी पुष्कळांना करतां येईल पण हें महत्कार्य करण्याला लो. टिळकांसारखा अद्वितीय मनुष्यच पाहिजे. म्हणूनच ईश्वरानें लो.टिळकांना मंडालेच्या तुरुंगांत एकांतवासांत पाठविलें. गीतेसारख्या ग्रंथाचें मनन करावयास एकांत पाहिजे. तसा तो **लोकमान्यांना** मंडालेस मिळाला व त्यांच्या हातून हें महत्कार्य सिद्धीस गेलें. '**श्रीमद्भगवद्गीतारहस्य**' हा ग्रंथ या देशांत इतका लोकप्रिय झाला आहे कीं त्याच्या हजारों प्रतींच्या आवृत्ति हां हां म्हणतां खपत आहेत. त्याची पहिली मराठी भाषेंतील आवृत्ति फक्त तीनच महिन्यांत खलास झाली. या ग्रंथाचा लाभ सर्व हिंदी बांधवांना मिळावा म्हणून ह्याची हिंदी भाषेंत लो. **टिळकांनीं** आवृत्ति काढली तीही अशीच झटदिशीं खलास झाली. पुढील हिंदी आवृत्तीवर अशाच उड्या पडूं लागल्या.शिवाय याचीं गुजराथी, कानडी वगैरे भाषांत भाषांतरें होऊन त्या त्या भाषा जाणणारांना ह्या ग्रंथाचा लाभ मिळाला. ह्याची एक इंग्रजी आवृत्ति काढावी असें **बळवंतरावांच्या** मनांत होतें, पण वेळ न मिळाल्यामुळें तें तसेंच राहून गेलें. यावरून बाळांनों पहा कीं, लोकमान्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली याबद्दल देवाला आपण दोष दिला, ही गोष्ट वाईट झाली असें आपण मानलें, पण ही गोष्ट इतकी सुपरिणामी झाल्यावर प्रत्येकाच्या तोंडांतून हेच शब्द येतील कीं 'ईश्वरा तुझी लीला अगाध आहे. आम्हीं अज्ञ मुलें आहों! अज्ञानानें व उतावीळपणानें तुझ्या कृतीचें परिणाम आम्हाला दिसत नाहींत व आम्ही तुला दोष देतों. देवराया याबद्दल तूं आम्हाला क्षमा कर. यापुढें तूं जें जें करतोस तें तें आमच्या हिताचेंच असलें पाहिजे असें आम्ही पक्कें ध्यानांत ठेऊं.' बाळांनों, जें जें घडून येतें तें सर्व शवेटीं आपल्या हिताचेंच असणार असें पक्कें ध्यानांत ठेवा. असेंही

म्हणतात कीं, लो. टिळक यांनीं इतकें काम केलें होतें कीं त्यांनीं विश्रांति घ्यावी, त्यांना बळजबरीनें विश्रांति घ्यावयास लावावें असें पुष्कळ डॉक्टरांचें त्यावेळीं मत होतें; कारण डॉक्टर म्हणत हे विश्रांति न घेतील तर थोडेच दिवसांत यांना हें जग सोडून जावें लागेल. लो. टिळक मोकळे असते तर देशसेवेपुढें त्यांना विश्रांति घेण्याचें बिलकूल पटलें नसतें व परिणाम भयंकर झाला असता; यासाठीं देवानें त्यांना ६ वर्षांची अशा तऱ्हेनें विश्रांति घ्यावयास लावलें; त्यांचेकडून जगन्मान्य **गीतारहस्य** प्रगट करविलें. व मग त्यांना इकडे आणून उत्तम कामगिरी आणखी सहा वर्षे त्यांच्या हातून करून घेतली हे ईश्वराचें मोठे उपकार आहेत. असो, मंडालेस लिहिलेला '**गीतारहस्य**' हा दिव्य ग्रंथ बरोबर घेऊन, कैदेंतून सुटून **बळवंतराव** सन १९१४ सालीं पुण्यास आपल्या वाड्यांत सुखरूप आले. तेव्हां सर्व देश आनंदित झाला. एक गोष्ट मात्र वाईट झाली ती ही कीं, **बळवंतराव** तुरुंगांत गेले तेव्हां त्यांची गृहलक्ष्मी सहधर्मचारिणी सौ. **सत्यभामाबाई** घरीं होती, पण ते घरीं परत येण्यापूर्वीच ती अत्यंत सुशील पतिव्रता पतिविरहानें झुरून झुरून हा लोक सोडून स्वर्गास निघून गेली होती. **श्रीरामचंद्रा-प्रमाणें बळवंतरावांना** लोकसेवा गृहसौख्यापेक्षां अधिक आदरणीय वाटत होती यामुळें मन घट्ट करून पत्नीच्या वियोगाचें दुःख गिळून त्यांनीं देशसेवा करण्यास पुनः सुरवात केली.

मागें सांगितलेंच आहे कीं, **बळवंतरावजी** मतभेदामुळें आपल्या राष्ट्रीय पक्षासह काँग्रेसमधून बाहेर पडले किंवा काँग्रेसमधून त्यांना व त्यांचे पक्षाला बाहेर टाकण्यांत आलें. पुढें लवकरच त्यांना मंडालेच्या तुरुंगांत जावें लागलें यामुळें ते व राष्ट्रीय पक्ष ते परत येईपर्यंत बाहेरच होता. यामुळें काँग्रेस अतिशय रोडावली. यामुळें सुटून येतांच रोडावलेल्या राष्ट्रीय सभेला टॉनिक देऊन गुटगुटीत करण्याच्या उद्योगाला ते लागले. मोठ्या प्रयत्नांनीं **बळवंतरावांनीं** राष्ट्रीय सभेंतील दोनही पक्षांचा समेट घडवून आणला. यामुळें राष्ट्रीय सभा पुनः गुटगुटीत झाली

व सन १९१६ पासून तर ती तेजानें व बळानें शुक्ल पक्षांतील चंद्राप्रमाणें वाढत चालली आहे. याशिवाय **बळवंतरावांनीं** दुसरें काम केलें तें स्वराज्यसंघस्थापनेचें. त्यांनीं स्थापिलेला स्वराज्यसंघ आतां बाळसे-दार व गुटगुटीत झाला आहे व आपली कामगिरी जोरानें बजावीत आहे. **बळवंतरावजींनीं** यानंतर तिसरी कामगिरी केली ती ही कीं, राष्ट्रीय सभेचें शिष्टमंडळ घेऊन ते विलायतेस गेले. तेथें त्यांनीं ब्रिटिश लोकांच्या अनेक सभा भरविल्या व हिंदुस्तानाला काय पाहिजे हें त्यांनीं तेथील लोकांना समजावून सांगितलें. त्याशिवाय पार्लमेंटाच्या कमेटी-समोर त्यांनीं हिंदुस्तानला कशा प्रकारचें स्वराज्य पाहिजे हें स्पष्टपणें ठेविलें. या कामीं ते हिंदुस्तानचे स्टेट सेक्रेटरी **मॉंटेग्यूसाहेब** यांना-ही भेटले, व या प्रश्नाचा पुष्कळ वेळपर्यंत त्यांनीं **मॉंटेग्यू साहेबां**-बरोबर खल केला. साठ वर्षें होऊन गेल्यावर व तुरुंगवासानें व म्हातार-पणानें अशक्तता आली असतां हा देशभक्त हजारों कोस प्रवास करून देशासाठीं विलायतेंत गेला व तेथें शेंकडों मैल प्रवास करून त्यानें ब्रिटिश लोकांत हिंदुस्तानविषयीं जागृति उत्पन्न केली. हें पाहून हिंदी बांध-वांचें त्यांचेवरील प्रेम अतीशय वाढलें. **बळवंतरावजी** परत आल्यावर हजारों ठिकाणच्या लोकांनीं त्यांचा गौरव केला व त्यांना मानपत्रें दिलीं व त्यांच्या मिरवणुकी काढल्या. बळवंतरावांवर देशबंधूंचें प्रेम इतकें जडलें कीं, प्रभु **रामचंद्र, श्रीकृष्ण** यांचेप्रमाणें लोक त्यांची जयन्ती म्हणजे जन्मोत्सव करूं लागले. त्यांना साठ वर्षें पुरीं झालीं तेव्हां लोकांनीं त्यांचा अपूर्व सन्मान केला व त्यांच्या सार्वजनिक कामगिरीबद्दल त्यांना १ लक्ष रुपयांचा आहेर केला. तो सर्व पैसा स्वतःला न घेतां **बळवंतरावांनीं** देशकार्याला दिला. **बळवंतराव** १९१९ च्या आगस्ट महिन्यांत विलायतेहून हिंदुस्तानांत परत आले. त्यानंतर अमृतसरच्या राष्ट्रीयसभेला जाण्याची त्यानीं तयारी केली व मुंबई येथील प्रतिनिधींना घेऊन स्पेशल गाडीनें त्यांनीं डिसेंबर महिन्याचे अखेरीस पंजाबकडे धांव घेतली. वाटेंत आपले परमपूज्य बादशहा पंचम जॉर्ज

त्यांनीं स्वराज्याचा पहिला हप्ता आपणास दिला ही बातमी त्यांना कळली. ती कळतांच मी माझे देशाचे तर्फे बादशाहांचे या थोर देणगी बद्दल आभार मानतों अशी तार त्यांनीं स्टेट सेक्रेटरीसाहेब व हिंदुस्तान सरकार यांचेकडे पाठविली. नंतर अमृतसर येथें गेल्यावर पंजाबी लोकांनीं अतीशय प्रेमानें त्यांची भव्य मिरवणूक काढली. त्यानंतर राष्ट्रीय सभेंत उत्तम कामगिरी बजावून बळवंतराव परत पुण्यास आले. पुण्यास आल्यावर राष्ट्रीय कामगिरी बजावीत असतांना त्यांनीं एक संसारांतील कामगिरी बजावली. कोणती म्हणाल तर आपल्या मुलाचें लग्न. ओघानेंच आलें म्हणून या राष्ट्रीय पुरुषाच्या प्रपंचाची थोडीशी हकीगत येथें देतों. साधारण जगांत आपण असें पहातों कीं, मोठमोठालीं कामें करणाऱ्या राष्ट्रीय थोर पुरुषांच्या गृहसौख्यांत कांहीं तरी उणेपणा असतो. त्यांना संततिसौख्य नसतें किंवा अल्प असतें. उदाहरणार्थ; थोर देशभक्त न्या. रानडे यांना संततिसौख्य मुळींच लाभलें नाहीं, तीच अवस्था विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची. त्यांनाही संततिसौख्य नव्हतें. थोर भारतसेवक ना. गोखले यांना पुत्रलाभ झाला नाहीं; परंतु आपले बळवंतराव सर्व बाजूंनीं यशस्वी होते. त्यांना तीन सुशील मुली व तीन सद्गुणी मुलगे झाले. त्यांच्या तीनही मुलींचीं लग्नें होऊन त्यांना सुशील व सुविद्य पति लाभले आहेत. त्यांचे वडील चिरंजीव १९०१ सालीं प्लेगनें वारले, हा एक दुःखाचा घाला त्यांचेवर आला. त्यांचे दुसरे चिरंजीव मेडिकल कॉलेजमध्यें शिकत आहेत व तिसरे चिरंजीव यांनीं बी. ए. पर्यंत मजल मारली आहे. या दोन मुलांपैकीं एकाचें लग्न बळवंतरावांच्या हातून झालें. बळवंतरावांना देशसेवा इतकी उत्तम बजावतां आली याचें बरेंचसें श्रेय त्यांच्या सुशील, शांत, पातिनिष्ठ व गृहकार्यदक्ष पत्नी सौ. सत्यभामाबाई यांना दिलें पाहिजे. त्यांनीं घरची सर्व व्यवस्था उत्तम तऱ्हेनें ठेवली व सर्व प्रपंचाचा कारभार स्वतः उत्तम तऱ्हेनें चालविला. यामुळेंच बळवंतरावांना सर्व वेळ व सर्व लक्ष्य देशकार्याकडे लावतां आलें. बळवंतराव टिळक व सौ. सत्यभामा-

बाई टिळक हें नमुनेदार जोडपें होतें. या पतिपत्नींचें एकमेकांवर अतिशय प्रेम होतें. त्यांचें सर्व गोष्टींत व सर्व कार्यांत अगदीं एकमत असे. सुशील गृहिणी कशी असावी असें कोणीं विचारल्यास कै. सौ. **सत्यभामाबाईसारखी** असावी असें कोणीही म्हणेल. अशा सुशील, प्रेमळ व पतिनिष्ठ भार्येच्या संगतीचा लाभ **बळवंतरावजींना** जवळजवळ आपले वयाच्या ५५।५६ वर्षांपर्यंत मिळाला ही परमेश्वरी कृपाच समजली पाहिजे. कारण **बळवंतरावांना** या बाबतींत जरा भीतीच वाटत होती. कारण **बळवंतरावांचे** वडील **गंगाधरपंत** हे चांगले ज्योतिषी होते; त्यांनीं **बळवंतरावांच्या** जन्माची वेळ बरोबर टिपून ठेवली होती व त्यावरून त्यांची पत्रिकाही तयार केली होती. ती पत्रिका पाहून **गंगाधरपंतांनीं** म्हणजे **बळवंतरावांच्या** वडिलांनीं त्यांना सांगितलें होतें कीं 'तुला द्विभार्या-योग आहे.' म्हणजे तुला दुसरी बायको करावी लागणार. पण ईश्वराला काय अशक्य आहे ? त्यानें **बळवंतरावांना** सर्व वेळ देशकार्याला देतां यावा व प्रपंचांतील कामांत त्यांचा वेळ जाऊं नये म्हणून त्यांच्या सुशील पत्नीचें आयुष्य वाढविलें. असो.

बळवंतरावांचें प्रिय पत्र 'केसरी' याचा खप तें त्यांनीं हातीं घेतलें तेव्हां सुमारें ४००० होता. तो त्यांच्या दिव्य देशभक्तीच्या तपानें वेळोवेळीं वाढत जाऊन आतां तो सुमारें ४० हजार झाला आहे असें ऐकतों. एवढ्या प्रती एका दिवसांत झपाझप छापतां याव्या म्हणून **बळवंतरावांनीं** विलायतेहून येतांना एक प्रचंड शक्तीचें यंत्र आणलें आहे व या यंत्रावर 'केसरी' आठवड्यांतून दोनदां काढावा असा त्यांचा बेत होता. त्याप्रमाणें यंत्र आणून वाड्याच्या आवारांत त्या यंत्रासाठीं नवी इमारतही बांधण्याचें काम सुरू केलें. पण मनुष्य योजित असतो एक, व दैवांत असतें दुसरेंच तसें झालें. १९२०च्या जून महिन्यापासून मधून मधून, **बळवंतरावांना** हिंवताप येऊं लागला तरी त्यांचा कामाचा रगाडा चालूच होता. पुढें **बाबामहाराजांच्या** दत्तक प्रकरणांत हायकोर्टांत कोल्हापूर सरकारच्या अर्जावरून काम चालावयाचें होतें म्हणून बॅ. जिना यांना

केस समजावून देण्यासाठीं व हवापालट करण्यासाठीं ते मुंबईला गेले, व आपल्या प्रिय **सरदारगृहांत** जाऊन राहिले. नंतर त्यांनीं अत्यंत मेहनत घेऊन बॅ. जिना यांना केस समजावून सांगितली. त्या दिवशीं फार थक्वा आल्यामुळें ते जरा मोटारींतून लांब फिरून आले. परत आल्यावर रात्रीं त्यांना ताप आला. दुसरे दिवशीं हायकोर्टानें आपल्यासारखा निकाल दिला हें ऐकून त्यांना आनंद झाला. तरी ताप थोडा थोडा येत होताच. ही त्यांच्या आजारीपणाची बातमी हां हां म्हणतां सर्व देशभर पसरली. सर्व देश चिंतातुर होऊन **सरदारगृहाकडे** डोळे लावून बसला. मुंबईतील हजारों लोक त्यांची प्रकृति कशी आहे हें पहाण्यासाठीं बारान्‌-बारा चोवीस तास **सरदारगृहाकडे** जाऊं लागले. भाविक ब्राह्मणांनीं **टिळक** बरे व्हावे म्हणून देवावर अभिषेक सुरू केले, धनिक व्यापाऱ्यांनीं **टिळक** बरे व्हावे म्हणून हजारों रुपये गोरगरीबांना धर्म केले. बाळांनों, तुमच्यासारख्या लहान लहान बाळकांनींही डोळ्यांत पाणी आणून ' देवा आमच्या **टिळकांना** बरें कर रे ' अशी प्रार्थना केली. आर्य भगिनींनीं देवाला नवस केले. दूरदूरच्या लोकांना कांहीं सुचेनासें झालें. तासातासानें ' आतां **टिळक** कसे आहेत ' ? अशा चौकशीच्या तारा येऊं लागल्या. मुंबईतील अत्यंत कुशल **डाक्टर** आपण होऊन आपले दवाखाने टाकून **लो. टिळकांच्या** उशापायथ्याशीं रात्रंदिवस बसून रोगाशीं झगडत होते. मोठ्या राजाचीही शुश्रूषा होणार नाहीं इतकी **लो. टिळकांची** शुश्रूषा होत होती. मधून मधून विद्वान्‌ वैद्याचार्य **डाक्टरांना** आपल्या मनाप्रमाणें कांहीं तरी सुचवीत होते. बाहेरगांवच्या हजारों तारा येऊन ' आतां **टिळक** जरा बरे आहेत ' असें धीर देणारें उत्तर पाठविण्याकरितां स्पेशल स्वयंसेवकांची नेमणूक झाली होती. **न्या. चंदावरकर, महात्मा गांधी, बॅ. बॅपटिस्टा, बॅ. जिना,** वगैरे थोर लोक चिंताग्रस्त होऊन तेथें येऊन चौकशी करीतच होते. सर्व धर्मांचे व सर्व जातीचे स्त्रीपुरुष सारखे **सरदारगृहाकडे** चालले होते. सर्व देशांचें मन **लो. टिळकांकडे** लागलें होतें. सारखे दहा

दिवस रोगाशीं लोकमान्य झगडत होते. पण शेवटीं त्या दुष्ट काळानें रविवार ता. १ आगस्ट १९२० रोजीं पहाटेस महाराष्ट्राचे पंचप्राण हिंदभूमीचा सौभाग्यतिलक बाळ टिळक यांस हिरावून नेलें. ही बातमी उजाडण्यापूर्वींच देशभर पसरली. निरनिराळ्या शहरीं ही बातमी समजतांच थिएटरें खडाखड बंद झालीं, नाटकें जेथल्या तेथेंच थांबलीं व लोक डोळ्यांत अश्रू येऊन भराभर थिएटरांबाहेर पडले. पुण्याची मंडळी मिळेल त्या गाडीनें मुंबईकडे धांवली. शेवटीं जी. आय. पी. रेल्वेनें तीन स्पेशल गाड्या मुंबईकडे नेल्या तरी हजारों लोकांना जातां आलें नाहीं. प्रेसिडेंट आपटे व ना. परांजपे यांनीं 'टिळकांचें प्रेत पुण्यास नेऊं द्या' म्हणून शिकस्तीची विनंति केली. मोठाले शेट सावकार मोटारीनें धडाडत मुंबईला गेले व 'आमच्या टिळकांना आम्ही पुण्यास नेणार' असा आग्रह धरून बसले. मुंबईकरही डोळ्यांत पाणी आणून 'आम्ही टिळकांना येथून जाऊं देत नाहीं' असें विनयकपूर्वक पण निश्चयानें म्हणूं लागले. त्यांना दुखविणें, आज दहा दिवस त्यांनीं टिळकांसाठीं खाल्लेल्या खस्ता व शेवटीं त्यांचा झालेला विरस मनांत न आणणें हेंही पुणेंकरांना शक्य नव्हतें. शेवटीं तडजोड अशी काढली कीं, टिळकांची पालखी उचलण्याचा पहिला मान पुणेकरांस द्यावा व मग मुंबईकरांनीं ती पालखी आपल्या खांद्यावर घ्यावी. टिळकांची प्रेतयात्रा प्रंचड निघणार व इतकी लाखों लोकांची गर्दी मुंबईच्या सोनापुरांत म्हणजे स्मशानांत मावणें अगदींच अशक्य, ही गोष्ट मुंबईचे माजी नगराध्यक्ष वसंतराव दाभोळकर व इतर थोर गृहस्थ यांच्या पहाटेसच लक्ष्यांत आली, लगेच ते सरकारकडे गेले व गव्हर्नरसाहेबांनीं सर्व गोष्टींचा विचार करून मुंबईत कधींच न घडलेली गोष्ट करण्याची स्पेशल परवानगी दिली. लो. टिळकांचें प्रेत समुद्रावर चौपाटीवर ज्या ठिकाणीं गणपतिविसर्जन होतें त्या ठिकाणीं दहन करण्याची परवानगी मिळाली. टिळकांच्या प्रेतयात्रेला सर्व जातीचे, सर्व धर्मांचे, हिंदू, मुसलमान, पारशी, यहुदी, जैन, वगैरे सुमारें चार लक्ष लोक जमले होते. सर्व रस्त्यांवरून या

प्रचंड गर्दीमुळें ट्राम किंवा इतर गाड्या जाणें बंद झालें होतें. एक विमान करून त्यांत **टिळकांना** मांडी घालून बसविलें होतें. हजारों स्त्रिया प्रेतयात्रेबरोबर चालल्या होत्या. आकाशांतून पावसाच्या धारा व लोकांच्या डोळ्यांतून अश्रूधारा सारख्या वहात होत्या. सर्व रस्त्यांवरील सर्व घरांतील सर्व मजल्यांच्या खिडक्या **टिळकदर्शनासाठीं** उत्सुक अशा स्त्रीपुरुषांनीं भरून गेल्या होत्या. प्रथम विमान उचलण्याचा मान पुणेकरांस दिल्यानंतर **महात्मा गांधी** व मुसलमान पुढारी **शौकत अल्ली** व दुसरे मुसलमान पुढारी अश्रूपूर्ण नेत्रांनीं पुढें आले व 'आम्हांला **टिळकांना** वाहून नेण्याची परवानगी द्या' असें म्हणाले. 'जसे **टिळक** तुमचे तसेच ते आमचे मुसलमानांचेही आहेत' असें मुसलमान पुढारी म्हणूं लागले. त्या शोकसमयीं धर्मभेद कोणींच मानला नाहीं. जैन, मुसलमान, हिंदु सर्व टिळकप्रेत वहाण्याचा मान मिळवून स्वतःस धन्य मानूं लागले. मुसलमान मोहोल्यांत **टिळकांचें** विमान येतांच मुसलमानी स्त्रियांनीं त्यावर पुष्पवृष्टि केली. पुढें व्यापारी पेठेंतून विमान जाऊं लागलें तेव्हां लो. **टिळकांवरून** व्यापाऱ्यांनीं चवल्या पावल्या उधळल्या. अशा प्रकारें पाऊस मी म्हणत होता तरी एकसारखे पांच तास या प्रचंड गर्दीसह ही अद्वितीय प्रेतयात्रा चालू राहून शेवटीं चौपाटीवर येऊन दाखल झाली. तेथें लाला लजपतरायांनीं लो. **टिळकांस** वंदन करून दोन शब्द सांगितले. नंतर एका थोर पारशी गृहस्थानें **टिळक**-भक्तीनें चंदनाचीं लांकडें पाठवून दिलीं. तेव्हां असल्या चंदनाच्या लांकडाच्या चितेवर प्रेतदहन केलें. अशा तऱ्हेची प्रचंड प्रेतयात्रा पूर्वीं कधींही निघाली नव्हती. **लो. टिळकांच्या** मृत्यूमुळें **मुंबई व पुणें** येथील सर्व बाजार तीन दिवस बंद होते. बहुतेक देशांतील बहुतेक शाळा व कॉलेजें **टिळकांच्या** सन्मानार्थ बंद ठेवण्यांत आल्या होत्या. देशभर दुःखप्रदर्शनार्थ हजारों सभा भरल्या. यूरोप, अमेरिका, आफ्रिका वगैरे खंडांतही दुखवट्याच्या सभा भरल्या. बहुतेक गांवोगांव **टिळकांचीं** स्मारकें करण्याचें ठरविण्यांत आलें. सर्व हिंदुस्थानचें एक मोठें स्मारक व्हावयाचेंही ठरलें आहे. व त्याकरितां एक कोटीपेक्षां अधिक रुपये जमले आहेत. **लो. टिळकांच्या** मरणानें

दुःखित होऊन क्षत्रिय कुलावतंस छत्रपती कोल्हापूर सरकार, जगद्गुरु शंकराचार्य,शेट बमनजी,न्या.चंदावरकर,श्री रमाबाईसाहेब रानडे यांसारख्या थोर माणसांपासून तों अत्यंत गरीब माणसापर्यंत हजारों लोकांनीं सहानुभूतीच्या तारांचा व पत्रांचा लो. टिळकांच्या पुत्रांवर सारखा वर्षाव केला. सर्व देशांतील वर्तमानपत्रांनीं त्यांच्या गुणवर्णनपर लेख लिहिले. थोर इंग्रज, स्कॉच, अमेरिकन स्त्रीपुरुषांनीं सहानुभूतीचीं पत्रें पाठविलीं. पुणें व प्रयाग येथें लो. टिळकांच्या अस्थींची जंगी जाहीर मिरवणूक लोकांनीं व पुढाऱ्यांनीं काढली. शेंकडों रीतीनें लोकांनीं लोकमान्यांवरचें आपलें प्रेम व्यक्त केलें. असो; याप्रमाणें लोकमान्य टिळक आपला नाशवंत देह टाकून अजरामर झाले.

बाळांनो, ऐकलेंतना लोकमान्य टिळकांचें दिव्यचरित्र. यावरून तुम्हीं हें शिकावें कीं, १ आपलें सर्व आयुष्य सत्कार्यांत व देशसेवेंत खर्च करावें. एक क्षणही आळसांत घालवूं नये. २ हातांत घेतलेलें काम कितीही संकटें आलीं तरी नेटानें तडीस न्यावें. ३ मित्रकार्याकरितां जिवापाड झटावें. ४ स्वदेशाप्रमाणें स्वधर्मावर प्रेम करावें व रोज धर्मविचारांत थोडा तरी वेळ खर्च करावा. ५ विद्या शिकण्यांत सर्व वेळ न घालवितां शरीर पिळदार व कंटक बनविण्यासाठीं व्यायाम व धांवपळीचे खेळ खेळण्यांत रोज कांहीं वेळ दिलाच पाहिजे. ६ नुसते पुस्तकी पंडित न होतां पुस्तकी पंडित व हातोडीबहाद्दरही व्हावें. ७ आपला स्वभाव तेजस्वी व बाणेदार बनवावा. ८ गर्वाला मुळींच थारा देऊं नये. ९ आपली रहाणी अगदीं साधी असावी. १० स्वतःचें नुकसान सोसूनही देशकार्य करावें. ११ पूर्वजांविषयीं व आपल्या पूर्वीच्या इतिहासाविषयीं योग्य अभिमान बाळगावा. १२ आपलें वर्तन अत्यंत पवित्र व शुद्ध ठेवावें. १३ विद्येशिवाय दुसरें कसलेंही व्यसन लावून घेऊं नये. १४ आपले अंगांत हिंमत अथवा धैर्य आणण्याचा प्रयत्न करावा.

बाळांनो, याप्रमाणें तुम्ही वागलां म्हणजे तुम्ही सर्वांचे लाडके व्हाल.

भारतसेवक
ना. गोपाळ कृष्ण गोखले.

बाळांनों, आतांपर्यंत मीं तुम्हांला **न्या. माधवराव रानडे**, मालाकार **विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रि. गोपाळ गणेश आगरकर व लो. बाळ गंगाधर टिळक** यांचीं चरित्रें म्हणजे महाराष्ट्राच्या पंचप्राणांपैकीं चार प्राणांची हकीगत आतांपर्यंत तुम्हांला सांगितली. आतां ज्याला हिंदुस्तानचा सेवक म्हणवून घेण्यांत अतिशय आनंद वाटत असे, ज्यानें सरकार **सर** हा किताब देत असतां मला तो नको असें म्हणून **सर** या पदवीपेक्षां **हिंद देवीचा सेवक** ही पदवी आपणाला जास्त आवडते असें स्पष्ट करून दाखविलें, ज्याला स्टेट सेक्रेटरीच्या कौन्सिलचा पहिला सभासद, होण्याचा मान मिळत असतां ज्यानें तो नको असें म्हणून भारतमातेचा सेवक होण्यांतच आपणाला अधिक धन्य मानून घेतलें, ज्यानें **लो. टिळक व प्रि० आगरकर** यांच्या खटल्याचा खर्च अंशतः आपल्याला देतां यावा म्हणून नाटकांतही काम केलें व ज्यानें त्या थोर पुरुषांचें उदाहरण डोळयांपुढें दिसतांच केवळ अठराव्या वर्षीं देशसेवेचें कंकण करांत बांधलें त्या निस्सीम देशभक्त भारतसेवक **ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांचें** पवित्र चरित्र मी तुम्हाला आतां सांगणार आहें.

जन्म व बाळपण.

ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांत चिपळूण तालुक्यांत ताम्हनमळा या खेड्यांत सन १८६६ त झाला. गोपाळरावांचे वडिलांची बरीच गरीबी होती. त्यांना कोल्हापुर जवळ कागल म्हणून एक संस्थान आहे त्या संस्थानांत एक लहानशी नोकरी होती. आपल्या अल्पप्राप्तीवर समाधानानें व ठाकठिकीनें ते उदरनिर्वाह करीत असत. त्यांना दोन मुलगे होते. वडील मुलाचें नांव

गोविंद व धाकट्याचें म्हणजे आपल्या चरित्रनायकांचें नांव गोपाळ·
गोपाळा बारा वर्षांचा असतांच त्याचे वडील मरण पावले. त्यामुळें कुटुं-
बावर मोठाच कठीण प्रसंग आला. तरी धीर धरून गोपाळरावांचे वडील
बंधु **गोविंदराव** यांनीं कुटुंबाचा सर्व भार आपल्या डोक्यावर घेतला.
कुटुंबपोषणासाठीं व लहानग्या **गोपाळाचें** शिक्षण नीट व्हावें म्हणून
गोविंदरावांनीं पुढें जास्त शिकण्याची आपली हौस सोडून दिली व
एक लहानशी नोकरी धरली. **गोविंदरावांचें गोपाळरावांवर** फारच
प्रेम होतें. आपला **गोपाळ** शिकून जगांत पुढें यावा, त्यानें आपल्या घरा·
ण्याचें नांव काढावें असें **गोविंदरावांना** वाटत असे. व हा असें नांव
काढील अशी **गोविंदरावांना** खात्री होती. **गोपाळरावही गोविंदरावांना**
फार मान देत व त्यांच्या आज्ञेंत वागत. **गोविंदराव** आपल्या लहानशा
पगारांत सर्व कुटुंबाचा खर्च भागवून शिवाय **गोपाळरावांच्या** शिक्षणा-
साठींही ते मदत करीत असत. **गोपाळरावांचे** बालपणाचा मजेचा काळ
कागल व कोल्हापूर येथें गेला. **गोपाळरावांचें** शिक्षणही कागल व को-
ल्हापूर येथें झालें. **गोपाळराव** कोल्हापूर येथील राजाराम हायस्कुलांत
इंग्रजी शिकले. त्या हायस्कूलमधून त्यांची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा सन
१८८१ सालीं झाली. तेव्हां ते अवघे पंधरा वर्षांचे होते. सोळा वर्षें
पुरीं होईपर्यंत मॅट्रिकला बसूं द्यावयाचें नाहीं हा नियम त्या वेळेला झाला
नव्हता म्हणून बरें, नाहीं तर **गोपाळरावांचें** एक वर्ष विनाकारण
फुकट गेलें असतें.

मॅट्रिक्युलेशनची परीक्षा सन १८८१ सालीं पास झाल्यावर
गोपाळराव कोल्हापूर येथें असलेल्या राजाराम कॉलेजांत शिकूं लागले.
राजाराम कॉलेजमधून सन १८८२ सालीं ते प्रीव्हियसची परीक्षा पास
झाले. नंतर ते पुण्यास डेक्कन कॉलेजांत गेले व डेक्कन कॉलेजमधून
सन १८८३ सालीं ते फर्स्ट बी. ए. ची परीक्षा पास झाले. नंतर मुंबई येथें
एल्फिन्स्टन कॉलेजांत गेले व त्या कॉलेजांतून सन १८८४ सालीं बी.
ए. ची परीक्षा सेकंड क्लासांत पास झाले. ते कॉलेजांत असतांना अगदीं

अबोल व साधे असत अशी गोपाळरावांची ख्याति होती. त्यांची बुद्धि साधारणच होती पण ते महत्त्वाकांक्षी होते व आपण नांव मिळवावें असें त्यांना नेहमीं वाटत असे. यामुळें आळस त्यांना कधींही शिवला नाहीं. निश्चय व मेहनत याच्या बळावर साधारण बुद्धीचा मनुष्य कसा पुढें येतो, देशाचा उज्ज्वल देशभक्त व सन्माननीय पुढारी कसा बनतो व राजा व प्रजा यांचेकडून कसें धन्य धन्य म्हणवून घेतो हें गोपाळरावांच्या चरित्रावरून बाळांनो, आपणाला चांगलें कळून येतें. कॉलेजमध्यें असतांना गोपाळरावांची त्यांच्या अलौकिक स्मरणशक्तीबद्दल मोठी ख्याति होती. मोठमोठालीं इंग्रजी काव्यें अथपासून इतिपर्यंत त्यांनीं बिनचूक व उत्कृष्ट तऱ्हेनें म्हणून दाखवावीं व आपल्या वर्गबंधूंना थक्क करून सोडावें. इतकी दांडगी स्मरणशक्ति फारच थोड्यांच्या वांट्यास येते. आपली अलौकिक स्मरणशक्ति अभ्यासानें गोपाळरावांनीं पुढें इतकी वाढवली कीं एकदां वाचलेला लेख ते जशाचा तसा वाटेल तेव्हां म्हणून दाखवीत. ही अलौकिक स्मरणशक्ति पुढें व्हाइसरॉय यांच्या कौन्सिलांत काम करीत असतांना विशेषतः वादविवादाचे वेळीं त्यांना फारच उपयोगीं पडली. सरकारी फडाणिसांना त्यांच्याच सरकारी रिपोर्टांतले कित्येक वर्षांचे आंकडे धडाधड सांगून गोपाळराव निरुत्तर करून टाकीत.

एंजीनिअर, वकील कां देशसेवक.

गोपाळराव बी. ए. झाले तेव्हां त्यांच अगदीं लहान वय होतें. नुकतीं कोठें त्यांना १८ वर्षें पुरीं झालीं होतीं. इतक्या लहान वयांत पुढें काय करावयाचें हा प्रश्न त्यांचे पुढें येऊन राहिला. कोणी म्हणूं लागले तुम्ही कर्ज काढूनही विलायतेस जा व सिव्हिल सर्व्हंट होऊन या. कोणी म्हणत तुम्ही एल्. सी. ई. होऊन एंजीनिअर व्हा. कोणी म्हणत तुम्ही एलएल्. बी. होऊन वकील बना. असा निरनिराळा उपदेश ऐकून गोपाळराव अगदीं गोंधळून गेले. सरकारी नोकरींत ते शिरते तर त्यांचा पैशाच्या दृष्टीनें फायदा झाला असता. ते बडे

सरकारी अधिकारी झाले असते. पण त्यामुळें देशाचें अतोनात नुकसान झालें असतें. ते एल्. सी. ई. होऊन सडका बांधण्याचे बडे प्रेसिडेन्सी एंजीनिअर होऊन तीन तीन हजार रुपये दरमहा कमावते; पण मग राष्ट्राची भाग्योदयाची यशस्वी सडक बांधणारा यशस्वी व कुशल एंजीनिअर त्यांना होतां आलें नसतें व राष्ट्राचें अतिशय नुकसान झालें असतें. ते वकील झाले असते तर आपल्या गोड व कुशल भाषणानें न्यायदेवतेला आपलीशी करून आपल्या पक्षकारासारखा निकाल करून घेऊन पांच सहा हजार रुपये दरमहा पदरांत पाडून गब्बर झाले असते हें खरें, पण मग त्यांचेसारखा यशस्वी, समयज्ञ, मधुर व मुद्देसूद भाषणानें आपलें काम फत्ते करणारा हिंददेवीचा राष्ट्रीय वकील नाहींसा झाला असता, त्याची वाट काय ? पण तसें कांहीं झालें नाहीं हें फार चांगलें झालें. विचार करतां करतां **टिळक** व **आगरकर** यांचें चरित्र व देशसेवा त्यांचे डोळयांपुढें उभी राहिली. लगेच त्यांचा निश्चय झाला व ते **आगरकर** व **टिळक** यांना येऊन मिळाले.

फर्ग्युसन कॉलेजांत शिक्षक.

सन १८८५ सालीं जानेवारी महिन्यांत **लो. टिळक, प्रि. आगरकर, आपटे, नामजोशी** वगैरे तेजस्वी तरुणांच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटींत **गोखले** येऊन मिळाले. व त्या सोसायटीचे लाईफ मेंबर झाले. त्यांना पहिले प्रथम न्यू इंग्लिश स्कूलमधें इंग्रजी शिकवावें लागे; पण लवकरच फर्ग्युसन कॉलेजमधें त्यांची इंग्रजीचे प्रोफेसराचे जागीं नेमणूक झाली. वास्तविक गणित विषय घेऊन ते बी. ए. झाले होते. तरी पण त्यांची बुद्धि इतकी चलाख होती कीं, हां हां म्हणतां एखादा नवीन विषय ते आपलासा करीत व विद्यार्थ्यांना तो उत्तम तऱ्हेनें शिकवीत. अशा तऱ्हेनें मेहनत घेऊन वाटेल तो विषय तयार करून ते हौशीनें शिकवीत असत. यामुळें कॉलेजच्या कामांत त्यांची फार मदत होत असे. अशा तऱ्हेनें त्यांनीं कॉलेजमधें इंग्लिश, गणित, इतिहास व अर्थशास्त्र हे विषय निरानिराळया वेळीं शिकविले. सर्वच

विषय त्यांना उत्तम तऱ्हेनें शिकवितां येत असत व यामुळें ते आपल्या विद्यार्थ्यांना अतिशय प्रिय असत. त्यांचा सर्वांत आवडीचा विषय अर्थशास्त्र असे. अर्थशास्त्रावर नवीन प्रकाश पाडणारा व नवीन सिद्धांत प्रस्थापित करणारा एखादा उत्तम ग्रंथ आपण लिहावा असें त्यांचे मनांत फार होतें पण त्यांचेवर कॉलेजचा फंड जमविण्याचें फार महत्वाचें काम पडल्यामुळें व पुढें आगरकर, आपटे, केळकर यांचे मृत्यूमुळें कॉलेजच्या व्यवस्थेचाही सर्व भार त्यांचेवर पडल्यामुळें त्यांना वेळ झाला नाहीं, यामुळें असल्या उत्तम ग्रंथास आपण कायमचे अंतरलों. अर्थशास्त्राचे खालोखाल त्यांच्या आवडीचा विषय म्हटला म्हणजे इंग्लंडचा इतिहास. इंग्लंडचा इतिहास शिकवीत असतां ते अगदीं तन्मय होऊन जात. इंग्लंडांतील राजसत्ताक कारभार हळूहळू प्रजासत्ताक कसा झाला हें ते फारच मार्मिक तऱ्हेनें समजून सांगत असत. हिंदुस्तानचा इतिहास म्हणजे गुलाम घराणें, तघलख घराणें, लोदी घराणें असल्या नुसत्या हाणामारीनें व उलथापालथीनें भरलेला असल्यामुळें तो त्यांना विशेषसा आवडत नसे. ते इंग्लिश इतकें पद्धतशीर शिकवीत कीं, अतिशय मंद मुलाला देखील त्या विषयांत पास होतां यावें. गणितही ते चांगलें शिकवीत असत. त्यांनीं रचलेलें अंकगणितावरील पुस्तक आज तीस पसतीस वर्षें सर्व हिंदुस्तानभर व हिंदुस्तानच्या बाहेरही किती लोकप्रिय झालें आहे हें बाळांनो, तुम्हांला माहीत आहेच. त्यांच्या गणितशास्त्रांतील नैपुण्याचा त्यांना पुढें फार उपयोग झाला. गणितशास्त्राचा अभ्यास मनुष्याला कांटेतोल बनवितो. गणितशास्त्राचा अभ्यास न केलेले लोक अघळपघळ व सर्वसाधारण वाटेल तशा वायफळ गप्पा मारण्यांत हुषार असतात, पण त्यांचे भाषणांत आंकड्यांच्या वाटेल तशा चुका खच्चून भरलेल्या असतात. गोखल्यांचीं कौन्सिलांतील भाषणें जीं इतकीं कांटेतोल व बिनचूक होत असत त्याचें कारण त्यांचें गणितशास्त्रांतील नैपुण्य हेंच होय. त्याचप्रमाणें बजेट ऊर्फ पुढील सालचें अंदाजपत्रक हिंदुस्तान सरकारचे फडणीस

आंकड्यांनीं खच्चून भरलेलें जेव्हां पुढें मांडीत तेव्हां इतर मेंबर त्या आंकड्यांवर फारसे तुटून पडत नसत. पण अर्थशास्त्र, इतकेंच नव्हे तर गणिती अर्थशास्त्र या विषयांत गोखले पारंगत असल्यामुळें ते तेव्हांच फडणिसांच्या चुका त्यांच्या पदरांत घालीत व त्याही त्यांच्या सरकारी रिपोर्टांतील आंकड्यांच्याच जोरावर. अलौकिक गुरूचे अलौकिक शिष्य असें म्हणतात कीं, खऱ्या ब्राह्मणानें नेहमीं षट्कर्मे केलीं पाहिजेत. तीं कोणतीं तर १ यजन, २ याजन, ३ अध्ययन, ४ अध्यापन, ५ दान, ६ प्रतिग्रह. हीं सहाही कर्में अत्यंत उज्वळ रीतीनें निस्वार्थी बुद्धीनें **गोपाळरावांनीं** केलीं. यामुळें ते इतरांप्रमाणें जन्मानें ब्राह्मण होतें, पण शिवाय दिव्य कृतीनेही ब्राह्मण होते. आपल्या स्वार्थबुद्धीचा होम करून त्यांचें यजन चाललें होतें. इतर तरुणांना स्वार्थाचा होम करावयास शिकवून व त्यांचेकडून स्वार्थत्याग करवून त्यांनीं याजन केलें, अध्ययन म्हणजे विद्या संपादन करणें. हें त्यांनीं लहानपणीं तर केलेंच पण मोठेपणीं स्वतः प्रोफेसर होऊन अध्यापन म्हणजे इतरांना शिकविण्याचें काम करीत असतांना देखील त्यांचें अध्ययन म्हणजे न्या. रानडे, यांचे पायांशीं बसून राजकीय विद्येचें संपादन चाललेंच होतें. दानाविषयीं त्यांची ख्यातीच आहे. प्रतिग्रह म्हणजे दान घेणें हेंही फर्ग्युसन कॉलेजचा फंड गोळा करतांना त्यांना करावेंच लागलें. असो. आतां मुख्य सांगावयाची गोष्ट ही कीं, प्रोफेसरचें काम करीत असतांही आपल्या अंगांतील सतत उद्योग करण्याच्या संवयीनें ना. गोखल्यांनीं न्या. रानडे यांचेकडे जाऊन त्या थोर व श्रेष्ठ गुरूजींची मर्जी संपादन करून त्यांचेपासून राजकीय विद्या संपादन केली ही होय.

सन १८८६ पासून ते सन १८९६ पर्यंत न्या. रानडे यांच्यापासून ना. गोखल्यांनीं राजकीय चळवळ, लेखन व कामागिरी यासंबंधीं विद्या संपादन केली. हिंदुस्तानांतील ज्या प्रसिद्ध नांवाजलेल्या राजकीय संस्था आहेत त्यांपैकीं पुण्याची ‘ सार्वजनिक सभा ’ ही आहे. असल्या महत्त्वाच्या सभेच्या सेक्रेटरीचें काम ना. गोखले हे

केवळ वीस वर्षांचे होते तेव्हांपासूनच करावयास लागले. हें काम न्या० रानड्यांच्या दिव्य प्रेरणेच्या मदतीनें त्यांनीं उत्तम तऱ्हेनें केलें. त्याचप्रमाणें राजकीय विषयांचें सार्वजनिक सभेचें मासिकही त्यांनीं उत्तम तऱ्हेनें चालविलें, याचें कारण न्यायमूर्ति हे उत्तम गुरु व गोखले हे उत्तम शिष्य अशी जोडी जुळून आली हेंच होय.

वेल्बी कमिशन.

ज्या गोष्टीनें ना. गोखले यांचें नांव सर्व हिंदुस्तान व इंग्लंडभर दुमदुमून राहिलें ती गोष्ट त्यांची वेल्बी कमिशनपुढें झालेली उत्तम साक्ष ही होय.

हिंदुस्तानावर खर्चाचा बोजा फार पडत आहे, त्यापैकीं बराच खर्च कमी करतां येण्यासारखा आहे, हिंदुस्तान गरीब आहे त्याला, हें ओझें सहन होणार नाहीं, अशी राष्ट्रीय सभेनें सारखी ओरड केल्यामुळें विलायत सरकारनें यासंबंधीं चौकशी करण्याकरितां वेल्बी कमिशन नेमिलें. त्या कमिशनपुढें सन १८९६ सालीं पुष्कळांच्या विलायतेंत साक्षी झाल्या. पण सर्वांत ना० गोखले यांची साक्ष उत्तम झाली. यामुळें इंग्लंड व हिंदुस्तान या दोनही देशांत त्यांची फार वाहवा झाली.

म्युनिसिपल प्रेसिडेंट.

ना. गोखले यांनीं ज्याप्रमाणें शिक्षणसेवा व देशसेवा केली त्याप्रमाणेंच अतिशय कळकळीनें आपल्या पुणें शहराचीही सेवा केली. ते बरींच वर्षें पुणें म्युनिसिपालिटीचे सभासद होते व पुढें तर एकमतानें त्यांना प्रेसिडेंट निवडण्यांत आलें. ते म्यु० प्रेसिडेंट असतां त्यांनीं नेहमींची या कामांतील सुस्ती व दिरंगाई काढून टाकली. पुढें मोठालीं कामें अंगावर पडल्यामुळें त्यांना हें काम सोडावें लागलें.

कौन्सिलचे मेंबर.

मुंबई इलाख्यांतील मध्यभागानें सन १८९९ सालीं आपले तर्फें सभासद म्हणून त्यांना मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलांत पाठविलें. तेथें त्यांनीं दोन वर्षें इतकें उत्तम काम केलें कीं, त्या कौन्सिलानें त्यांना हिंदुस्तान सरकारच्या वरिष्ठ कौन्सिलांत आपले वतीचे

सभासद म्हणून निवडून पाठविलें. वरिष्ठ कौन्सिलांत सन १९०१ पासून तों शेवटपर्यंत ते मेंबर होते. तेथेंही आपल्या वादविवादांतील हुषारीनें, गोड भाषणानें, आंकडेशास्त्रांतील व अर्थशास्त्रांतील नैपुण्यानें सर्व सभासदांना त्यांनीं चकित करून सोडलें. तेथील त्यांच्या कामगिरीनें आपल्या देशाचा पुष्कळ फायदा झाला आहे.

अध्यापनाची अखेर.

ना. गोखले यांनीं सन १८८५ पासून सन १९०४ अखेर म्हणजे वीस वर्षें फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसरचें काम उत्तम तऱ्हेनें करून लाईफ मेंबरनें वीस वर्षें काम केलें पाहिजे असा जो नियम आहे त्याची पूर्तता केली. पुढ अधिक महत्त्वाचीं कामें अंगावर पडल्यामुळें त्यांनीं आपल्या प्रिय कॉलेजचा निरोप घेतला. त्या प्रसंगीं त्यांना व त्यांच्या प्रिय विद्यार्थ्यांना व बरोबरच्या प्रोफेसरांना अतिशय वाईट वाटलें.

सर्व्हंटस् ऑफ इंडिआ सोसायटी.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्यें शिक्षणाचें काम करीत असतां **ना. गोखले** यांना नेहमीं असें वाटत असे कीं, याच नमुन्याची पण राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे कामगिरी करणारी एक सोसायटी असावी. पुढें डेक्कन एज्युकेशन सोसायटींत वीस वर्षें उत्तम काम करून ती सोडल्यावर या त्यांच्या मनांतील विचाराप्रमाणें ता. १२ जून सन १९०५ सालीं त्यांनीं ' **सर्व्हंटस् ऑफ इंडिआ सोसायटी** ' म्हणजे ' **भारतसेवकमंडळ** ' या नांवाची एक संस्था काढली. त्या संस्थेंत हल्लीं सुमारें २० सभासद आहेत. व ते राजकीय, सामाजिक, औद्योगिक वगैरे बाबतींत उत्तम देशसेवा करीत आहेत. या संस्थेचें मुख्य ठिकाण पुणें येथें आहे व तिच्या शाखा मुंबई, मद्रास, नागपूर व अलाहाबाद येथें आहेत.

राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष.

देशाची उत्तम सेवा करणाराला एक उत्तम बक्षीस देण्याचें देशाचे हातांत असतें. तें बक्षीस म्हणजे राष्ट्रीयसभेचा अध्यक्ष करणें. **ना.**

गोखले यांच्या उत्तम देशसेवेमुळें त्यांना हें बक्षीस व हा बहुमान मिळाला. त्यांना काशी येथें भरलेल्या १९०५ सालच्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्ष नेमण्यांत आलें होतें. त्यावेळचें त्यांचें भाषण व कामगिरी सर्व देशाला फारच पसंत पडली.

इंग्लंडची दुसरी सफर.

मागें विलायतेंत जाऊन वेल्बी कमिशनपुढें उत्तम साक्ष देऊन ना. गोखले यांनी १८९६ सालीं लोकांकडून धन्यवाद मिळविला. त्यापेक्षांही मोठ्या कामगिरीसाठीं आतां म्हणज १९०६ सालीं ना. गोखले इंग्लंडास गेले. तेथें जाऊन त्यांनीं लॉर्ड मोर्ले हिंदुस्तानचे त्यावेळचे स्टेट सेक्रेटरी यांची वारंवार भेट घेतली व त्यांचेपासून 'मोर्ले-मिंटो रिफॉर्मस्' म्हणजे स्वराज्याचा पाया घालणाऱ्या सुधारणा हिंदुस्तानासाठीं मिळविल्या.

दक्षिण आफ्रिकेची सफर.

यानंतर लवकरच ना. गोखले यांना दक्षिण आफ्रिकेंत जावें लागलें. दक्षिण आफ्रिकेंत रहावयास गेलेले लोक तेथील गोरे लोकांचे डोळ्यांत सलूं लागले. यामुळें तेथील सरकार हिंदी लोकांना योग्य रीतीनें व न्यायानें वागवीनात. तेव्हां दोनही पक्षांत समेट करण्याचा प्रयत्न करावा या हेतूनें ना. गोखले, प्रकृति बरोबर नसतांही सत्कार्य करावयास सांपडतें म्हणूनच दक्षिण आफ्रिकेंत गेले. तेथें आपल्या प्रेमळ मुत्सद्देगिरीनें व गोड स्वभावानें त्यांनीं दोनही पक्षांना आपलेसें करून घेतलें व शेवटीं दोनही पक्षांत समेट व प्रेम जुळवून आणून ते यशस्वी होऊन हिंदभूमीला परत आले.

इंग्लंडची तिसरी सफर.

हिंदुस्तानांतील लोकांना स्वदेशांतील कारभारांतील वरच्या दर्जाच्या जागा द्याव्या किंवा नाहीं, त्या जागांना ते पात्र आहेत कीं नाहीं, सरकारी कामदारांत देशी किती असावे वगैरे प्रश्नांसंबंधीं माहिती

मिळविण्यासाठीं व रिपोर्ट करण्यासाठीं 'पब्लिक सर्व्हिसेस कमिशन' या नांवाचें एक कमिशन सन १९१३ सालीं विलायत सरकारानें नेमिलें. त्या कमिशनवर हिंदी लोकांचे प्रतिनिधी म्हणून **ना. गोखले** यांची नेमणूक झाली. १९१३ सालीं ठिकठिकाणीं हिंडून या कमिशननें माहिती गोळा केली. त्यावेळीं साक्षीदारांची उलटतपासणी उत्तम तऱ्हेनें करून हिंदुस्तानास हितकर असे जबाब साक्षीदारांच्या तोंडून **ना. गोखले** यांनीं मोठ्या हुशारीनें वदविले. नंतर तें कमिशन व **ना. गोखले** खल करून रिपोर्ट लिहिण्यासाठीं विलायतेस १९१४ सालीं गेले. तेथें **ना. गोखले** यांची प्रकृति बरीच बिघडली, यामुळें त्यांना हिंदुस्तानांत परत यावें लागलें. हिंदुस्तानांत आल्यावरही **ना. गोखले** यांची प्रकृति दिवसानुदिवस खालावतच गेली. त्यांना मधुमेह नांवाचा रोग जडला होता. तो बळावला व सन १९१५ सालीं फेब्रुवारी महिन्याच्या १९ तारखेस रात्रीं ११ वाजतां त्यांचें त्यांच्या प्रिय भारतसेवकमंडळाच जागेंत प्राणोत्क्रमण झालें. पौर्णिमेचा सुखदायक चंद्रमा एकदम अस्तास गे यामुळें सर्व देश दुःखाच्या अंधारांत बुडून गेला.

दुःखप्रदर्शन व सहानुभूति.

तारीख २० फेब्रुवारी रोजीं सकाळीं **ना. गोखले** यांची प्रेतयात्रा सर्व्हंटस् आॅफ इंडिआ सोसायटींतून सुमारें अकरा वाजतां निघाली. दुःखानें विव्हळ झालेलें त्यांचें पुणें शहर त्यांच्या दर्शनासाठीं सर्व्हंटस् आॅफ इंडिआ सोसायटीकडे लोटलें होतें. पुण्यांतील हजारों लहान थोर, सुशिक्षित व अशिक्षित माणसें या आपल्या पंचप्राणांपेक्षांही प्रिय महाभागाचें दर्शन घेण्यासाठीं भारतसेवकसमाजाचे आवारांत गोळा झाले होते. त्या प्रचंड जनसमाजासह नामदारांची प्रेतयात्रा ओंकारेश्वरीं आली. एवढें प्रचंड वाळवंट पण माणसांनीं अगदीं फुलून गेलें होतें. **लोकमान्य टिळक** यांनीं अश्रुपूर्ण नेत्रांनीं व गहिंवरून येऊन **ना. गोखल्यांचें** गुणवर्णन केलें व त्यांच्या मृत्यूनें देशाची

अतिशय हानि झाली आहे, असें सांगून तरुण मंडळीला **ना. गोखल्यांच्या** प्रमाणें आपलें चरित्र उज्वळ करा, असा त्यांनीं उपदेश केला. गुरुवर्य **डॉ. भांडारकरांनीं**ही कळवळ्याचें भाषण केलें. नंतर दहनविधि झाल्यावर हळहळत तो प्रचंड जनसमुदाय परत फिरला. **ना. गोखल्यांची** मृत्युवार्ता समजतांच सर्व खंडांतून दुःखप्रदर्शक सहानुभूतीच्या तारा व पत्रें यांचा **ना. गोखले** यांच्या कुटुंबावर व त्यांच्या सोसायटीवर सारखा वर्षाव झाला. राजापासन रंकापर्यंत सर्वांनीं आपलें दुःख प्रदर्शित केलें. खुद्द बादशहा **पंचम जॉर्ज,** हिंदुस्तानचे स्टेट सेक्रेटरी, व्हाइसरॉय वगैरे थोर माणसांनींही दुःखप्रदर्शक तारा **नामदारांच्या** कुटुंबाकडे पाठविल्या. ज्याच्या मृत्यूनें सर्व जग दुःखित झालें तोच खरा थोर पुरुष. असला थोर पुरुष आपल्याला लाभला हें आपलें मोठेंच भाग्य.

अलौकिक गुण.

ना. गोखले यांच्या अंगीं अनेक अलौकिक गुण होते. पण त्या सर्वांत पहिलें स्थान मी त्यांच्या गुरुभक्तीला देतों. **न्या. रानडे,** हे त्यांचे गुरु. त्यांचेविषयीं **ना. गोखले** यांना इतकी भक्ति व प्रेम वाटत असे कीं, न्यायमूर्तींची आज्ञा ते नेहमीं आदरपूर्वक पाळीत असत. व अनेक वेळां सार्वजनिक भाषणांत व खासगी भाषणांत शेवटपर्यंत, माझे परमपूज्य गुरुवर्य असा त्यांच्याबद्दल उल्लेख करीत असत. **न्यायमूर्ति रानडे** यांचेविषयीं **ना. गोखले** यांची भक्ति किती उत्कट होती हें जर बाळांनों, तुम्हांला पहावयाचें असेल तर **ना. गोखले** यांनीं **श्री. रमाबाईसाहेब** रानडे यांनीं लिहिलेल्या '**आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी**' या सुंदर पुस्तकाला जोडलेला **ना. गोखले** यांचा प्रस्तावनालेख वाचा. आपले पूज्य व प्रिय गुरु **न्या. रानडे** यांचें स्मारक करण्याकरितां **ना. गोखले** यांनीं फंड जमविला व '**रानडे एकॉनॉमिक इन्स्टिटयूट**' या नांवाची औद्योगिक व अर्थशास्त्रविषयक संस्था 'सर्व्हंटस् ऑफ इंडिआ सोसायटी'

जवळच स्थापन केली आहे. **न्या. रानडे** यांचें विस्तृत चरित्रही नामदारांच्या मनांतून लिहावयाचें होतें. तें त्यांनीं लिहिलें असतें तर मोर्ले यांनीं लिहिलेल्या ग्लाडस्टन यांच्या चरित्राइतकें तें उत्कृष्ट झालें असतें. पण आपल्या दुर्दैवानें **नामदारांना** वेळ मिळाला नाहीं. बाळांनों, पाहिलीतना **ना. गोखले** यांची गुरुभक्ती ? बाळांनों, नामदारांच्या प्रमाणेंच आपल्या गुरूंवर प्रेम करा व त्यांचेविषयीं आदर व भक्ति नेहमीं आपले मनांत ठेवा.

नामदार गोखले यांचा दुसरा अलौकिक गुण म्हणाल तर त्यांचा अचाट स्वार्थत्याग. वयाच्या अठराव्या वर्षापासून स्वसुखाची व स्वतः पैसे मिळवून श्रीमंत होण्याची पर्वा न करितां सर्व आयुष्य त्यांनीं स्वार्थत्यागपूर्वक स्वदेशाच्या सेवेस अर्पण केलें. बाळांनो, याचें तुम्ही अनुकरण करा. **नामदारांचा** तिसरा अनुकरणीय गुण म्हणजे त्यांची सतत उद्योग करण्याची संवय. बाळांनो, **नामदारांप्रमाणें** आपले हातून अलौकिक कामगिरी व्हावी असें तुम्हांला वाटतें ना ? तर त्यांच्या प्रमाणें उद्योगी व्हा.

नामदारांचा चवथा मोठा गुण त्यांचा गोड स्वभाव. **नामदार** नेहमीं हंसतमुख असत व फार प्रेमळपणानें व प्रेमळ शब्दांनीं आपले विचार प्रदर्शित करीत असत. एखादे वेळेस रागानें एखाद्या क्षुल्लक नोकराला जर ते बोलले तर लगेच त्यांना वाईट वाटे व ते त्याला गोड शब्दांनीं बोलून व कधीं कधीं तर त्याची क्षमा मागून प्रसन्न करीत. बाळांनों, **नामदारांप्रमाणें** प्रेमळ भाषण व प्रेमळ स्वभाव बनवा. कठोरपणा हें एक व्यंग आहे, तें आपण कधींही जडवून घेऊं नये.

नामदारांचा पांचवा गुण म्हणजे त्यांची स्वदेशभक्ति. तरुण वयांत बायको मेली असतां त्यांनीं सर्व आयुष्य देशसेवेला देतां यावें म्हणून पुनः लग्न केलें नाहीं. अहोरात्र देशाचें कल्याण कसें होईल याची त्यांना चिंता लागलेली असे. असे अनेक सद्गुण नामदारांचे अंगीं

होते. त्यांचें यथायोग्य वर्णन करणें माझ्या शक्तीच्या बाहेरचें आहे यासाठीं बाळांनो, त्यांच्या चरित्राचें मनन करा व त्यांचेप्रमाणें होण्याचा प्रयत्न करा असें माझें तुम्हांला सांगणें आहे.

त्यांची कुटुंबांतील मंडळी.

नामदार गोखले यांची प्रियपत्नी त्यांच्या पूर्वीं सुमार सोळा वर्षें मरण पावली. त्यांचे मागें त्यांच्या दोन प्रिय सुशील कन्या होत्या. त्यांपैकीं धाकटच्या कु. गोदूबाई नेहमीं आजारी असत, त्या आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर लवकरच मरण पावल्या. नामदारांच्या ज्येष्ठ कन्या कु. काशीताई या फार सुशील व सद्गुणी आहेत. त्यांची बी. ए. ची परीक्षा उत्तम तऱ्हेनें पास झालेली आहे. सुदैवानें त्यांच्या अनुरूप अशा रा. शंकरराव ढवळे, आय्. सी. एस्. यांच्याशीं त्यांचा विवाह सन १९१८ सालीं झाला. आतां त्या सौ. आनंदीबाई ढवळे बनल्या आहेत. नामदार गोखले यांना मुलगा नाहीं. पण सौ. आनंदीबाई ढवळे यांना दो मुलगे झाल्यामुळें नामदारांना नातू प्राप्त झाले आहेत. याशिवाय नामदारांना पुष्कळ पुतणे, पुतण्या व भाचे, भाच्या आहेत. त्या सर्वांचा ते चांगला परामर्ष घेत असत.

नामदार गोखले यांचे आवडीचे विषय.

सर्व लोकांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीनें द्यावें असें, ना. गोखले यांना फार वाटत असे व त्या दिशेनें त्यांचे प्रयत्न सारखे चालू असत.

त्यांचा दुसरा आवडीचा विषय हिंदूमधील सात कोट अस्पृश्य लोकांचा उद्धार करून त्यांच्याशीं प्रेमानें व समतेनें वागावयास देशबंधूंना शिकवावें हा होता.

ना. गोखले यांचे आवडते खेळ.

तरुणपणीं नामदारांना क्रिकेट व टेनिस खेळण्याचा फार नाद होता. पण पुढें त्यांना बिलिअर्ड आवडूं लागला. तरी त्यांचा

अत्यंत आवडीचा खेळ म्हटला म्हणजे पत्ते. एकदां तर ते एकसारखे १४ तास पत्ते खेळले.

विलक्षण निर्लोभता.

त्यांचे अंगीं विलक्षण निर्लोभता होती. **लॉर्ड मोर्ले** यांनीं त्यांना स्टेट 'सेक्रेटरीच्या कौन्सिलांत पहिला हिंदी सभासद नेमण्याचें योजिलें होतें. पण त्या मोठ्या थोरल्या पगाराला किंवा मानाला **नामदार** मुळींच भुलले नाहींत. ते म्हणाले, मी जन्मभर भारतभूमातेचा सेवक राहणार. त्याचप्रमाणें प्रत्यक्ष **पंचम जॉर्ज बादशहांनीं** त्यांना सर पदवी देऊं केली होती. पण तीही त्यांनीं नम्रपणें नाकारली. त्यांना भारत सेवक हीच पदवी हवी होती व तीच त्यांनीं जन्मभर धारण केली. प्रोफेसर म्हणवून घेणेंही त्यांना आवडत नसे.

उपसंहार.

बाळांनों, आमचें चरित्रकथन संपलें. ' **सुजनचरित्रें परम पवित्रें सादर वर्णावीं** ' अशी कवीश्वरांची आज्ञा आहे ती मान्य केली. सुजनचरित्रें वर्णन केल्यानें मन प्रसन्न व पवित्र होतें हें माझ्या अनुभवास आलें. सुजनचरित्रांचें श्रवण करून तुम्हांलाही अतिशय आनंद झाला असावा असें तुमच्या चेहऱ्यावरून दिसतें. काय म्हणतां ? ' अतिशय आनंद झाला ' ठीक आहे. बाळांनों, ह्या थोर पुरुषांचीं उज्ज्वल चरित्रें मीं तुह्मांला सांगितलीं तीं तुम्हीं मन लावून ऐकिलीं. आतां सांगा पाहूं मी या थोर पुरुषांना ' **महाराष्ट्राचे पंचप्राण** ' असें म्हटलें तें बरोबर आहेना ? काय म्हणतां अगदीं बरोबर आहे ? बरें तर असलीं माणसें आपल्या कीर्तिरूपानें **अजरामर** होतात ना ? तर मग ' **अजरामर झालेले महाराष्ट्राचे पंचप्राण** ' असें जें मीं यांना म्हटलें तेंही योग्यच आहे.

असो. बाळांना, ' अजरामर झालेल्या या महाराष्ट्राच्या पंचप्राणांच्या चरित्राचें पुनः पुनः वाचन करीत जा, त्यांच्या चरित्राचें मनन नेहमीं करा, म्हणजे त्यांच्या थोर गुणांचें सहजच तुम्ही अनुकरण कराल आणि मग तुम्ही सर्वांना प्रिय व्हाल. बाळ मित्रांनो, कादंबऱ्यांतील अद्भुत व कल्पित गोष्टी वाचण्याचें व्यसन [illegible] तें लवकर सोडा व सज्जनांचीं सन्मार्गदर्शक चरित्रें वाचण्[illegible] जोडा. मीही तुम्हांला वेळोवेळीं अशींच आणखी संत चरित्रें पुनः कव्हा तरी सांगेन. इतकें सांगून व देव तुम्हांला सुशील, सद्गुणी व सुविद्य करो, अशी त्या दयाळू परमेश्वराची नम्रपणें प्रार्थना करून तूर्त तुमचा निरोप घेतों.

समाप्त.

सुबोध रामायण.

लहान मुलांमुलींना मनोरंजक पद्धतीनें धर्माचें व नीतीचें शिक्षण देण्याचे हेतूनें हें पुस्तक तयार केलें आहे. यांत रामायणांतील मुख्य कथासंबंध मुलांना सहज रीतीनें समजेल अशा सरळ व सोप्या भाषेंत सांगितला आहे. पुस्तकांत त्या त्या प्रसंगाचे सुंदर आर्ट पेपरवर छापलेले चार फोटो घातले आहेत. पुस्तकावर **केसरीकार** यांचा अभिप्राय पुढीलप्रमाणें आहे.

या चिमुकल्या पुस्तकांत एकंदरीत सात कांडांमध्यें सुबोध रीतीनें रामायणांतील कथाभाग दिला असून शेवटीं रामायणापासून घ्यावयाच्या बोधाचें टिपणही जोडलें आहे. लहान मुलांस हें पुस्तक गोष्टीरूपानें लिहिल्या कारणानें मनोरंजक वाटेल तेव्हां त्यांनीं तें जरूर संग्रहीं ठेवावें. पुस्तकास कागद ग्लेझ घातला असून किंमत अल्प म्हणजे पांच आणे ठेविली आहे.

रामायणांतील सुबोध गोष्टी.

मुलांनीं सुसंगती धरावी, गर्व करूं नये, गुरुजींची आज्ञा मानावी, परोपकार करावा, आईबापांची सेवा करावी, विद्यासंपादनासाठीं झटावें, सत्पात्रीं दान करावें, ईश्वराची सप्रेम भक्ती करावी, वगैरे सुंदर तत्त्वें रामायणांतील निवडक मनोरंजक चोवीस गोष्टी सांगून बालकांच्या मनावर उत्तम तऱ्हेनें ठसविलीं आहेत. किं. साडे सहा आणे.

नारो आपाजी गोडबोले, बुकसेलर,
बुधवार पेठ, पुणें.